

# भैरव

## दुर्ग वैभव

मराठा विद्या प्रसारक समाजाचे

# कला व वाणिज्य महाविद्यालय

वडनेर भैरव, ता. चांदवड, जि. नाशिक.

Scanned with CamScanner

# भैरव २०१८-१९


मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक

## आद्य संस्थापक व स्फूर्तिस्थान



कर्मवीर रावसाहेब थोरात


कर्मवीर काकासाहेब वाघ


कर्मवीर भाऊसाहेब हिरे



कर्मवीर अण्णासाहेब मुरकुटे


कर्मवीर गणपत दादा मोरे


कर्मवीर डी.आर.भोसले


कर्मवीर ॲड.बाबुराव ठाकरे


कर्मवीर ॲड.विठ्ठलराव हांडे


कर्मवीर डॉ.वसंतराव पवार

Scanned with CamScanner

॥ बहुजन हिताय बहुजन सुखाय ॥

मराठा विद्या प्रसारक समाज नाशिक

# कला व वाणिज्य महाविद्यालय वडनेर भैरव

ता. चांदवड, जि. नाशिक.

# 'भैरव'

## *वार्षिक नियतकालिक*

सन २०१८-१९

वर्ष - ३ रे - अंक ३ रा

✲ अध्यक्ष संपादक मंडळ ✲

मा. प्राचार्य ए. एल. भगत

✲ प्रमुख संपादक ✲

प्रा. सोमनाथ डी. फुगट

✲ संपादक मंडळ सदस्य ✲

प्रा. श्रीमती के. एल. शिंदे, प्रा. श्री. लोखंडे



Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| ❊ प्रकाशन स्थळ | : | कला व वाणिज्य महाविद्यालय, वडनेर भैरव |
| ❊ प्रकाशन कालावधी | : | वार्षिक |
| ❊ प्रकाशक | : | प्राचार्य ए. एल. भगत |
| ❊ राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| ❊ पत्ता | : | कला व वाणिज्य महाविद्यालय, वडनेर भैरव, ता. चांदवड, जि. नाशिक. |
| ❊ प्रकाशक | : | प्राचार्य ए. एल. भगत |
| ❊ अक्षर जुळवणी | : | श्री. विजय बोरखडे (श्री स्वामी समर्थ ऑफसेट) |
| ❊ मुख पृष्ठ | : | श्री. विष्णु थोरे, चांदवड |
| ❊ मुद्रण | : | मराठा विद्या प्रसारक समाज प्रिंटींग प्रेस, नाशिक – २. |
| ❊ छायाचित्र | : | शिवप्रसाद फोटो स्टुडिओ, वडनेर भैरव |

मी प्राचार्य ए. एल. भगत असे जाहीर करतो की,

वरील माहिती माझ्या माहितीप्रमाणे खरी आहे. – प्राचार्य ए. एल. भगत

फक्त खाजगी वितरणासाठी


' या नियतकालिकातील लेखांमध्ये व्यक्त झालेली मते व विचार संबंधित लेखकांचे आहेत. त्यांच्याशी प्राचार्य, संपादक मंडळ, संस्था किंवा महाविद्यालय सहमत असेलच असे नाही.' – प्रमुख संपादक



Scanned with CamScanner

# समाजगीत

जनकल्याणी देह झिजवुनी लाजविले चंदना
कर्मवीर हो ज्ञानवीर हो लाख लाख वंदना
तुम्हाला लाख लाख वंदना ।।धृ.।।
ऋषिराजाने राजर्षीने लावियली ज्योत
वसा ज्योतीचा घेऊनी साचा पेटविला पोत
दिशादिशांतून परापरांतून आली नवजाग
दिसू लागला मनामनातला मुक्तीचा मार्ग
निद्रेतच होते दंग
अंतरातले स्फुलिंग
ते उठले उधळीत रंग
बहुजन हिताय, बहुजन सुखाय चेतविली चेतना
कर्मवीर हो, ज्ञानवीर हो लाख लाख वंदना ।।१।।
नांगर टाका, भाला फेका शिकवी शिवराया
त्याच मातीवर कसुनी कंबर करुया नव किमया
निरलस श्रमुनी काढू खणुनी रुतलेली शल्ये
निष्ठा शिंपून करु पेरणी हवी नवी मूल्ये
दृढनिश्चय ऐसा करुनी
कार्यात प्राण ओतुनी
आयुष्य दिले झोकुनी
ज्ञानप्रशाला उभारण्याला दिलीत हो प्रेरणा
कर्मवीर हो, ज्ञानवीर हो लाख लाख वंदना ।।२।।
मूक अडाणी फुलवू अग्रणी त्यातुनी ही जिद्द
मुळात अबला करु या सबला धन्य धन्य ब्रीद
दिव्य थोरवी कुठली ओवी गुंफावी गौरवा
नम्रपणाने एक मागणे हट्ट हाच पुरवा
निरपेक्ष अपुली कृती
ती सेवाभावी मती
ती निष्ठा तसली धृती
समाजदिन हा सार्थ कराया या हो या प्रेरणा
कर्मवीर हो ज्ञानवीर हो लाख लाख वंदना ।।३।।

- कै. प्रा. श्रीरंग गुणे



Scanned with CamScanner

# Our Vision and Mission

## - Vision

We envision a college of higher education ensuring conductive environment for teaching and learning, qualitites and skills of students making them into socially responsible, globally competent and excellent human resource.

## - Mission


1) To provide education to masses and first generation of learners.
2) Nuturing encouraging disciplines and the creation of new knowledge.
3) Expanding opportunities for all of our students to acquire understanding of the world as a place of different and diversity across time and culture through participation in study.
4) To develop socially responsible citizens with ethies and morals hence build the nation.
5) To under take activities for community orientation.
6) To empower women by providing right opportunities of higher education and make them self reliant.
8) To inculcate environmental awareness, save and conserve nature.



Scanned with CamScanner

मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक

# कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी



डॉ. तुषार रामकृष्ण शेवाळे
अध्यक्ष



श्री. माणिकराव माधवराव बोरस्ते
सभापती



श्रीमती निलीमाताई वसंतराव पवार
सरचिटणीस



श्री. राघो काशिराम आहिरे
उपसभापती



डॉ. सुनिल उत्तमराव ढिकले
चिटणीस

Scanned with CamScanner

मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक


# कार्यकारी मंडळाचे सदस्य


श्री. उत्तम गणपत भालेराव
चांदवड


श्री. अशोक राजाराम पवार
कळवण व सुरगाणा


श्री. भाऊसाहेब लक्ष्मण खातळे
इगतपुरी



श्री. दत्तात्रय रामचंद्र पाटील
दिंडोरी व पेठ


श्री. नामदेव नभाजी महाले
नाशिक


श्री. प्रल्हाद दादा गडाख
निफाड


श्री. दिलीप रघुनाथ पाटील
नांदगांव


डॉ. प्रशांत उदाराम देवरे
सटाणा


डॉ. जयंत त्र्यंबकराव पवार
मालेगांव


श्री. रायभान गंगाधर काळे
येवला



श्री. हेमंत विठ्ठल वाजे
सिन्नर


डॉ. विश्राम मालजी निकम
देवळा


श्री. सचिन पंडीतराव पिंगळे
नाशिक ग्रामीण

## सेवक सदस्य


प्रा. नानासाहेब त्र्यंबक दाते
सेवक सदस्य


श्री. गुलाबराव मुरलीधर भामरे
सेवक सदस्य


श्रीमती नंदा अशोक सोनवणे
सेवक सदस्य

Scanned with CamScanner

## कृतीशील युवा नेतृत्व..... !



प्राचार्य मा. श्री. अमोल लक्ष्मण भगत

Scanned with CamScanner

# भैरव २०१८-१९




ग्रामदैवत - भैरवनाथ महाराज व जोगेश्वरी माता मंदीर

Scanned with CamScanner

## संपादक मंडळ



**मा. प्राचार्य - ए. एल. भगत**

अध्यक्ष : संपादक मंडळ



**प्रा. एस. डी. फुगट**

प्रमुख संपादक



**प्रा. श्रीमती. के. एल. शिंदे**

सदस्य : संपादक मंडळ



**ग्रंथपाल : श्री. एस. एस. लोखंडे**

सदस्य : संपादक मंडळ

## * महाविद्यालयीन प्राध्यापक वृंद *


प्रा. ए. एल. भगत
भुगोल


प्रा. एन. डी. वडघुले
वाणिज्य


प्रा. एम. आर. घेवडे
वाणिज्य


प्रा. डी. एच. भगुरे
वाणिज्य


प्रा. एस. डी. फुगट
मराठी


प्रा. एस. एन. राठोड
मराठी


प्रा. डी. डी. गव्हाणे
अर्थशास्त्र


प्रा. एम. एम. भोसले
अर्थशास्त्र


प्रा. के. एल. शिंदे
इंग्रजी


प्रा. एस. आर. दौंड
मानसशास्त्र


प्रा. बी. पी. गायकवाड
राज्यशास्त्र


प्रा. एस. पी. जगताप
क्रिडा संचालिका


प्रा. एस. एस. लोखंडे
ग्रंथपाल

## * महाविद्यालयीन सेवक वृंद *


श्री. एस. बी. शिंदे
ज्युनिअर क्लार्क


श्री. एस. के. शिंदे
ज्युनिअर क्लार्क


श्री. एम. एस. ठाकरे
ज्युनिअर क्लार्क



श्री. जी. आर. आहेर
शिपाई


श्री. एस. ए. बच्छाव
शिपाई


श्री. एस. एस. वाटपाडे
शिपाई


श्री. एस. एन. निफाडे
शिपाई


श्री. व्ही. ए. मोरे
शिपाई


श्री. बी. व्ही. जाधव
बस चालक


श्री. बी. एस. व्हरगळ
बस चालक

Scanned with CamScanner

## * ज्युनिअर कॉलेज प्राध्यापक वृंद *


प्रा. एस. आर. जाधव
वाणिज्य


प्रा. एस. एम. कुमावत
मराठी/इतिहास


प्रा. एस. वाय. गांगुर्डे
उच्च माध्य.व्यवसाय अभ्यासक्रम


प्रा. डी. एस. पाटील
उच्च माध्य.व्यवसाय अभ्यासक्रम


प्रा. एच. एन. बच्छाव
भुगोल


प्रा. पी. एम. जाधव
इंग्रजी


प्रा. व्ही. वाय रसाळ
भुगोल


प्रा. एस. के. टर्ले
इंग्रजी


प्रा. एम. आर. गायकवाड
राज्यशास्त्र


प्रा. ए. टी. चौधरी
मराठी


प्रा. एस. डी. कुयटे
इतिहास


प्रा. एम. बी. देशमुख
विज्ञान


प्रा. एस. जी. गोरे
विज्ञान


प्रा. आर. एन. पाटील
विज्ञान


प्रा. आर. आर. शिंदे
विज्ञान


प्रा. जी. आर. गवळी (क्रिडा संचालक)


श्री. एन. एम. सावळे (शिपाई)

Scanned with CamScanner



पाणी फाऊंडेशन, रा.से.यो. व विद्यार्थी कल्याण मंडळ यांचे संयुक्त विद्यमाने गोहरण येथे राबविलेल्या विद्यापीठ स्तरीय जल संधारण शिबीरात माती नाला प्रसंगी श्रमदान करतांना म.वि.प्र. संस्थेच्या सरचिटणीस श्रीमती नीलिमाताई पवार, शा.व्य.स. अध्यक्ष ॲड. पोपटराव पवार, सरपंच ॲड. पवनकुमार जाधव ए.पी.आय. श्री. नितीन पाटील आदी मान्यवर



पाणी फाऊंडेशन, रा.से.यो. व विद्यार्थी कल्याण मंडळ यांचे संयुक्त विद्यमाने गोहरण येथे राबविलेल्या विद्यापीठ स्तरीय जल संधारण शिबीरात माती नाला प्रसंगी श्रमदान करतांना महाविद्यालयीन विद्यार्थी व प्राध्यापक वृंद



पाणी फाऊंडेशन, रा.से.यो. व विद्यार्थी कल्याण मंडळ यांचे संयुक्त विद्यमाने गोहरण येथे राबविलेल्या विद्यापीठ स्तरीय जल संधारण शिबीरात पाणी आडवा पाणी जिरवा या माध्यमातून दगडी बंधारा बांधतांना महाविद्यालयीन विद्यार्थी.

Scanned with CamScanner

# मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक

## ❊ कार्यकारी मंडळ ❊

### कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | : | डॉ. तुषार रामकृष्ण शेवाळे |
| सभापती | : | श्री. माणिकराव माधवराव बोरस्ते |
| उपसभापती | : | श्री. राघो काशिराम आहिरे |
| सरचिटणीस | : | श्रीमती नीलिमाताई वसंतराव पवार |
| चिटणीस | : | डॉ. सुनिल उत्तमराव ढिकले |

## ❊ कार्यकारी मंडळाचे तालुका सदस्य ❊

| | | |
|---|---|---|
| इगतपुरी | : | श्री. भाऊसाहेब लक्ष्मण खताळे |
| चांदवड | : | श्री. उत्तम गणपत भालेराव |
| दिंडोरी | : | श्री. दत्तात्रय रामचंद्र पाटील |
| नाशिक | : | श्री. नामदेव नभाजी महाले |
| कळवण | : | श्री. अशोक राजाराम पवार |
| निफाड | : | श्री. प्रल्हाद दादा गडाख |
| नांदगांव | : | श्री. दिलीप रघुनाथ पाटील |
| बागलाण | : | डॉ. प्रशांत उदाराम देवरे |
| मालेगांव | : | श्री. जयंत त्र्यंबकराव पवार |
| येवला | : | श्री. रायभान गंगाधर काळे |
| सिन्नर | : | श्री. हेमंत विठ्ठल वाजे |
| नाशिक ग्रामीण | : | श्री. सचिन पंडीतराव पिंगळे |
| देवळा | : | डॉ. विश्राम मालजी निकम |

## ❊ सेवक सदस्य ❊

| | | |
|---|---|---|
| उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन विभाग | : | श्री. नानासाहेब त्र्यंबक दाते |
| प्राथमिक व माध्यमिक विभाग | : | श्री. गुलाबराव मुरलीधर भामरे |
| प्राथमिक व माध्यमिक विभाग | : | श्रीमती. नंदा अशोक सोनवणे |



Scanned with CamScanner

# महाविद्यालयीन विकास समिती

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. दिलीपराव हरिभाऊ धारराव | : | अध्यक्ष |
| २) | श्री. डॉ. सुनिल मधुकर पाचोरकर | : | सदस्य |
| ३) | श्री. विजय शंकरराव भालेराव | : | सदस्य |
| ४) | श्री. डॉ. विक्रम अशोकराव सलादे | : | सदस्य |
| ५) | श्री. दौलतराव लुंकाजी पाचोरकर | : | सदस्य |
| ६) | श्री. वसंतराव देवराम गवळी | : | सदस्य |
| ७) | श्री. दत्तात्रय मधुकर माळी | : | सदस्य |
| ८) | श्री. विजय ग्यानुजी निखाडे | : | सदस्य |
| ९) | श्री. भाऊसाहेब देवराम भालेराव | : | सदस्य |
| १०) | श्री. पोपटराव पंढरीनाथ पाचोरकर | : | सदस्य |
| ११) | श्री. शंकर शिवराम आहेर | : | सदस्य |
| १२) | श्री. वसंतराव माधवराव वाटपाडे | : | सदस्य |
| १३) | श्री. परशराम पोपटराव पाचोरकर | : | सदस्य |
| १४) | श्री. अशोक नामदेव गचाले | : | सदस्य |
| १५) | श्री. नानासाहेब भिकाजी वाघ | : | सदस्य |
| १६) | प्राचार्य कला व वाणिज्य महाविद्यालय वडनेर भैरव | : | सचिव |
| १७) | प्रा. निशांत डी. वडघुले | : | प्राध्यापक प्रतिनिधी |
| १८) | प्रा. डॉ. दत्तात्रय डी. गव्हाणे | : | प्राध्यापक प्रतिनिधी |



Scanned with CamScanner

# कनिष्ठ महाविद्यालयीन स्थानिक व्यवस्थापन समिती

## कनिष्ठ विभाग

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. हिरामण अशोक शिंदे | : | अध्यक्ष |
| २) | श्री. दिपक रंगनाथ पाचोरकर | : | सदस्य |
| ३) | श्री. मनोहर शंकर पाटोळे | : | सदस्य |
| ४) | श्री. विकास विश्वनाथ पाचोरकर | : | सदस्य |
| ५) | श्री. लक्ष्मण एकनाथ भालेराव | : | सदस्य |
| ६) | श्री. नारायण गोविंद सलादे | : | सदस्य |
| ७) | श्री. दिगंबर माधवराव निखाडे | : | सदस्य |
| ८) | श्री. योगेश अशोकराव साळुंखे | : | सदस्य |
| ९) | श्री. शिवाजी रामचंद्र पवार | : | सदस्य |
| १०) | श्री. अनिल भास्कर पवार | : | सदस्य |
| ११) | श्री. भाऊसाहेब बारकू तिडके | : | सदस्य |
| १२) | श्री. निवृत्ती दामोधर माळी | : | सदस्य |
| १३) | डॉ. श्री. सुनिल गोविंद आहेर | : | सदस्य |
| १४) | श्री. बाळासाहेब पोपट शिंदे | : | सदस्य |
| १५) | श्री. सुनिल बाळासाहेब जाधव | : | सदस्य |
| १६) | प्राचार्य, जनता विद्यालय ॲण्ड ज्यु.कॉलेज, वडनेर भैरव | : | सचिव |



Scanned with CamScanner

# संपादकीय....

संपादक : प्रा. सोमनाथ डी. फुगट

मित्रहो,

महाविद्यालयीन २०१८-१९ 'भैरव' या नियतकालिकाचा **'दुर्ग वैभव'** तिसरा विशेषांक आपल्या हाती देतांना विशेष आनंद होत आहे. महाविद्यालयीन स्तरावरील वाटचालीत विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या सुप्त कलागुणांना विकसित करुन त्यांच्या काळजात घोंगावणाऱ्या भावनिक वादळांना कोणत्या न् कोणत्या माध्यमातून शब्दांच्या व्यासपीठावर घेऊन येणे, त्याच माध्यमातून आजच्या तरुण पिढीला छत्रपती शिवरायांच्या शौर्याची ओळख व्हावी, निसर्गाविषयी प्रेम निर्माण व्हावे, सामाजिक भान जागृत असणारी सुजाण, ससंस्कृत नागरिक समाजात निर्माण व्हावे हाच या नियतकालिकाचा महत्त्वाच उद्देश आहे. इतकेच नाही तर महाविद्यालयाच्या स्थापनेपासूनची वाटचाल आणि विविध समस्यांना सामोरे जाऊन आजपर्यंत साधलेला विकास, विद्यापीठस्तरीय शैक्षणिक, गुणसंपन्न उपक्रमांची विविध स्तरांवरील प्रगती विद्यार्थी व समाजाच्या तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी महाविद्यालयाचा महत्त्वपूर्ण असा अविष्कार म्हणजे 'भैरव...!'

सन २०१६-१७ या वर्षापासून आपण 'भैरव' नियतकालिक विशेषांकाच्या स्वरुपात प्रकाशित एक नवा शैक्षणिक प्रयोग सुरू केला आणि याच भैरवचे समाजस्तरावर अगदी सर्वांनी मनापासून कौतुक केले. सन २०१६-१७ या वर्षी 'विचार संक्रमण' विशेषांक प्रकाशित झाला. सन २०१७-१८ या वर्षी आपण 'हितगुज' विशेषांक प्रकाशित झाला. सन २०१८-१९ या वर्षी आपण **'दुर्ग वैभव'** या नावाने हा विशेषांक तयार केला आहे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना लेखनाद्वारे विचार प्रवृत्त करुन त्यांच्या दृष्टीकोनातून सामाजिक, सांस्कृतिक, राष्ट्रीय, शैक्षणिक, राजकीय व एकूणच जीवन विषयक क्षेत्रातील आपले स्वत:चे तसेच इतर विद्वानांनी मांडलेले विचार संकलित करुन स्वत: आत्मसात करणे व इतरांपर्यंत घेऊन जाणे हे महाविद्यालयीन शिक्षणाचे ध्येय आहे. 'भैरव' मध्ये विद्यार्थ्यांनी मांडलेले विचार हे स्वरचित तसेच संकलित स्वरुपाचे असून यामध्ये संकलित साहित्याचे प्रमाण जास्त आहे. असे असले तरी याद्वारे विद्यार्थ्यांमध्ये वाचन आणि शोधक वृत्तीचा विकास होण्यास मदत होईल. महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. भगत सरांनी या वार्षिक अंकाच्या संपादनाची जबाबदारी माझ्यावरती टाकून जो विश्वास दाखविला त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. या अंकाच्या संपादनात संपादक मंडळ सदस्यांनी केलेल्या तसेच माझे सर्व सहकारी प्राध्यापक बंधू, शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या मदतीशिवाय हा अंक पूर्ण होणे शक्य नाही. म्हणून मी त्यांचेही मन:पूर्वक आभार मानतो. तसेच या अंकाच्या अक्षर जुळवणी व टंकलेखनाची जबाबदारी यशस्वीरित्या व अतिशय कमी कालावधीत पूर्ण करुन दिली ते आमचे स्नेही श्री. विजय बोरखडे (समर्थ प्रिंटींग प्रेस). छपाईची जबाबदारी पूर्ण करणारे म.वि.प्र. प्रिंटींग प्रेस यांच्या मी कायम ऋणात राहू इच्छितो. या अंकासाठी ज्यांनी छायाचित्रे उपलब्ध करुन दिलेत त्या शिवप्रसाद फोटो स्टुडिओचे संचालक श्री. पुरकर साहेब व चि. संदीप (सोनु) यांचेही मन:पूर्वक आभार. तसेच या अंकाच्या संपादनास ज्या ज्ञात-अज्ञातांचे सहकार्य लाभले त्या सर्वांचे मी संपादक या नात्याने ऋण व्यक्त करतो... धन्यवाद.....!

**आपणा सर्वांना नववर्षाच्या हार्दीक शुभेच्छा...!**




Scanned with CamScanner



म. वि. प्र. समाज संस्थेचे माजी सरचिटणीस स्व. डॉ. वसंतरावजी पवार यांच्या प्रतिमेचे पूजन करतांना माजी शिक्षणाधिकारी श्री. अशोकराव सोनवणे, स्था.व्य.स. अध्यक्ष श्री. दिलीपराव धारराव, स्था.व्य.स.सदस्य श्री. परशराम पाचोरकर, प्राचार्य ए. एल. भगत आदी मान्यवर

म.वि.प्र.समाज संस्थेचे माजी सरचिटणीस स्व. डॉ. वसंतरावजी पवार यांच्या पुण्यतिथी निमित्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना माजी शिक्षणाधिकारी श्री. अशोकराव सोनवणे समवेत स्था.व्य.स. अध्यक्ष श्री. दिलीपराव धारराव, सदस्य श्री. विजय निखाडे श्री. परशराम पाचोरकर, प्रा. ए.एल. भगत





म.वि.प्र.समाज संस्थेचे माजी सरचिटणीस स्व. डॉ. वसंतरावजी पवार यांच्या पुण्यतिथी निमित्त विद्यार्थ्यांना डॉ. पवार यांच्या कार्याची ओळख करुन देतांना स्था.व्य.स. अध्यक्ष श्री. दिलीपराव धारराव समवेत माजी शिक्षणाधिकारी श्री. अशोकराव सोनवणे सदस्य श्री. विजय निखाडे श्री. परशराम पाचोरकर, प्रा. ए.एल. भगत

Scanned with CamScanner



भरतीपूर्व प्रशिक्षण शिबीरात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना वडनेर भैरव पोलीस स्टेशनचे ए.पी.आय. श्री. सचिन साळुंखे समवेत प्रा. ए. एल. भगत, प्रा. कैलास सलादे, श्री. संजय भालेराव, प्रा. डी. एच. भगुरे आदी मान्यवर

भरतीपूर्व प्रशिक्षण शिबीरांतर्गत विद्यार्थ्यांना मैदानी स्पर्धांच्या संदर्भात प्रात्यक्षिकाच्या माध्यमातून माहिती देतांना क्रीडा शिक्षक प्रा. गवळी, ए.पी.आय. श्री. सचिन साळुंखे, प्राचार्य ए.एल. भगत व महाविद्यालयीन विद्यार्थी.





भरतीपूर्व प्रशिक्षण शिबीरांतर्गत प्रात्यक्षिकाच्या माध्यमातून सराव करतांनाा महाविद्यालयीन विद्यार्थी समवेत ए.पी.आय. श्री. सचिन साळुंखे, प्राचार्य ए. एल. भगत, प्रा. डी. डी. गव्हाणे व महाविद्यालयीन विद्यार्थी.

Scanned with CamScanner



महाविद्यालयीन विद्यार्थी बसचे उद्घाटन करतांना म.स्था. व्य.स. अध्यक्ष श्री. दिलीपराव धारराव, स्था.व्य.स.सदस्य श्री. डी. एल. पाचोरकर, श्री. पोपटराव पाचोरकर, श्री. दत्तात्रय माळी, श्री. परशराम पाचोरकर, प्राचार्य ए. एल. भगत उपप्राचार्य श्री. एन. डी. वडघुले समवेत प्राध्यापक वृंद व महाविद्यालयीन विद्यार्थी.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करतांना श्रीमती डॉ. सायली आचार्य, प्राचार्य ए. एल. भगत, प्रा. भगुरे, गांगुर्डे, राठोड, कुमावत, धेबडे, पाटील, जाधव, गवळी, वडघुले, लोखंडे आदी मान्यवर






रा. से. यो. अंतर्गत महाविद्यालयात राबविलेल्या रक्तदान शिबीर प्रसंगी रक्तदानाचा हक्क बजावतांना महाविद्यालयीन विद्यार्थी समवेत प्राचार्य ए. एल. भगत, रा.से.यो. अधिकारी प्रा. डी. एच. भगुरे, प्रा. एम. आर. धेबडे आदी मान्यवर

Scanned with CamScanner



आंतर-महाविद्यालयीन कबड्डी (मुली) स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी खेळाडू विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना म.स्था.व्य.स.अध्यक्ष श्री. दिलीपराव धारराव, व्यासपीठावर ए.पी.आय. श्री. सचिन साळुंखे, स्था.व्य.स.सदस्य श्री. डी. एल. पाचोरकर, श्री. दत्तात्रय माळी, श्री. डॉ. विक्रम सलादे, प्राचार्य ए. एल. भगत व विविध महाविद्यालयातील क्रीडा शिक्षक

आंतर-महाविद्यालयीन कबड्डी (मुली) स्पर्धे दरम्यान खेळाडू विद्यार्थिनींची ओळख करुन घेतांना म.स्था.व्य.समिती अध्यक्ष श्री. दिलीपराव धारराव, श्री. डी. एल. पाचोरकर, श्री. डॉ. विक्रम सलादे, प्राचार्य ए. एल. भगत, क्रीडा शिक्षिका डॉ. एस. पी. जगताप





आंतर-महाविद्यालयीन कबड्डी स्पर्धेतील एक रोमांचकारी क्षण

Scanned with CamScanner

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत राबविल्या गेलेल्या डॉ. एम. आर. जयकर, सॉफ्ट स्किलच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना प्रा. डॉ. डी.पी. पवार (आत्मविश्वास), प्रा. एस. पी. जगताप (सकारात्मकता), श्रीमती डॉ. एम. एच. आहेर, (भाषिक कौशल्ये)कार्यक्रम अधिकारी श्रीमती प्रा. के. एल. शिंदे.









लोकमान्य टिळक व शाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करतांना श्री. पंढरीनाथ पाचोरकर, प्राचार्य ए. एल. भगत, उपप्राचार्य श्री. एन. डी. वडघुले प्रा. एस. डी. फुगट, प्रा. एस. जी. गोरे, प्रा. एस. आर. दौंड, प्रा. आर. एन. पाटील व महाविद्यालयीन विद्याथी.



योग दिनानिमित्त योगासनांचे प्रात्यक्षिक करतांना महाविद्यालयीन प्राध्यपक वृंद व विद्यार्थी



दै. सकाळ समुहाअंतर्गत महाविद्यालयीन स्तरावर घेण्यात आलेल्या यीन इलेक्शनमध्ये विजयी झालेल्या कु. प्रताप बोराडे या विद्यार्थ्याचा सत्कार करतांना प्राचार्य श्री. ए. एल.भगत, उपप्राचार्य श्री. एन. डी. वडघुले यीन चे समन्वयक श्री. जगदाळे व प्राध्यापक वृंद समवेत विद्यार्थी

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व बहि:शाल शिक्षण मंडळ यांचे संयुक्त विद्यमाने
डॉ. बाबासाहेब जयकर व्याख्यानमालेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना
श्री. डॉ. स्वप्निल निर्मल (स्वत्वाची जाणीव), श्री. डॉ. नरेंद्र पाटील (छ. शिवराय आणि आजचा समाज)
या समवेत प्राचार्य श्री. ए. एल. भगत, उपप्राचार्य श्री. एन. डी. वडघुले, प्रा. डी. एच. भगुरे, केंद्रकार्यवाह प्रा. एस. डी. फुगट





रा.से.यो. अंतर्गत राबविलेल्या मतदार जागृती अभियानात प्रभात फेरीतून जागृती करतांना महाविद्यालयीन विद्यार्थिनी.



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व बहि:शाल शिक्षण मंडळ यांचे संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या यशवंतराव चव्हाण व्याख्यानमालेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना प्रा. हेमंत टिळे (हुतात्मा - अनंत कान्हेरे), प्राचार्य के. एम. मोरे (आनंदी जिवनाची गुरुकिल्ली), प्राचार्य बापुराव देसाई (भारतीय संस्कृती जगात प्रथम क्रमांक) या समवेत उपप्राचार्य श्री. एन. डी. वडघुले, प्रा. डी. एच. भगुरे, केंद्रकार्यवाह प्रा. एस. डी. फुगट







Scanned with CamScanner



रा.से.यो. व गोहरण ग्रामपंचायत यांचे संयुक्त विद्यमाने राबविलेल्या वृक्षारोपन महोत्सव प्रसंगी वृक्षारोपन करतांना श्रीमती धाकराव समवेत श्रीमती भारती जाधव म.वि.प्र. संचालक श्री. उत्तम बाबा भालेराव, पं.स.सदस्य श्री. नितीनदादा आहेर, म.स्था.व्य.स.अध्यक्ष श्री. दिलीपराव धारराव श्री. राजाभाऊ भालेराव, सरपंच ॲड. पवनकुमार जाधव आदी.

रा.से.यो. व गोहरण ग्रामपंचायत यांचे संयुक्त विद्यमाने राबविलेल्या वृक्षारोपन महोत्सव प्रसंगी वृक्षारोपन करतांना महाविद्यालयीन विद्यार्थी व प्राध्यापक वृंद





Scanned with CamScanner

रा.से.यो. व गोहरण ग्रामपंचायत यांचे संयुक्त विद्यमाने राबविलेल्या वृक्षारोपन महोत्सव प्रसंगी आपले विचार व्यक्त करतांना म.वि.प्र.समाज संस्थेचे चांदवडचे संचालक मा. श्री. उत्तम बाबा भालेराव, पं.स.सदस्य श्री. नितीन दादा आहेर, सरपंच ॲड. श्री. पवनकुमार जाधव, समवेत स्था.व्य.स. अध्यक्ष श्री. दिलीपराव धारराव, शा.व्य.स.अध्यक्ष (सनराईज स्कूल) राजाभाऊ भालेराव, श्री. दत्तात्रय माळी, श्रीमती धाकराव, प्राचार्य श्री. ए. एल. भगत, ग्रामसेवक व सन्माननीय ग्रामस्थ.











राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत राबविलेल्या मतदार जागृती अभियान प्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना चांदवडचे तहसिलदार श्री. शरद मंडलिक, समवेत मंडल अधिकारी श्री. विजय भंडारे, वडनेर भैरवचे उपसरपंच श्री. रावसाहेब भालेराव, श्री. किरण आवारे, प्राचार्य श्री. ए. एल. भगत, रा.से.यो.अधिकारी प्रा. डी. एच.भगुरे आदी

रा.से.यो.अंतर्गत मतदार जागृती अभियानात गाव फेरीच्या माध्यमातून प्रचार करतांना विद्यार्थिनी







सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व बहि:शाल शिक्षण मंडळ यांचे संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या ज्ञान विज्ञान वाचन चळवळ व्याख्यानमालेत बाई माणुस, आधे अधुरे, वाट तुडवतांना या वाचनीय पुस्तकांवरती विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना श्रीमती डॉ. सायली आचार्य, श्रीमती डॉ. दिपा कुचेकर, श्रीमती डॉ. लता पवार या समवेत प्राचार्य श्री. ए. एल. भगत,केंद्रकार्यवाह प्रा. एस. डी. फुगट, प्रा. श्रीमती के. एल. शिंदे, प्रा. श्रीमती एम. एम. भोसले









## महाविद्यालयीन सहलीतील छायाचित्रे













# महाविद्यालयीन सहलीतील छायाचित्रे












Scanned with CamScanner

समाज दिन प्रसंगी कर्मवीरांच्या कार्याचा मागोवा विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवितांना मा. श्री. राजाराम मुंगसे, म.वि.प्र. समाज संचालक मा. श्री. उत्तम बाबा भालेराव, म.स्था.व्य.स.अध्यक्ष मा. श्री. दिलीपराव धारराव, समवेत स्था.व्य.स.सदस्य श्री. परशराम पाचोरकर, प्राचार्य श्री. ए. एल. भगत व सन्माननीय ग्रामस्थ.







Scanned with CamScanner

# सांस्कृतिक युवा महोत्सव क्षणचित्रे....!















Scanned with CamScanner

# प्राचार्यांचे मनोगत...

'बहुजन हिताय बहुजन सुखाय' हे ध्येय उराशी बाळगून तळागाळातील समाजाचा विकास करण्यासाठी १०० वर्षांपूर्वी कर्मवीरांनी मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेची स्थापना केली.

यशस्वी जीवनाचा मूलमंत्र म्हणजे 'शिक्षण'. कारण मानवी जीवनाचा सर्वांगीण विकास हा शिक्षणावरच अवलंबून आहे. शिक्षणाची दिशा ही माणसाच्या संपूर्ण विकासासाठी आणि त्याच्या मुलभूत अधिकारांसाठी महत्त्वाची असते. म्हणूनच उच्च शिक्षणामध्ये नवीन प्रवाह येत आहेत. यातूनच उद्याची वैभवशाली भारताचे आधारस्तंभ होतील यात शंकाच नाही. सामाजिक स्तरावर जगण्याचे भान निर्माण करत विद्यार्थ्यांनी सामाजिक बांधिलकी स्विकारुन समाज विकासास प्राधान्य द्यावे. हेच महाविद्यालयाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

इतिहासाची पाने चाळली असता छत्रपती शिवरायांनी रयतेचे राज्य निर्माण व्हावे. हाच उद्दात हेतू उराशी बाळगुन स्वराज्याची स्थापना केली. आणि आज आपण याच स्वराज्याचे एक घटक आहोत. म्हणूनच महाविद्यालयाने यावर्षी 'भैरव' नियतकालिकाच्या माध्यमातून **'दुर्ग वैभव'** या विशेषांकाची बांधणी केली. यातून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम तसेच सामाजिक स्तरावरील विविध घटकांच्या संदर्भात आत्मियता निर्माण व्हावी तसेच विद्यार्थ्यांमध्ये नैतिकमूल्य कृती स्वरुपात आणण्यासाठी प्रयत्न केला आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक गुणांबरोबरच सामाजिक नितीमूल्यांची पायाभरणी व्हावी यासाठी महाविद्यालय विविध उपक्रमांचे आयोजन करते. महाविद्यालयीन 'भैरव' नियतकालिकाचा **'दुर्ग वैभव'** हा विशेषांक आपल्या हाती देतांना महाविद्यालयाचा प्राचार्य म्हणून मला मनस्वी आनंद होत आहे.

या अंकात विद्यार्थ्यांनी ऐतिहासिक लेखनातून इतिहास विषयक प्रेम, विचार, विविध लेख, पोवाडा व काव्य स्वरुपात मांडलेले आहेत. या नियतकालिकातून विद्यार्थ्यांच्या प्रगल्भतेला चालना मिळणार आहे. यातील लेख उद्‌बोधक व अंर्तमुख करायला लावणारे आहेत. यात शंकाच नाही. धन्यवाद....!

प्राचार्य
**मा. श्री. ए. एल. भगत**
कला व वाणिज्य महाविद्यालय, वडनेर भैरव



Scanned with CamScanner

# अनुक्रमणिका
## (गद्य विभाग)



| अ.क्र. | शिर्षक | नांव |
|---|---|---|
| १) | हरिश्चंद्र गड | तिडके शुभांगी मोहन |
| २) | साक्षात शिवरायांचा कांचनस्पर्श | सावंत प्रियंका विलास |
| ३) | डुबेर गड | सावकार वृषाली राजाराम |
| ४) | ऐतिहासिक स्थळ – धोडप किल्ला | पाचोरकर निकिता रतन |
| ५) | भास्करगड | सलादे सोनाली शिवाजी |
| ६) | रामशेज किल्ला | शेळके सोनाली संपत |
| ७) | मार्कण्डेय गड | शेळके सोनाली संपत |
| ८) | श्री केद्राई माता नम: | गुंजाळ कविता भाऊसाहेब |
| ९) | अंजनेरी | गचाले अर्चना बाळासाहेब |
| १०) | शिवकालीन चलन | पवार संजीवनी निवृत्ती |
| ११) | रामशेज किल्ला | तिडके शुभांगी मोहन |
| १२) | श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे – अजिंक्य योध्दा | सावकार वृषाली राजाराम |
| १३) | हिरोजी इंदलकर | मोगल वृषाली संपत |
| १४) | संताजी घोरपडे – मराठा साम्राज्याचे सरसेनापती | तिडके नंदकुमार विष्णु |
| १५) | येसाजी कंक | तिडके शुभम लक्ष्मण |
| १६) | कान्होजी आंग्रे | जगताप पुजा सुनिल |
| १७) | मुल्हेर किल्ला | सावकार वृषाली राजाराम |
| १८) | भारतीय संविधान जाणिवेला अभिप्रेत आम्ही भारतीय लोक आहोत काय ? | गांगुर्डे निकिता लक्ष्मण |
| १९) | भारतीय समाजातील स्त्रीचे स्थान | निखाडे वैष्णवी दिगंबर |
| २०) | खरंच ! फक्त तुच गं आई... | शेळके सोनाली संपत |
| २१) | यश म्हणजे काय ? | शेळके सोनाली संपत |
| २२) | केवळ माझा सह्यकडा (सह्याद्री) | साळुंके गायत्री बाजीराव |
| २३) | साल्हेर उत्तंग आणि वज्रनिर्धारी | प्रा. डी.एच. भुगरे |
| २४) | चांदवडचा प्रसिध्द रंगमहाल | भालेराव हर्षल सिताराम |
| २५) | वेशीवरच्या पाऊलखुणा | सातभाई भारती अशोक |
| २६) | मुलीने वडिलांशी केलेली हितगुज | सातभाई भारती अशोक |





Scanned with CamScanner

# (पद्य विभाग)

| | | |
|---|---|---|
| १) | मलाही आवडेल पाऊस व्हायला | निखाडे वैष्णवी दिगंबर |
| २) | अस्तित्व | साळुंके गायत्री बाजीराव |
| ३) | शिवरायांची आरती | गचाले अर्चना बाळासाहेब |
| ४) | मतदार राजा की उमेदवार राजा | गांगुर्डे निकिता लक्ष्मण |
| ५) | येथेच घडले हिंदुस्थानचे राजे - शिवछत्रपती | गचाले अर्चना बाळासाहेब |
| ६) | तानाजी मालुसरेंचा पोवाडा | गचाले अर्चना बाळासाहेब |
| ७) | कुटुंबाची आठवण | कतवारे निलम रामदास |
| ८) | छत्रपतींचा पोवाडा | गचाले अर्चना बाळासाहेब |
| ९) | फाळणी | गचाले अर्चना बाळासाहेब |
| १०) | मैत्री | कतवारे निलम रामदास |
| ११) | छत्रपती शिवाजी महाराजांचा पोवाडा | शेळके सोनाली संपत |
| १२) | मैत्रीच्या अंगणात | गांगुर्डे मोहिनी मोतीराम |
| १३) | नको ती गोळी | निखाडे वैष्णवी दिगंबर |
| १४) | कधीतरी असेही जगुन बघा | निखाडे वैष्णवी दिगंबर |
| १५) | संभाजी राजांचा पोवाडा | पवार संजीवनी निवृत्ती |
| १६) | आई - बाबा | कतवारे निलम रामदास |
| १७) | निरंतर साथ | गांगुर्डे मोहिनी मोतीराम |
| १८) | स्वाभिमान | निखाडे वैष्णवी दिगंबर |
| १९) | व्यथा अनमोल वृक्षाची | पाचोरकर श्रध्दा बाळासाहेब |
| २०) | जनतेच्या अपेक्षा | गांगुर्डे निकिता लक्ष्मण |
| २१) | प्रिय अतिरेक्यांनो | निखाडे वैष्णवी दिगंबर |
| २२) | आई | गवळी रविंद्र संजय |
| २३) | राजा एक दिवसांचा | आहेर सुमित बंडु |
| २४) | मैत्रीणी | महाले निशा साहेबराव |
| २५) | गारपीट | पाटील ऋषिकेश कैलास |
| २६) | ग्रुप | महाले निशा साहेबराव |
| २७) | बाबा | सातभाई भारती अशोक |
| २८) | आई | पाटील ऋषिकेश कैलास |
| २९) | आयुष्य | आहेर सुमित बंडु |
| ३०) | प्रेम | पाटील ऋषिकेश कैलास |
| ३१) | मैत्री | निखाडे वैष्णवी दिगंबर |
| ३२) | मुलगी | पाचोरकर निकिता रतन |



Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| ३३) | माझा शेतकरी राजा | पाचोरकर सोनाली संतोष |
| ३४) | जिवनात नाती | पाचोरकर निकिता रतन |
| ३५) | आई ! मला जन्म घेऊ दे ...! | शेळके सोनाली संपत |
| ३६) | आयुष्य | हाटकर गायत्री संजय |
| ३७) | शिवकाव्य | शेळके सोनाली संपत |
| ३८) | बाप | आवारे आश्विनी अरूण |
| ३९) | संदेश | शेळके सोनाली संपत |
| ४०) | तानाजींचा पोवाडा | आवारे आश्विनी अरूण |
| ४१) | जीवन | आवारे आश्विनी अरूण |
| ४२) | सोबत | पाटील ऋषिकेश कैलास |
| ४३) | आई | आवारे आश्विनी अरूण |
| ४४) | गाव तसा आमचा लई भारी | निखाडे प्राजक्ता दत्तात्रय |
| ४५) | आश्वासन | आवारे आश्विनी अरूण |
| ४६) | निर्णय | गवळी रविंद्र संजय |
| ४७) | आम्ही भारतीय | सोनवणे जयश्री भिमा |
| ४८) | तु माझी सखी | पाचोरकर अलका केशव |
| ४९) | मुलगी कशी असावी ? | तिडके शितल बाळासाहेब |
| ५०) | काळीज | गांगुर्डे अर्चना भाऊसाहेब |
| ५१) | शिवाजी महाराजांचा पोवाडा | कोतवाल गौरव निलेश |
| ५२) | आयुष्य हे असंच जगायचं असतं | गुंजाळ कविता भाऊसाहेब |
| ५३) | तुच ती ..... तीच तू | तिडके शुभांगी मोहन |
| ५४) | जीवनाचे ऋतु | तिडके शुभांगी मोहन |
| ५५) | शेतकरी | गुंजाळ कविता भाऊसाहेब |
| ५६) | आठवण तुझी येता | आहेर मोहिनी दत्तात्रय |
| ५७) | क्रिकेट | गुंजाळ कविता भाऊसाहेब |
| ५८) | हे असंच चालायचं | वाटपाडे पुजा अरूण |
| ५९) | माझी आजी | आहेर मोहिनी दत्तात्रय |
| ६०) | अशीच आहे ती | वाटपाडे पुजा अरूण |
| ६१) | जीन्हे जन्म दिलाय मला .. | सोनवणे जयश्री भिमा |
| ६२) | प्रेम | वाटपाडे पुजा अरूण |
| ६३) | आयुष्य | आवारे आश्विनी अरूण |
| ६४) | आठवण | वाटपाडे पुजा अरूण |
| ६५) | कारगील | वक्ते माधुरी संजय |
| ६६) | भावना | वक्ते माधुरी संजय |
| ६७) | वडनेर भैरवचे कॉलेज म्हणजे | वक्ते माधुरी संजय |
| ६८) | कोण होती ती... | वक्ते माधुरी संजय |
| ६९) | शेतकरी | चौरे अमृता रमेश |



Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| ७०) | माझा बाप | |
| ७१) | लेक | सातभाई भारती अशोक |
| ७२) | साद आईची | चौरे अमृता रमेश |
| ७३) | मला पुन्हा एकदा शाळेत जायचं | सलादे सोनाली शिवाजी |
| ७४) | बाप | हिंगे आदिती सतिष |
| ७५) | बाबा | सातभाई भारती अशोक |
| ७६) | मर्द मराठा | सातभाई भारती अशोक |
| ७७) | जीवन | हिंगे आदिती सतिष |
| ७८) | शिवाजी महाराजांचा पोवाडा | हिंगे आदिती सतिष |
| ७९) | मैत्री | थोरमिसे स्वाती अशोक |
| ८०) | मैत्री | धनाईत अंकिता भिकाजी |
| ८१) | शब्द | जंगम विशाल सुरेंद्र |
| ८२) | Life A to Z | तिडके शितल बाळासाहेब |
| ८३) | Life | Vakte Madhuri Sanjay |
| ८४) | Wisdom can alot be dought is if only cought | Vakte Madhuri Sanjay |
| ८५) | Daddy | salunke Gayatri Bajirao |
| ८६) | Until we Meet Again | Satbhai Bharti Ashok |
| ८७) | Life is Accountancy | Satbhai Bharti Ashok |
| | | Tidke Shital Balasaheb |


* अहवाल विभाग *



Scanned with CamScanner

# हरिश्चंद्र गड

तिडके शुभांगी मोहन, द्वितीय वर्ष (बी.ए.)




कोकणकडा म्हणजे हरिश्चंद्रगडावरील सर्वात मोठे आकर्षण. कोकणवाडा म्हणजे गिर्यारोहकांना आवडीचे स्थान. अर्ध्या किलोमीटर परिघाचा, वाटीसारखा अर्धगोल आकाराचा काळभिन्न रौद्रभीषण कोकणवाडा हा एकमेव असावा. कड्याची सरळधार १७०० फूट भरेल. पायथ्यापासून कड्याची उंची साधारणत: ४५०० फूट आहे. संध्याकाळच्या वेळी सुर्यास्ताचा नयनरम्य सोहळा या कड्यावरुन पाहण्यात जो आनंद आहे. तो अवर्णनीय आहे. गडावर चहा-पाण्याची व जेवणाची सोयसुध्दा उपलब्ध आहे. पावसाळ्यात मात्र या गडाचे सौंदर्य काही औरच असते. या गडाएवढी विविधता इतरत्र कुठेही आढळणार नाही. करवंद, कारवीच्या जाळी, धायटी उक्षी, मदनवेल, कुडा, पांगळी, हेकळ, पानफुटी, गारवेल इ. वनस्पती येथे आढळतात.

**गडावर जाण्याच्या वाटा :-**

सर्वात प्रचलित असणारी वाट ही खिरेश्वर गावातून गडावर येते. या वाटेन येण्यासाठी पुण्याहून आळेफाटा मार्गे अथवा कल्याणहून मुबाड-माळशेज घाटमार्गे खुबी फाट्यास उतरावे. खुबी फाट्यावरुन धरणावरुन चालत गेल्यावर ५ कि.मी. अंतरावर खिरेश्वर गाव लागते. हरिश्चंद्रगडावर जाताना खिरेश्वर गावातून अदमासे एक कि.मी. अंतरावर प्राचीन शिवमंदिर आहे. हे मंदिर अकराव्या शतकातील यादव कालीन मंदिर आहे. मंदिराच्या बाहेरील सभामंडप छताला शिल्प पट्टीका बसवलेली आहे. आतील गाभारा असलेल्या दाराच्या माथ्यावर शेषशैय्येवरील विष्णु व परिवाराचे अप्रतिम कोरीव शिल्प आहे. मुषकवाहन मकर - रती या मंदिराला नागेश्वराचे मंदिर असेही म्हणतात. या गावातून दोन वाटा गडावर जातात. एक वाट ही टोलार खिंडीतून गडावर सुमारे ३ तासात मंदिरापर्यंत पोहोचते. दुसरी वाट ही राजदरवाजाची वाट आहे. ही वाट पूर्वी प्रचलित होती. आता मात्र वाटाड्याशिवाय या वाटेने गडावर जाऊ नये. या वाटेन आपण गडावर जुन्नर दरवाजापाशी पोहोचतो. या मार्गाने जाताना गावातील विहिरीतून पाणी भरुन घेतले पाहिजे. सवेर्णे-बेलपाडा-साधले असा घाटमार्ग गड सर करण्यासाठी एक सावेर्णे-बेलपाडा-साधले असा घाट मार्ग आहे; परंतु हा मार्ग फारच अवघड असल्याने प्रस्तरारोहणाचे तंत्र अवगत असलेल्यांनीच हा मार्ग अवलंबावा. या मार्गे येण्यासाठी कल्याण-मुरबाड मार्ग माळशेज घाट चालू होण्यापूर्वी सावर्णे गावात उतरावे. येथून बेलपाडा या कोकणकड्याच्या पायथ्याच्या गावात यावे. येथून कड्यातून काढलेल्या साधले घाटाच्या सहाय्याने कोकणकड्याच्या पठारावर जाता येते. या वाटेने मंदिर गाठण्यास सुमारे दीड दिवस लागतो. गडावर हरिश्चंद्रेश्वर मंदिराच्या मागच्या गुहेत किंवा गणेशगुहा व आजुबाजूच्या गुहेत राहता येते. गडावर जेवणाची सोयही उपलब्ध आहे. पाणी विपुल प्रमाणात उपलब्ध आहे. खिरेश्वर मार्ग ४ तास तर पाचनई मार्गे तीन तास लागतात.

(संकलित)



# साक्षात शिवरायांचा कांचन स्पर्श

सावंत प्रियंका विलास, प्रथम वर्ष (बी.ए.)

छत्रपती शिवरायांच्या पदस्पर्शाने पावन झालेले किल्ले नाशिक परिसरात तसे तुरळकच. सुरतेची लूट करुन राजे परतत असतांना चांदवडजवळच्या कांचनबारीमध्ये मराठ्यांची मोगलांशी तुंबळ लढाई झाली. ज्या किल्याच्या साक्षीने राजे इथे मोगलांशी लढले तो किल्ला म्हणजे 'कांचन'. ऐतिहासिक सुवर्णक्षणाचा साक्षीदार असलेल्या या किल्यावर एकदा जायलाचं हवे.

**असा आहे कांचन किल्ला :-**

रांग – सातमाळ

उंची – ३७२० फूट

पाथ्यालगचे गांव – कांचनवाडी/लदारी

अंतर – नाशिकपासून ६५ कि.मी.

चढाई श्रेणी – मध्यम

वेळ – एकूण ४ ते ५ तास

तो काळ १६७० मधला. सुरतेवरील स्वारीनंतर परत निघालेले राजे साल्हेरजवळुन सातमाळ रांग ओलांडून पुण्याकडे जाणार याची कुणकुण मुघलाचा सुभेदार शहाजादा मुअज्ज़म याला लागली. त्याच्या आदेशाने दाऊदखान मराठ्यांशी दोन हात करण्या साठी निघाला. चांदवडला आल्यावर त्याला समजले की, कांचनबारीतून राजे व त्यांचे सैन्य पुढे जाणार. मग तेथेच मराठ्यांना गाठायचे. तिकडे चाणाक्ष राजांनीही जाणले की, मुघल आपल्याला खिंडीत भिडणार. अंदाज खरा ठरला. कांचनबारीच्या पायथ्याशी दोन्ही सैन्यात तुंबळ युध्द झाले. मोहबतखान, दाऊदखानाशी राजे लढले. अन् मराठे विजयी झाले.

ज्या किल्ल्याच्या साथीने महाराजांनी मुघलांशी दोन हात केले. तो कांचना ट्रेकर्सप्रमाणेच इतिहास प्रेमींनाही खुणावत आला आहे. तिथे जाण्यासाठी नाशिकहून वडाळीभोई गाठावे. तिथुन किल्ल्याकडे जाण्यासाठी दोन मार्ग आहे. पहिला मार्ग धोडांबेच्या अलिकडे उजवीकडून कांचनबारीकडे जाण्यास बारी ओलांडून किल्ल्याच्या उत्तर बाजूने चढाई करायची. दुसरा मार्ग वडाळीभोईतून सटाणा मार्गावरील खेलदरी फाट्यावर उतरुन किल्ल्याच्या दक्षिण बाजूने चढाई करायची. कोणत्याही बाजूने गेलो तरी आपण किल्ल्याच्या मधोमध असणाऱ्या खिंडीपर्यंत येतो. तिथून दक्षिणेकडे वळल्यास उजवीकडचा रस्ता कांचन या नावाने ओळखल्या जाणाऱ्या माचीकडे जातो. तर डावा रस्ता कांचनाकडे.

पहिल्यांदा माचीकडे वळून पुढे कातळकोरीव पायऱ्या चढून उध्वस्त दरवाजापर्यंत आपण येतो. उत्तराभिमुख दरवाजा, बाजूला तटबंदी आहे. तेथून माथ्यावर येताच कांचनाचे भारदस्त दर्शन घडते.

पश्चिमेला बालेकिल्ला सारख्या भागाकडे निघायचे. वाटेत एक मोठी गुहा आहे, ती सगळ्यांचे लक्ष वेधते. कातळातील टाके दुसरे एक प्रवेशद्वार. कबर आदी अवशेष या माचीवर दिसतात. पुन्हा खिंडीत येऊन कांचनाकडे रस्ता जातो. तिथे दहा टाक्यांचा समुह आहे. त्यातील काही पिण्यायोग्य पाणी आहे. मग पूर्वेला कांचनाच्या बालेकिल्याकडे यायचे. कोरीव पायऱ्या चढून माथ्याकडे जायचे. वरही पाच कोरीव टाके आहेतच. पूर्वेला भलामोठा सुळका आहे. तिथून चहूबाजूचे विलोभनीय दृश्य दिसते. पूर्वेला भावडबारी, केळधेर, इंद्राई, चांदवड तर पश्चिमेला इखारा, सुळका, धोडप, खळा जवळा मार्कण्डेय हे किल्ले डोंगर दिसतात. या ऐतिहासिक ऐवजाची श्रीमंती नजरेत साठवत अन् शिवरायांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या मातीतले चैतन्य अनुभवत परतीला निघायचे....!! (संकलित)

## सुंदर विचार

वाट पाहण्यांपेक्षा वाट लावणारे खूप असतात.
जमिनीवर उभं राहून आकाशाला हात लावणारे खूप असतात.
सर्वांच्याच आयुष्यात दु:ख भरभरुन असतं,
कारण सुख देणाऱ्यांपेक्षा दु:ख देणारेच खूप असतात.

**- वाटपाडे पुजा अरुण**, द्वितीय वर्ष (बी.कॉम)

## चारोळी

आयुष्याचं एक वैशिष्ट्य आहे
ते कधीच कोणासाठी थांबत नाही
वेळ थांबला तरी
आयुष्य कधीच झुकत नाही.

**- गांगुर्डे निकिता लक्ष्मण**, तृतीय वर्ष (बी.ए.)

## मलाही आवडेल पाऊस व्हायला....

आवडेल मलाही पाऊस व्हायला,
न सांगता तुझ्या भेटीला यायला,
धुंद होऊन तुझ्यावर बरसायला.....
केसांमधून पाठीवर हळूवार ओघळायला
अंगावरच्या काट्याची वाट तुडवायला
आवडेल मलाही पाऊस व्हायला....
गंध होऊन श्वासात तुझ्या मिसळायला,
श्वासातल्या उबेत मनसोक्त डुबायला,
काळ्या ढगांतून पळून यायला
अलगद तुझ्या कुशीत शिरायला..
आवडेल मलाही पाऊस व्हायला
नकळत तुझ्या हृदयात शिरायला
हृदयातच एक मेणाचं खोपटे बांधायला...
तुझ्या स्वप्नात येऊन जुला जगवायला
काळजाचा तुझ्या वेध घ्यायला
आवडेल मलाही पाऊस व्हायला...
हातात हात घालून तुझ्या रानमोळ हिंडायला
पंखात तुझ्या घेऊन भरारी घ्यायला
आठवण बनून तुझ्या डोळ्यात उतरायला
अश्रूमध्ये आनंदाची साखर मिसळायला...
आवडेल मलाही पाऊस व्हायला
एकट्या मनाची सोबत करायला
कोणाच्या तरी चेहऱ्यावरील हसू व्हायला...
भाळशील का तू माझ्या या रुपाला
सांग ना जमेल का तुला साथ द्यायला
तरच आवडेल मला मनापासून पाऊस व्हायला...

**- निखाडे वैष्णवी दिगंबर**, तृतीय वर्ष (बी.ए.)



Scanned with CamScanner

# डुबेर गड

कु. वृषाली सावकार, द्वितीय वर्ष (बी.ए.)



श्रीमंत थोरल्या बाजीराव पेशव्यांचे जन्मस्थळ डुबेर, ता. सिन्नर, जि. नाशिक. मराठेशाहीचा झेंडा अटकेपार फडकवणाऱ्या महापराक्रमी व अजेय पेशव्याचे जन्मस्थान नाशिक जिल्ह्यात आहे. हे अनेकांना ठाऊक देखील नाही. नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यात डुबेरगड नावाचा एक छोटेखानी गड आहे. गडाचा पायथा म्हणजे डुबेर गाव. या गावात 'बर्वे वाडा' नावाचा एक सुमारे ३०० वर्षापूर्वीचा वाडा आहे. अजूनही सुस्थितीत असलेला २ बुरुजांचा अन् ६ फूट जाड तट भिंतीचा हा वाडा म्हणजे मल्हार दाजी बर्वे यांचा वाडा. हे मल्हार म्हणजे राधाबाईचे सख्खे बंधू. याच वाड्यात सन १९७० भाद्रपद महिन्यात राधाबाईच्या पोटी पेशवे बाजीराव पहिले यांचा जन्म झाला. फार पूर्वीचे अनेक डोंगरांच्यामधे वसलेले अन् गवताने व्यापलेले हे गाव. दुरुन दृष्टीस न पडणारे अन् गवतात व गर्द वनराईत झाडी झुडपात डुबलेले म्हणून गावाला हे डुबेरे नाव पडले.... अशी कथा बर्वे आजोबांनी सांगितली. सन १६७९ मध्ये साल्हेर सालोटाच्या लढाई नंतर छत्रपती शिवाजी राजे पुण्यास परतत असतांना संगमनेर जवळ मोगल सरदाराने वाट अडविली. त्यामुळे बहिर्जी नाईक यांनी शिवाजी राजांना लपत छपत या डुबेरे गावात आणले. एक दिवस येथे एका झोपडीमध्ये मुक्काम करुन राजे २२ नोव्हेंबर १६७९ रोजी विश्रामगडावर १० दिवसांच्या मुक्कामासाठी गेले. हे मल्हार उदरनिर्वाहासाठी या भागात आले होते. तारा राणींच्या कारकीर्दीत भोसले घराण्याने बर्वे घराण्यास येथील गाई, बैलांची मोठ्या प्रमाणावर पैदास करुन चांगल्या प्रतीचे बैल तोफांचे गाडे हाकण्याच्या कामी पाठवण्याची व्यवस्था करण्याची जबाबदारी दिली. या भागात मोठ्या प्रमाणात चराऊ गवत वाढत असे. त्यामुळे कुरणासाठी ही जागा योग्य होती.

पेशव्यांची पत्नी राधाबाईचे माहेर कोकणात; परंतु त्या गरोदर असताना (भाद्रपद) पावसाळ्याचे दिवस होते. अशा वेळेस त्यांना माहेरी कोकणात पाठवण्याऐवजी त्यांचे बंधू जे घाटावर राहत त्यांच्या घरी प्रसूतीसाठी पाठवण्यात आले. याच राधाबाईच्या पोटी पेशवे बाजीराव पहिले यांचा जन्म झाला. वाड्यातील ती खोली अन् पलंग अजूनही सुस्थितीत आहेत. सध्या वाड्यात श्री. जयंत बर्वे व प्रा. चंद्रशेखर बर्वे, ॲड. सुहास बर्वे यांचा निवास आहे. बर्वे घराण्याची ही अकरावी पिढी. बर्वे तसे मुळचे कोकणातील नेवरे गावचे... बाजीरावाची जन्मकथा व इतिहास डुबेरकर बर्वे कुतूहलपणे व अभिमानाने सांगतात. प्रा. चंद्रशेखर हे कामा निमित्त सिन्नर येथे निवासाला असतात. वाड्यातील बहुतेक गोष्टी पुरातन असून अजुनही सुस्थितीत आणि ४०० वर्षानंतर देखील वापरात आहेत. लाकडी खांबावरचे नक्षीकाम सुरेख आहे.



Scanned with CamScanner

भिंतीमध्ये धान्य साठवण्याच्या तसेच मौल्यवान वस्तू लपवण्याच्या जागा आहेत.

वाड्यात काही वर्षांपूर्वी गावातील शाळा भरत असे. मुलांनी कुतूहलाने टाकलेल्या काही दगडांमुळे आडातील झरे बंद झाले अन् आड ओस पडली. वाड्यात एक आड (विहिर) असून त्या शेजारीच घोड्यांची पागा असायची. वाड्याशेजारीच सटूबाई देवीचे मंदिर आहे. बर्वे घराण्यातील एका पिढीला मुलबाळ होत नव्हते. अशा वेळेस सटुबाईने स्वप्नात दृष्टांत दिला व हे मंदिर उभारण्यास सांगितले महाराष्ट्रामध्ये केवळ ३ ठिकाणी सटूबाईचे मूर्तीस्वरुपात मंदिर असून त्यापैकी हे एक आहे. या म्हाळोजींना चार ठिकाणची इनामकी मिळाली होती. पिंपळस, कोतुळ व पांढुर्ली या ठिकाणी अशाच प्रकारचे वाडे आहेत. वाड्यातून समोरच छोटेखानी डुबेरगड दिसतो. डुबेर गढ चढण्यासाठी २५ ते ३० मिनीटे पुरेशी होतात. पायथ्याशी एक आश्रम असून तेथे किसन नाना पानसरे नावाचे साधू राहतात. पायथ्याच्या मंदिरात निवासाची सोय होऊ शकते. जवळच स्वच्छ पाण्याची एक विहिर आहे. गडावर सप्तश्रृगी देवीचे मंदिर असून वर जाण्यास पायऱ्या बांधल्या आहेत. जवळपास पाचशे पायऱ्या चढून आपण डोंगराच्या माथ्यावर पोहोचतो. दोन खडकात खोदलेली पाण्याची टाकी, एक छोटा तलाव व हे मंदिर या पलिकडे गडावर पाहण्यासारखे काही नाही. केवळ टेहळणी करिता या किल्ल्याचा वापर होत असावा. गड चढून, फिरुन पुन्हा खाली येण्यास दीड तास पुरेसा होतो. डुबेरे गावात जाण्यासाठी मुंबईहून घोटी मार्गे सिन्नरकडे जायचे. सिन्नरच्या पुढे आठ किलो मीटर आत डुबेरे गाव वसलेले आहे डुबेरे गड नाशिकच्या सिन्नर तालुक्यात वसलेला आहे.

(संकलित)

## अस्तित्व....

कॉलेज जीवन... जगता जगता
मागे वळूनही बघावं लागतं
विस्कटलेली पाने सावरुन
आपलं अस्तित्व शोधाव लागतं...
पोलादी मनगटांच्या जोरावर
केलं का चांगलं काम कधी
का कट्ट्यावर बसूनच रंगवल्या भिंती
वाटलं नाही का काही कधी....
उडते फक्त धुरात ध्येय
अन् पिचकारीत आकांक्षाची नदी
असे बघता नाटक सिनेमे
'माझ्यावर बनवा सिनेमा' वाटत नाही का कधी...
तरुण झालो म्हणता, पण कसले झाले तरुण
संस्कृतीसाठी, देशासाठी पहिले का थोडे झिजून....
करु करु म्हणतो पण,
आपल्या हातून काहीच होत नाही
अरे जगाचे तर जाऊ द्या
आपण स्वत:ही सावरु शकत नाही....
आपल्या हातात असावा फक्त स्टाईलिश फोन
चार-दोन मित्र चार-दोन मैत्रिणी
सोडून आपल्याला विचारतं कोण....
अस्तित्व निर्माण करणं हे आपल्या हातात असतं
यशाची गरुडझेप होणं तरुणपणातच शिकतं....
हीच गरुडझेप घेऊन जायचं आहे उंच आकाशी
अस्तित्व ठेवत ठेवत स्पर्धा करायची आहे दिशांशी...

**- साळुंके गायत्री बाजीराव**, एस.वाय.बी.कॉम.



Scanned with CamScanner

# ऐतिहासिक स्थळ - धोडप किल्ला

कु. पाचोरकर निकिता रतन, द्वितीय वर्ष (बी.कॉम)



गाव : धोडंबे

तालुका : चांदवड

जिल्हा : नाशिक

राज्य : महाराष्ट्र

**धोडंबे हे नाव गावाला कसे पडले ?**

धोडंबे गावातील एक प्रमुख ऐतिहासिक वैशिष्ट्य म्हणजे धोडंबे किल्ला. या धोडंबे किल्ल्यावरुन या गावाला धोडंबे असे नाव पडले.

धोडंबे हे गाव चांदवडपासून २० कि.मी. अंतरावर आहे. धोडंबे गावात दोन कुळांचे लोक मोठ्या प्रमाणावर राहतात.

एक म्हणजे उशीर आणि दुसरे म्हणजे रकीबे हि दोन कुळे १८ व्या शतकापासून आहे. उशीर घराण्याचा इतिहास म्हणजे त्यांचे आधी आडनाव साळुंके असे होते.

**धोडंबे गावातील शाळा :-**

धोडंबे गावात एक सुंदर अशी शाळा बांधलेली आहे. त्या शाळेचे नाव के. के. वाघ विद्यालय असे आहे. तेथे प्रामुख्याने १ ते १० वी पर्यंतचे शिक्षण आहे. तेथील काही मुले वडाळी भोई किंवा वडनेर भैरव या गावी येवून शिक्षण पूर्ण करतात. वडाळी भोई येथे कला आणि किमान कौशल्य या दोन शाखा आहे. तसेच वडनेर भैरव येथे कला, वाणिज्य आणि किमान कौशल्य या शाखा आहे. त्यामुळे धोडंबे गावात कॉलेज नसल्यामुळे १० वी नंतरचे शिक्षण तेथील मुले वडनेर भैरव किंवा वडाळीभोई येथे येवून पूर्ण करतात.

**धोडंबे गावातील व्यवसाय :-**

धोडंबे गावात मोठ्या प्रमाणात शेती हा व्यवसाय केला जाते. पूर्वीच्या काळी धोडंबे गावात पानमळे मोठ्या प्रमाणावर होते. ही पानमळे अतिशय सुंदर होती. ही पानमळे नेहमी अतिशय स्वच्छ व सुंदर ठेवली जात. मात्र नंतर पानमळ्याचा व्यवसाय हा कमी कमी होत गेला आणि तिथे दुसरे पीक घेण्यास सरुवात झाली.

पानमळे लावतांना ते पावसाळ्यात लावली जात. शेवरी, पांगरी पेरणी वाफे करुन केली जाते. त्यानंतर श्रावण महिन्यात पाऊस पडल्यावर त्याची लागवड केली जाते. एक ते दीड फुटाचा शेंडा लावणी करताना लावला जातो.

पावसाळा सुरु होण्यापूर्वी त्याची उतरण केली जाते म्हणजेच पान खुडले जातात. जस-जसे वेल वाढत जातो तसतशी त्याची बांधणी करुन खुडा केला जातो. तसेच पानमळे हे पीक घेतल्यावर त्यामध्ये केळी व पपईचे पीक घेतले जात असे.

धोडंबे गावात प्रामुख्याने घेतली जाणारी पीक कांदे, टोमॅटो, मुग, उडीद, मका, वांगी ही पिके मोठ्या प्रमाणावर घेतली जातात.



Scanned with CamScanner

## धोडंबे गावाची बोलीभाषा :-

धोडंबे गावात दोन ते तीन भाषांचा समावेश होता. त्या भाषा म्हणजे मराठी, हिंदी, अहिराणी या भाषा आहेत. मात्र तेथे प्रामुख्याने मराठी ही बोलीभाषा मोठ्या प्रमाणावर बोलली जाते. त्यामुळे धोडंबे गावात मराठी ही बोलीभाषा चांगल्या प्रकारे प्रचलित आहे.

## धोडंबे गावालगत असणारी गावे :-

धोडंबे गावालगत विजयनगर, हट्टी, पुरी, भायाळे, भुत्याने, एकरुखे, वडनेर भैरव, पिंपळनारे, वडाळीभोई ही गावे धोडंबे गावालगत आहेत.

हट्टी हे गाव धोडंबे किल्ल्यापाशी आहे. अतिशय सुंदर व लहानसे गाव आहे. हट्टी या गावामध्ये प्रामुख्याने चालणारा व्यवसाय म्हणजे दुग्ध व्यवसाय. हट्टीमध्ये मोठ्या प्रमाणात दुग्ध व्यवसाय केला जातो व हट्टी या गावाचे एक प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे येथे मोठ्या प्रमाणावर खवा बनविला जातो. हा खवा अनेक गावापर्यंत पोहचविला जातो. विशेषत: चांदवड गावामध्ये मोठ्या प्रमाणावर खवा पोहचविला जातो.

तसेच धोडंबे या गावाजवळ असलेले आणखी एक छोटेसे गाव म्हणजे विजयनगर. धोडंब्यापासून हे गाव १ कि.मी. अंतरावर आहे. विजयनगरचा मोठ्या प्रमाणावर संबंध हा धोडंबे या गावाशी आहे.

धोडंबे गावाचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे धोडंबे गावात असणारा धोडंब किल्ला.

हा किल्ला नाशिक जिल्ह्यात प्रसिद्ध आहे. किल्ला अतिशय सुंदर असा आहे. धोडंब किल्ला बघण्यासाठी मोठ्या प्रमाणात पर्यटकांची गर्दी असते. हा धोडंब किल्ला ४७५० फूट उंचीवर आहे.

## धोडंब किल्ल्याचा इतिहास :-

धोडप उर्फ धारपवणीक हा किल्ला खोदीव गुहा पाहता पुरातन किल्ला आहे. याचा उल्लेख मात्र प्रथम १६ व्या शतकात 'धरब' या नावाने येतो. तेव्हा हा किल्ला नगरच्या निजामशहाकडे होता. निजामशाही नष्ट करण्यासाठी आलेल्या मुघलांच्या सरदार अलावर्दीखानने निजामच्या किल्लेदाराला एक लाख रुपयाच्या मनसबीची लालूच दाखवून १९ जून १६२६ मध्ये हा किल्ला ताब्यात घेतला. १६७०-७१ मध्ये शिवाजी महाराजांच्या सैन्याने धोडप किल्ल्याला वेढा घातला पण त्यांना किल्ला घेता आला नाही. इ.स. १८१८ मध्ये हा धोडप किल्ला इंग्रजांच्या ताब्यात गेला.

## पाहण्याची ठिकाणे :-

हट्ची गावातून चांगली मिळलेली पायवाट गडावर जाते. या वाटेने साधारपणे १५ मिनीटे चालल्यानंतर थोडी सपाटी लागते. इथून पुढे सुमारे एक ते दीड तास चढून गेल्यानंतर दोन बुरुज लागतात. आणि त्याला लागूनच असलेली तटबंदी आपल्या नजरेस पडते. या बुरुजावर जाण्यासाठी पायऱ्या आहेत. बुरुज आणि तटबंदीच्या डाव्या बाजूस उत्तराभिमुख दरवाजा आहे. दरवाजाच्या डाव्या बाजूस तटबंदीत शेंदूर लावलेली छोटी गणेश मूर्ती बसवलेली आहे. या बुरूजामधून जाणाऱ्या पायऱ्यांच्या थोडे आधी उजवीकडे वर चढून जाणारी वाट ही 'इखारा' डोंगराकडे जाते. इखाऱ्यावर जाण्यासाठी २ तास लागतात. बुरुजांमधून जाणाऱ्या पायऱ्या चढून पुढे गेल्यावर मोठा तलाव लागतो. हा तलाव किल्ल्यावर पडलेल्या खिंडीमध्ये आहे. तलावावरुन पुढे चालत जातांना वाटेच्या दोन्ही



Scanned with CamScanner

बाजूस व अनामवीरांच्या समाध्या आणि कबरीचे अवशेष दिसतात. पुढे थोडा अंतरावर उजव्या बाजूस मारुतीचे मंदिर व वास्तुचे अवशेष दिसतात. मंदिरापासून पुढे चालत गेल्यावर दोन वाटा फुटतात. उजव्या बाजूची वाट पूर्वीच्या काळी ओतुर मार्गे कळवण गावात जाते. आणि डाव्या बाजूची वाट ही आपल्याला किल्ल्यावर घेवून जाते. एका प्रवेश दारावर शिलालेख कोरलेला आहे. त्या ठिकाणी 'सोनारवाडी' ही गवळी लोकांची छोटीशी वस्ती आहे. येथे मोठ्या प्रमाणात दुग्ध व्यवसाय होतो. या दुधाचा उत्कृष्ट असा मावा बनविला जातो. पुढे काही अंतर गेल्यानंतर डाव्या बाजूस एक छोटे असे हनुमान मंदिर आहे. त्याच्या अवती-भोवती दुरावस्थेतील दोन-चार शिवलिंग व नंदी दिसून येतात. पुढे गेल्यावर उजव्या बाजूला विहीर व त्यापुढे सोनारवाडी ही छोटी वस्ती लागते. सोनारवाडीवरुन गडावर जाता येते. धोडप किल्ल्यावर राहण्यासाठी गुहा आहे. त्याच्या बाजुला पिण्याच्या पाळ्याची तळे आहे. त्यातील पाणी पिण्यायोग्य असून थंडगार असते. गुहेत देवीची मुर्ती बसवलेली आहे. या गुहेपासून सरळ चालत पुढे गेल्यावर आपण धोडप किल्ल्याच्या सुप्रसिद्ध कातकाळ असलेल्या नसैर्गिक खाचेच्या वरच्या बाजूस पोहचतो. येथे आपली गडफेरी पूर्ण होते. किल्ल्यावर पडलेली खिंड ही तेथून राक्षस जात असतांना त्या राक्षसाच्या पायाने ती खिंड पडलेली आहे. असा इतिहास सांगितला जातो. हा अतिशय सुंदर व सुप्रसिद्ध किल्ला आहे.

धोडप किल्ल्याच्या पश्चिमेला अतिशय सुंदर असा सप्तश्रृंगी मातेचा गड आहे आणि किल्ल्याच्या पूर्वेला हंड्या इखारा हे सुळके आणि कांचना गड दिसतात व उत्तरेला कन्हेरगड व साल्हेर पहायला मिळतो.

## धोडप किल्ल्यावर पोहचण्याच्या वाटा :-

मुंबई-आग्रा महामार्गावर नाशिकच्या पुढे ५५ कि.मी. अंतरावर वडाळीभाई फाटा आहे. या फाट्यावरुन धोडांबे हे गाव ९ कि.मी. अंतरावर आहे. धोडांबे गावापासून ५ कि.मी. अंतरार हट्टी गाव लागते. हट्टी गाव धोडप किल्ल्याच्या पायथ्याशी आहे. गावात शिरतांना प्रचंड विस्तारलेला धोडप किल्ला आणि इखारा सुळका आपले लक्ष वेधून घेतात.

## धोडप किल्ल्यावर राहण्याची सोय :-

किल्ल्यावर राहण्यासाठी दोन गुहा आहेत. यात तीस ते चाळीस लोक राहतील अशी सोय आहे. बारामाही पिण्याच्या पाण्याची टाकी आहे. हट्टी गावातून धोडप किल्ल्यावर जाण्यासाठी अडीच ते तीन तास लागतात.

## धोडंबे गावात होणारे सण :-

धोडंबे गावात अजूनही काही सण हे पारंपारिक पद्धतीने केले जातात. त्यामध्ये होळी, बैलपोळा इ. सण साजरे केले जातात.

## धोडंबे गावाचे नैसर्गिक वातावरण :-

धोडंबे हे गाव धोडप किल्ल्यामुळे अतिशय प्रसिद्ध झाले आहे. धोडंबे या गावात पावसाळ्यामध्ये अतिशय सुंदर असे वातावरण असते. तेव्हा या गावामध्ये सगळीकडे हिरवाई पसरलेली असते. धोडंबे या गावाला नैसर्गिक संपत्ती अधिक मिळालेली आहे असे म्हटले तरी चालेल. कारण पावसाळ्यात या गावात



Scanned with CamScanner

अतिशय सुंदरता पसलेली असते. तसेच धोडंबे या गावाला सगळीकडून डोंगरांनी वेढलेले आहे. या डोंगरावरती पूर्णपणे हिरवळ पसरलेली असते. तसेच या गावातील नैसर्गिक वातावरणाबरोबरच या गावातील धोडप किल्ला हा अतिशय आकर्षक असा आहे. या किल्ल्यामुळे धोडंबे या गावाला सुशोभितता निर्माण झाली आहे. अनेक ठिकाणाहून पर्यटक हे धोडप किल्ला बघण्यासाठी येतात. अनेक पर्यटक हे पावसाळ्यात येथे आवर्जून येतात. शेजारीच 'इखारा' नावाचा एक डोंगर आहे तेथे गोरक्षनाथांचे मंदिर आहे. तिथे एक दिवस यात्रा भरलेली असते. अनेक गावातील लोक या यात्रेसाठी येतात. ही यात्रा जानेवारी महिन्यात भरते. (संकलित)



## शिवरायांची आरती

जयदेव जयदेव जय जय शिवराया
या या अनन्यशरणा आर्या ताराया
आर्यांच्या देशावर म्लेच्छांचा घाला
आला आला सावध हो शिवप्रभूपाला ।
सन्ददिता भूमाता दे तुज हाकेला
करुणावर भेदूनी तव हृदय न कां गेला
जयदेव जयदेव जय जय शिवराया ॥

**– कु. गचाले अर्चना बाळासाहेब,** तृतीय वर्ष (बी.ए.)

## शिवाजी महाराज



| | | |
|---|---|---|
| अधिकार काळ | : | जून ६, १६७४ ते एप्रिल ३, १६८० |
| राज्याभिषेक | : | जून ६, १६७४ |
| राज्यव्याप्ती | : | पश्चिम महाराष्ट्र, कोकण, सह्याद्री डोंगर रांगांपासून नागपूरपर्यंत आणि उत्तर महाराष्ट्र खान्देशापासून दक्षिण भारतात तेजावर पर्यंत. |
| राजधानी | : | रायगड किल्ला |
| पुर्ण नाव | : | शिवाजीराजे शहाजीराजे भोसले |
| जन्म | : | फेब्रुवारी १९,१६३० शिवनेरी किल्ला, पुणे |
| मृत्यु | : | एप्रिल ३, १६८० रायगड |
| उत्तराधिकारी | : | छत्रपती संभाजीराजे भोसले |
| आई | : | जिजाबाई |
| पत्नी | : | सईबाई, सोयराबाई, पुतळाबाई, काशीबाई, लक्ष्मीबाई, सकवारबाई, सगणाबाई, गुणवंतीबाई. |
| राजब्रीद वाक्य | : | 'प्रतिपचंद्रलेखेव वधिष्णुर्विश्ववंदिता शाहु सुनो, शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते' |
| चलन | : | होन, शिवराई |


**– कु. गचाले अर्चना बाळासाहेब,** तृतीय वर्ष (बी.ए.)



Scanned with CamScanner

# भास्करगड किल्ला

सलादे सोनाली शिवाजी – तृतीय वर्ष (बी.ए.)



किल्ल्याचा प्रकार – गिरीदुर्ग

डोंगररांग – त्र्यंबकेश्वर

तालुका – त्र्यंबकेश्वर

जिल्हा – नाशिक.

नाशिक जिल्ह्याच्या पश्चिमेकडे आणि इगतपुरीच्या उत्तरेस एक डोंगररांग पसरलेली आहे. त्यास त्र्यंबक रांग असेही म्हणतात. ही रांग दोन भागात विभागली गेली आहे. पहिल्या टप्प्यात बसगड, हरिहर हे गड, तर दुसऱ्या टप्प्यात ब्रह्मगिरी, अंजनेरी हे किल्ले आहेत. प्राचीनकाळी नालासोपारा, डहाणू, वसई इ. बंदरात उतरणारा माल वेगवेगळ्या घाटमार्गांनी नाशिक या शहराकडे जात असे. यापैकी गोंडा घाटावर लक्ष ठेवण्यासाठी बसगड किल्ल्याची निर्मिती करण्यात आली होती.

## भास्करगड पाश्वभूमी :–

प्रत्येक किल्ल्यामागे काही रहस्य काही ऐतिहासिक पार्श्वभूमी असते. किल्ला हा संरक्षणाच्या हेतूने बांधला जातो.

प्राचीन व मध्ययुगीन कालखंडात किल्ल्यांना महत्त्वाचे स्थान होते. शत्रूच्या हल्ल्यापासून जनतेचे व राजांचे संरक्षण करण्यासाठी आणि सभोवतालच्या प्रदेशावर नियंत्रण ठेवण्यासाठी किल्ले बांधले गेले. हिंदू व मुस्लिम राजांनी किल्ले बांधले. चालुक्य, शिलाहार, यादव यांच्या काळात किल्ल्यांचे महत्त्व वाढले. शिवकाळात किल्ल्यांना अनन्यसाधारण महत्त्व होते. किल्ल्याचे तीन प्रकार पडतात १) जलदुर्ग २) भुईकोट ३) गिरीदुर्ग/डोंगरी किल्ले.

भास्करगड किल्ला हा गिरीदुर्ग म्हणजेच डोंगरी किल्ला आहे. गिरीदुर्ग म्हणजे कठिण गड. शिखरावर बांधलेला असतो. त्याला गिरीदुर्ग किल्ला म्हणतात. महाराष्ट्रात जवळपास २०० ते २२५ छोटे मोठे गिरीदुर्ग किल्ले आहे. त्यापैकी नाशिक जिल्ह्यातील भास्करगड हा किल्ला गिरीदुर्ग किल्ला आहे.

भास्करगड किल्ल्यालाच बसगड किल्ला असेही संबोधले जाते.

किल्ल्याची उंची – ३५०० फूट

## भास्करगडाचा इतिहास :–

त्र्यंबक डोंगर रांगेच्या दक्षिण टोकावर असलेल्या या किल्ल्याचा इतिहासात फारसा उल्लेख आढळत नाही. पण कातळात खोदलेल्या किल्ल्यावर जाण्याच्या सर्पिलाकार मार्ग व सातवहन कालीन पाण्याची टाकी किल्ल्याचे प्राचिनत्व सिध्द करते.

इ. स. १२७१ ते १३०८ पर्यंत हा किल्ला देवगिरीच्या अधिपत्याखाली होता. नंतर बहामनी पुढे निजामशाही यांच्याकडे किल्ला होता. निजामशाहीच्या अंतकाळात इ. स. १६२९ मध्ये शहाजी राजांनी बंड केले. तेव्हा भास्करगड त्यांच्या ताब्यात गेला. इ. स.



Scanned with CamScanner

१६३३ मध्ये शहाजी राजांकडून हा किल्ला मोगलांकडे गेला. १६७० मध्ये शिवरायांचा पेशवा मोरोपंत पिंगळे यांनी हा किल्ला जिंकून घेतला. इ. स. १६८८ मध्ये मोगलांनी भास्करगड जिंकून घेतला. इ. स. १७३० मध्ये कोळ्यांनी बंड करुन तो घेतला पुढे १८१८ पर्यत हा किल्ला पेशव्यांच्या ताब्यात होता.

भास्करगडचा माथा बेसॉल्ट खडकाचा बनलेला आहे. किल्ल्याचे मुख्य आकर्षण म्हणजे काताळात खोदून काढलेला सर्पिलाकार जिना असमान उंचीच्या पायऱ्या कातळ भिंती आहे. जिन्याचा मार्ग आपल्याला पश्चिमाभिमुख प्रवेशद्वारासमोर घेऊन जातो. प्रवेशद्वार कमानीच्या महिरपीपर्यंत मातीत गाडले गेले आहे. प्रवेशद्वारापासून रांगत जाऊन किल्ल्यात प्रवेश करावा लागतो. प्रवेशद्वाराच्या आतील रचनेवरुन तेथे पहारेकऱ्यासाठी देवड्या असाव्यात. पण आज हा सर्व भाग मातीखाली गाडला गेलेला आहे.

प्रवेशद्वारातून किल्ल्यात शिरल्यावर समोर व उजव्या बाजूला अशा दोन वाटा फुटतात. या दोन्ही वाटा किल्ल्याच्या पठारावर जातात. पण उजव्या बाजूच्या पायवाटेने १० मिनीटे चढल्यावर आपण किल्ल्याच्या विस्तीर्ण पठारावर पोहचतो. किल्ल्याच्या पठारावर पडक्या वास्तुंचे, मंदिराचे अवशेष, बुजलेली टाक, साचपाण्याचा तलाव, दगडात कोरलेला हनुमान असे अवशेष पाहायला मिळतात.

खोडाळ्यातून त्र्यंबकेश्वराला जाताना निरगुडपाडा या गावाच्या अलिकडे एक कच्चा रस्ता फणीच्या डोंगराला उजव्या बाजूला ठेवत भास्करगडाच्या पायथ्याशी पोहचतो. भास्करगडच्या पायथ्याशी पोहचण्यापूर्वी एक नाला ओलांडावा लागतो. नाला ओलांडल्यावर भास्करगडच्या चढाईला सुरुवात होते. दीड तास पायवाटेवरुन केलेल्या चढाईनंतर आपण कातळकडाच्या पायथ्याशी येतो. तेथून उजव्या बाजूने जाणारी पायवाट कातळकड्याला वळसा घालून कातळात खोदलेल्या पायऱ्यांपाशी येते. पायऱ्या चढून गेल्यावर प्रवेशद्वारातून किल्ल्यात प्रवेश करतो.

निरगुडपाडा हे गाव खोडाळा–त्र्यंबकेश्वर मार्गावर आहे. त्र्यंबकेश्वर पासून २० कि.मी. वर निरगुडपाडा आहे. (संकलित)

## अफलातून विनोद...!

वेगवेगळ्या क्षेत्रांतील पुरुषांच्या बायका नवऱ्याबरोबर भांडतांना काय उद्‌गार काढतील.. ?

पायलटची बायको – **'गेलास उडतं'**

मंत्र्याची बायको–**'पुरी झाली तुमची आश्वासन'**

शिक्षकाची बायको–**'मला शिकवू नका'**

रंगाऱ्याची बायको – **'थोबाड रंगवीन'**

धोब्याची बायको – **'चांगली धुलाई करीन'**

सुताराची बायको – **'ठोकून सरळ करीन'**

तेल विक्रेत्याची बायको–**'गेलास तेल लावत'**

डेंटीस्टची बायको – **'दात तोडून हातात देईन'**

शिंप्याची बायको – **'शिवलंस तर याद राख'**


अभिनेत्याची बायको – **'कशाला नाटक करताय?'**

वाण्याची बायको – **'नुसत्या पुड्या सोडू नका !'**

**साळुंके गायत्री बाजीराव,** एस.वाय.बी.कॉम.



Scanned with CamScanner



# रामशेज किल्ला

**कु. शेळके सोनाली संपत**
तृतीय वर्ष (बी.ए.) मराठी

नाशिक-पेठ रस्त्यावर पंचवटीपासून १० किलोमीटर अंतरावर रामशेज किल्ला आहे. रामशेज इतर किल्ल्यांप्रमाणे दऱ्या-खोऱ्यात, जंगलात अथवा खूप उंचीवर नाही. एका सपाट आणि मोकळ्या मैदानावर त्याने आपले बलदंड शरीर झोकून दिले आहे. त्यामळे बच्चे कंपनीचा तसा हा आवडता किल्ला. प्रभू श्रीराम या किल्ल्यावर विश्रांतीला यायचे म्हणून या डोंगराला रामशेज म्हटले आह अथवा म्हटले जाते. अशी अख्यायिका आहे. रामशेजचे वैशिष्ट्ये असे की, तो कोणत्याही बाजूने सहज चढता येतो. अन् तोही अगदी तासाभरात. किल्ल्याजवळ राममंदिर आहे. पाण्याचे कुंड आणि एक बोगदाही आहे. सीतागुफेतून रामशेजला जाण्यासाठी बोगदा असल्याचे म्हटले जाते. मात्र सध्या तो बंद आहे. रामशेज किल्ल्यात प्रवेश करण्यापूर्वी राम मंदिराजवळील एक शिलालेख आहे. त्यावर रामशेजचा इतिहास अत्यंत रोचक आहे. शिवकाळानंतर महाराष्ट्रावर मोगलांचे आक्रमणे वाढू लागली. मराठा साम्राज्य काबीज करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्युनंतर औरंगजेबाने आखलेल्या पहिल्या मोहिमेत रामशेज या छोट्याशा किल्ल्याचाही समावेश होता. यावरुन हा किल्ला मोगलांसाठी किती महत्त्वाचा असेल. हे लक्षात येते. औरंगजेबाचा सरदार शहाबुद्धीन खानने १६८२ मध्ये रामशेज मिळविण्याचे जोरदार प्रयत्न केले. पण तो अपयशी ठरला. त्याने दहा हजार सैन्य घेऊन रामशेजला वेढा घातला होता. रामशेजजवळ यावेळी शहाबुद्दीन खानाच्या हल्ल्यापासून वाचविण्यासाठी अवघे सहाशे मावळ्यांनी किल्ला लढवला. यावेळी शहाबुद्दीन खानाने हल्ल्यांसाठी रामशेजच्या उंचीचा लाकडी बुरुज (धमधमा) तयार केला. महाराष्ट्रातील युद्धतंत्रात हा अजब प्रकार पहिल्यांदा पहायला मिळाला. धमधम्यावरुन तोफांचा मारा करुनही रामशेज झुकेना. राजशेजवरुन होणाऱ्या दगडांच्या वर्षावामुळे शहाबुद्दीन खानाचे मोगल अधिकारी मारले जात होते. दुसरीकडे छत्रपती संभाजी राजांनी रामशेजच्या मदतीसाठी सैन्य पाठवून किल्ल्याभोवतीचा वेढा तोडण्याचे तंत्र अवलंबले होते. औरंगजेबाच्या अनेक सरदारांनी रामशेज मिळविण्यासाठी धडपड केली, पण १६८४ पर्यंत रामशेज हलला नाही. अखेर रामशेजचा वेढा सुटला. संभाजी महाराजांनी रामशेजच्या किल्लेदाराला चिलखत, पोषाख, रत्नजडीत कडे आणि नगद देवून कौतूक केले. त्यानंतर रामशेजवर आलेला नवा किल्लेदार फितुर झाला अन् १६८७ मध्ये रामशेज औरंगजेबाच्या ताब्यात गेला. रामशेज किल्ला सहा वर्षे झुंजत होता. त्यामुळे हा किल्ला अनुभवतांना हा इतिहास मनात साठवणे हा एक थरार ठरतो. जाताय ना मग रामशेजला...! (संकलित)



Scanned with CamScanner

# मार्कण्डेय गड

कु. शेळके सोनाली संपत
तृतीय वर्ष (बी.ए.) मराठी



नाशिक जिल्ह्यातील सप्तश्रृंगी गडासमोरच दिसणाऱ्या डोंगरावर मार्कंडेय किल्ला आहे. सप्तश्रृंगीगड व खळ्या-जावळ्या गडापासून खिंडीमुळे वेगळ्या झालेल्या डोंगरावर पुरातन काळी मार्कंडेय ऋषींचे वास्तव्य होते असे सांगितले जाते. त्यामुळे हा डोंगर व त्यावरील किल्ला मार्कंड्या या नावाने ओळखला जातो.

**इतिहास :-**

शहाजहानच्या काळात दक्षिणसुभा औरंगजेबाच्या ताब्यात होता. औरंगजेबाने अलिवर्दी खानाला नासिक जिल्ह्यातील किल्ले जिंकण्याचा हुकूम दिला. इ. स. १६३९ मध्ये अलिवर्दी खानाने सप्तश्रृंगीगड, मार्कंड्या, रवळ्याजावळ्या, धोडप हे सर्व किल्ले जिंकून घेतले. याबद्दल फारसीतील शिलालेख इंद्राई किल्ल्यावर पाहता येतो. वणी-दिंडोरी या लढाईनंतर नाशिक परिसरातील किल्ले शिवाजी महाराजांनी जिंकून घेतले. त्यात मार्कंड्याचा समावेश होता. महाराजांच्या निधनानंतर मोगलांनी हे किल्ले परत जिंकले.

**मार्कंड्या गडाकडे जाण्यासाठीचे रस्ते :-**

सापुतारा रस्त्यावर नाशिकपासून ४० किलोमीटरवर वणी नावाचे गाव आहे. या गावातून एक रस्ता कळवण गावाकडे जातो. या रस्त्यावर वणीपासून ९ कि.मी. वर बाबापूर नावाचे गाव आहे. हे मार्कंड्या किल्ल्याच्या पायथ्याशी आहे. या गावापासून रस्ता वर चढत जाऊन २ कि.मी. वरील मुळणबारी खिंडीत येतो. या खिंडीतून कळवण गावाकडे जाताना उजव्या बाजूची वाट रावळ्या जावळ्याला तर डाव्या बाजूंनी मार्कंड्या किल्ल्यावर जाते.

**गडावर पोहोचण्याच्या वाटा :-**

मार्कंड्या व खळ्या-जावळ्या किल्ल्याच्या मध्ये जी खिंड आहे. तिला मुळणबारी या नावाने ओळखतात. या खिंडीतून मार्कंड्या गडाच्या दिशेने चढून गेले की, पहिल्या टप्प्यावर एक पठार लागते. ी गडाची माची आहे. माचीवरुन बाले किल्ल्याकडे असलेल्या वाटेवर दगडात कोरलेल्या, बांधलेल्या पायऱ्या आहेत. या वाटेवरच डावीकडे एक कातळकड्याखाली कातळात कोरलेल्या दोन गुहा आहेत. त्यांना 'ध्यान गुफा' म्हणतात. येथून वर चढताना उजव्या हाताला बुरुजाचे व डाव्या हाताला तटबंदीचे अवशेष दिसतात. पायऱ्यांचा टप्पा संपला की, समोर सप्तश्रृंगी गड दिसतो. त्यानंतर लागणाऱ्या डाव्या बाजूच्या कातळात खोदलेल्या वाटेने बालेकिल्ल्यावर जाता येते.

**काय पहावे ?-**

बाले किल्ल्यावरुन गडावर जाण्यासाठी तीन



Scanned with CamScanner

टप्पे आहेत. पहिल्या टप्प्यावर एक घुमटी खाली कोरलेले टाके पाहता येते. या टाक्याला 'कमंडलू तीर्थ' म्हणतात. या टाक्यात पिण्याचे पाणी बारामाही असते. दुसऱ्या टप्प्यावर एका रांगेत खोदलेली तीन पाण्याची टाकी पाहायला मिळतात. त्यांच्या बाजूलाच एक सुकलेले टाके आहे. गडाच्या सर्वोच्च टोकावर मार्कंडेश्वराचे मंदिर आहे. मंदिरात मार्कंडेय ऋषींची मूर्ती व शिवलिंग आहे. गडाच्या या सर्वोच्च टोकावरुन सप्तश्रृंगी गड, खळ्या जावळ्या व धोडप हे किल्ले दिसतात.

**जाण्यासाठी लागणारा वेळ :-**

मुळणबारी (मुळाणे), खिंडीतून गडावर पोहोचण्यासाठी एक तास लागतो.

**गडावरील सोयी :-**

गडावर राहण्याची, जेवणाची सोय नाही. गडावरील कमंडलू तीर्थ या टाक्यात बारमाही पिण्याचे पाणी आहे. (संकलित)

## मतदार राजा की उमेदवार राजा

फुंकले रणशिंग निवडणुकांचे
दिवस आले सुखाचे,
समृध्दी आणि भरभराटीचे...
पाण्यासाठी आकाशाकडे
शेतकरी घाले साकडे,
कृपा झाली उमेदवारांची
पाऊस आश्वासनांचा पडे...
आधी होते जिकडे-तिकडे
खड्डेच खड्डे,
रस्त्यावरही माणसांना
रोजच अद्दल घडे...
तेच रस्ते तात्पुरते झाले चोपडे,
पाण्यासाठी मैलो न मैल प्रवास घडे...
तरी सांगा ना ग बाई, पुन्हा
भ्रष्टच का निवडे ?
जागोजागी, गल्लीबोळात
दिसतात 'पोस्टर'...
विकासाच्या बाबतीत प्रत्येक
भ्रष्ट म्हणतो मीच 'मास्टर'...
अरे मतदारा राजा, जागृत केव्हा होशील ?
भ्रष्ट, ऐतखाऊ, लालची
उमेदवारांना नरक केव्हा दाखवशील...
आश्वासनं ही पोकळ नसतात
असतात पोकळ उमेदवार...
द्या एक झटका त्यांना, होतील
ते थंडगार...
पुन्हा ते आणि तेच !
सांगा आता विकासाचा सुटेल का पेच ?
आता तरी होऊ जागे
खऱ्यांनाच देऊ या मत...
यालाच म्हणतात खरे जनमत...

– **गांगुर्डे निकिता लक्ष्मण**, तृतीय वर्ष (बी.ए.)

## चारोळी

शिंपल्या पाणी घालून कधी समुद्र
दाखवता येत नाही...
हाताने काढलेल्या फुलाला सुगंध कधी येत नाही...
निळ्याभोर गगनाचा अंत कधी होत नाही...
अन् नाजूक अशा मैत्रीचा उल्लेख
शब्दांत मात्र होत नाही...

– **गांगुर्डे मोहिनी मोतीराम**, तृतीय वर्ष (बी.ए.)



Scanned with CamScanner



# श्री केद्राई माता नमः

कु. गुंजाळ कविता भाऊसाहेब
द्वितीय वर्ष (बी.कॉम.)

महाराष्ट्र राज्यातील नाशिक जिल्ह्यात असलेल्या चांदवड तालुक्यातील खडकओझर या गावी केद्राई माता हे एक जागृत देवस्थान म्हणून प्रसिद्ध आहे. मुंबई-आग्रा हायवे क्रमांक ०३ वर चांदवड तालुका, जिल्हा नाशिक (महाराष्ट्र) वडाळीभोई या गावाजवळून ६ कि.मी. अंतरावर हे देवस्थान असून अमावस्या, पौर्णिमा, मंगळवार, शुक्रवार व शनिवार या दिवशी प्रचंड गर्दी या देवस्थानात असते. नवसाला पावणारी देवी अशी या देवीची ख्याती आहे. केद्राई माता मंदिराजवळ एक तीर्थकुंड आहे. केद्राई मातेच्या मंदिराजवळ प्राचीन शनि, राहू, केतू यांची मंदिरे आहेत. केद्राई मातेसमोरील जागेत चारमुखी हनुमान मूर्ती खूपच छान असून शेजारील मंदिरात शिवलिंग आहे. केद्राई माता मंदिरासमोरील टेकडीवर प्राचीन शिवकालीन दिपमाळ पहावायस मिळते.

मंदिराच्या बाजूला धरण असल्याने केद्राई धरण चांदवड तालुक्यातील सर्वात मोठे धरण म्हणून प्रसिध्द आहे. मंदिराच्या पसिरातील पिंपळाची व वडाची वृक्ष हे देवस्थानाचे वैभवच मानले जाते. विनता नदीच्या तिरावर असलेले हे देवस्थान खूपच शांत, सुंदर आणि रमणीय आहे. पुरातन काळापासून चैत्र, वैद्य नवमीला देखील देवीचा रथ-देवस्थानापासून खडकओझर गावापर्यंत मोठ्या थाटामाटात निघतो. या रथ-यात्रेकरिता पंचक्रोषीतील सर्व ग्रामस्थ व भाविक मोठ्या संख्येनें एकत्र येतात. नवरात्र उत्साहात दररोज हजारो भाविक मातेच्या दर्शनासाठी हजेरी लावतात. या कालावधीत मंदिर प्रशासनाकडून विद्युत रोषणाई व धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. त्याचप्रमाणे केद्राई माता देवस्थानाहून केद्राईमाता ते शिर्डी ते गाणगापूर, केद्राईमाता ते त्र्यंबकेश्वर अशा पायी दिंडी सोहळा दरवर्षी होतो. केद्राई माता देवस्थानापासून ३८ कि.मी. अंतरावर सप्तश्रृंगीगड व २२ कि.मी. अंतराव रेणुका माता देवस्थान आहे. तसेच सह्याद्रीच्या उत्तर पूर्व रांगेवर मार्कण्डेय पर्वत, धोडंब किल्ला, विखार पहाड, कांचन किल्ला, इंद्रायणी किल्ला, रेणुका माता, चंद्रेश्वर मंदिर, इच्छापूर्ती गणेश मंदिर, चांदवड येथील प्रसिद्ध रंगमहाल असे २० ते २५ कि.मी. अंतरावर वरील प्रमाणे ऐतिहासिक स्थळे आहेत किंवा पहावयास मिळतात. या देवस्थानाला लोक आवर्जुन भेट देतात. (संकलित)

**चारोळी**

आयुष्याचं एक वैशिष्ट्य आहे
ते कधीच कोणासाठी थांबत नाही
वेळ थांबला तरी
आयुष्य कधीच झुकत नाही.


**- गांगुर्डे निकिता लक्ष्मण,** तृतीय वर्ष (बी.ए.)



Scanned with CamScanner

# अंजनेरी

**गचाले अर्जना बाळासाहेब,** तृतीय वर्ष (बी.ए.)



जिल्हा - नाशिक

किल्ल्याचा प्रकार - गिरीदुर्ग

किल्ल्याची उंची - ४२०० फूट

अंजनेरी हा नाशिक-त्र्यंबकेश्वर रांगेतील महत्त्वाचा किल्ला आहे. नाशिक-त्र्यंबकेश्वर रस्त्यावर नाशिकपासून २० कि.मी. अंतरावर अंजनेरी नावाचा फाटा आहे. अंजनेरी गावात गेल्यावर पायऱ्यांच्या वाटेने गडावर जाता येते. मुळेगावच्या वाटेनेही गडावर जाता येते. गडावरुन बुधली नावाची अवघड वाट ही खाली उतरते.

### इतिहास :-

अंजनेरी किल्ला जनमानसात परिचित आहे. तो हनुमान जन्मस्थानामुळे ! पवनपुत्र हनुमानाचा जन्म या डोंगरावर अंजनी मातेच्या पोटी झाला, असे मानले जाते. म्हणूनच या किल्ल्याला अंजनेरी नाव देण्यात आले. याच डोंगराच्या परिसरात हनुमान लहानाचे मोठे झाले असे समजले जाते. येथे १०८ जैन लेणी आहेत.

### गडावरील ठिकाणे :-

अंजनेरी गावातून किल्ल्यावर येताच वाटेतच पायऱ्याच्या ठिकाणी गुहेत लेणी आढळतात. ही लेणी जैन धर्मीय आहेत. पठारावर पोहोचल्यावर १० मिनीटांतच अंजनी मातेचे मंदिर लागते. मंदिर बऱ्यापैकी प्रशस्त आहे. त्यामुळे मुक्काम करण्यास योग्य ठिकाण आहे. थोडे पुढे गेल्यानंतर दोन वाटा लागतात एक डावीकडे सीतागुहे पाशी पोहोचते तर दुसरी समोरच्या बाले किल्ल्यावर चढते. बाले किल्ल्यावर अंजनी मातेचे दुसरे प्रशस्त मंदिर आहे. किल्ल्याचा घेर फार मोठा आहे. किल्ल्याच्या पठारावरुन वैतरणा, गंगापूर, मुकणे, दारणा, कश्यपी व गौतमी-गोदावरी धरणाचा विस्तार पाहण्यासारखा आहे. पठारावर एक तलाव आहे.

### गडावर जाण्याच्या वाटा :-

किल्ल्यावर जाण्याची मुख्य वाट अंजनेरी गावातून वर जाते. नाशिक-त्र्यंबकेश्वर रस्त्यावर नाशिक पासून २० कि.मी. अंतरावर अंजनेरी फाट्यावर उतरावे. या फाट्यापासून १० मिनीटे अंतरावरील अंजनेरी या गावात पोहोचावे. गावातून नवरा-नवरीचे दोन सुळके नजरेत भरतात.

गावातूनच एक प्रशस्त वाट किल्ल्यावर जाते. पुढे पायऱ्या लागतात. पायऱ्याच्या सहाय्याने अंजनेरीच्या पठारावर पोहोचता येते. अंजनेरी गावापासून येथपर्यंत येण्यासाठी दीड तास लागता. मुळे गावचा रस्ता ही पायी चालणाऱ्यांसाठी चांगली पायवाट आहे. या वाटेने आल्यास विशेष मजा येते. उतरतांना येथेच येण्यासाठी 'बुधली' या अवघड मार्गाचा वापर केल्यावर लवकर खाली पोहोचता येते. परंतु धाडसी माणसांनीच या मार्गाचा अवलंब करावा.



Scanned with CamScanner

## अंजनेरीच्या डोंगरावरील दुर्मिळ वनस्पती :-

जुई पेठे या वन विभागाच्या सहकार्याने अंजनेरी प्रकल्पावर काम करीत आहेत. अंजनेरी डोंगरार साडेतीनशेहून अधिक वनस्पती असल्याचे त्यांच्या अभ्यासात स्पष्ट झाले. त्यातील निम्म्या वनस्पती पश्चिम घाटात आणि देशभरात आढळतात. 'सिरोपोजिया अंजनेरीका' ही दुर्मिळ वनस्पती मात्र जगाच्या पाठीवर अन्यत्र कुठेही आढळत नाही. ती अंजनेरी डोंगरावर आहे. ज्यांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. अशा काही वनस्पती अंजनेरी डोगरावर अजुनही तग धरुन आहेत. काळ्या कातळात अतिशय कमी मातीचा थर असतो. या परिस्थितीत अनेक वैशिष्ट्यपूर्ण वनस्पती आढळतात. त्यात किटकभक्षी वनस्पती ही आहेत.

एखाद्या दुर्मिळ वनस्पतीचे अस्तित्व नष्ट होण्याचा धोका केवढे दुष्परिणाम घडवून आणू शकतो यावर तिच्या संवर्धनाच्या कामाची निश्चिती होते. त्यासाठी 'आययूसी एन' या आंतरराष्ट्रीय संस्थेने मानके निश्चित केली आहेत. त्याकरता संबंधित वनस्पती नामशेष होण्याच्या मार्गावर असल्याचे प्रसिद्ध करावे लागते. अंजनेरी प्रकल्पात जुई पेठे यांनी त्या मानकांनुसार अभ्यास केला.

परिसरातील आठ दुर्मिळ वनस्पतींना या संस्थेने आधीच त्या गटात स्थान दिले आहे. या अभ्यासामुळे 'सिरोपोजिया अंजनेरीका' ही अतिशय दुर्मिळ वनस्पती या गटात समाविष्ट करुन घेण्याच्या त्यांच्या प्रयत्नांना यश मिळाले आहे. (संकलित)

### शिवाजी राजे



सह्याद्रीच्या कुशीतून
एक हिरा चमकला
भगवा टिळा चंदनाचा
शिवनेरीवर प्रगटला
हातात घेऊनी तलवार
शत्रूंवर गरजला ।
महाराष्ट्रात असा एकच शिवाजी राजा होऊन गेला ॥


### येथेच घडले हिंदुस्थानचे राजे शिवछत्रपती

जन्माताच मातेने त्यांना शिकविले शौर्य
सळसळतं रक्तअंगी पाहून, सुलतानी क्रूर शौर्य
क्रोधाग्नी भडकला, वळल्या हाताच्या मुठी
आणि येथेच घडले हिंदुस्थानचे, राजे शिव छत्रपती
वाटत होत्या आया बहिणी, विटली माय मराठी
हिंदुत्वाची आग विझली, अन दिवसाढवळ्या लुटी
गर्जला मराठा अशावेळी, जागल्या तलवारीच्या पाती
आणि येथेच हिंदुस्थानचे राजे शिव छत्रपती ॥
आक्रोश होता दाही दिशा, कुठे दुष्काळी सावट
पात शहांचे जुलूम वाढले, होते हिंदुत्वावर संकट
पेटली ठिणगी एक, फुलली अभिमानाने छाती
आणि येथेच घडले, राजे शिव छत्रपती ॥
स्वराज्याचे तोरण बांधून, मावळा लढावयास तयार
हर–हर महादेव गर्जुनी, मावळा मरावयास तयार
स्थापिले स्वराज्य सह्याद्रीत,
पसरली दाही दिशा कीर्ती,
आणि येथेच घडले हिंदुस्थानचे,
**राजे शिव छत्रपती ॥**

**– अर्चना बाळासाहेब गचाले,**
तृतीय वर्ष (बी.ए.) (संकलित)

# शिवकालीन चलन

पवार संजीवनी निवृत्ती, तृतीय वर्ष (बी.ए.)



चलन ही एक अशी गोष्ट आहे, जी आपल्या रोजच्या जीवनाचा एक अतिशय महत्त्वाचा भाग आहे. आज आपल्या सर्वांच्या तिजोरीत शे-पाचशेच्या नोटा गच्च भरलेल्या असतात किंवा आपले प्लॅस्टिक मनी म्हणजेच डेबीट कार्ड यामध्ये दिमाखात आपले चलन वास्तव्य करत असते. मला जसे आठवते त्याप्रमाणे आपण सर्वच जण अगदी पंचवीस पैशाच्या नाण्यापासून ते आताच्या दोन हजाराच्या गुलाबी नोटेपर्यंत या चलनाचे साक्षीदार आहोत.

आता पंचवीस पैसे तसेच पन्नास पैसे यांची नाणी बंद झाली असली तरी या नोटा आणि नाणी अजूनही चलनात आहे. त्यांची गुणवत्ता तर आपल्या सर्वांनाच ज्ञात आहे. पण आपल्या छत्रपती शिवराय त्यांच्या काळातील चलन जर निरखून पाहिले तर आपल्या लक्षात येईल की, चलनाची गुणवत्ता म्हणजे नेमकी काय? आजही आपल्याला महाराजांच्या काळातील हे चलन संग्रहालयात पहायला मिळते. या चलनाचे बारीक निरीक्षण केल्यावर असे चलन परत होवूच शकत नाही. हा अनुभव तुम्हाला नक्की येईल.

छत्रपती शिवराय यांनी १६६४ मध्ये राज्याभिषेकापूर्वी पहिले नाणे चलन प्रसिध्द केले. हे नाणे अंदाजे पाऊन तोळा वजनाचे असून त्या नाण्यावर 'जी' आणि 'सी' ही अक्षरे आढळून येतात. व हेच स्वराज्याचे पहिले नाणे होय. १०० वर्षे परकीय चलन आपण जेव्हा वापरत होतो. तेव्हा सन १५६५ साली विजयनगरचा सम्राट सदाशिवराय हा बहामणी सत्तेकडून पराभूत झाला होता. हिच कोंडी श्री छत्रपती शिवाजी महाराजांनी नवीन चलन आणून फोडली. यानंतर महाराजांनी 'शिवराई' हे चलन अस्तित्वात आणले व तेच पुढे १८०० पर्यंत बाजारात पेशवाईच्या अस्तापर्यंत वापरले गले. ६ जून १६७४ मध्ये शिवराज्याभिषेका समयी राजे छत्रपतींनी 'सुवर्णहोन' हे चलन अस्तित्वात आणले. राजे शिवछत्रपती शिवाजी महाराज यांच्या मृत्युसमयी स्वराज्याच्या तिजोरीच्या झालेल्या मोजणीवरुन संदर्भ असा आहे की, तिजोरीत ४ लाखापेक्षा जास्त सुवर्णहोन, नाणी व इतर मोहरा यासारखी नाणी होती.

**शिवकालीन इतर नाणी :-**

गंबार मोहरा, पुतळी पानशाही होन, सनगरी, अच्चुतराई, देवराई, रामचंद्रराई, गुत्तीहोन, धारवाडी, सातलाम्या रभ्रराम्या, शिवराई, कावेरीपाक, प्रलयघटी पाक नाईकी, आदवणी, जडमात ताडपत्री, आकरूजी, दिलदरी, वेंकटराइ, कलमएकरी, देवणहल्ली, त्रिसुळी, महमदशाही, रामनाथपुरी, चंद्राकरी, होन्नुरी, कुणगोटी अशी शिवकालीन नाणी व्यवहारात होती.

**सुवर्णहोन :-**

'होन' हे एक शिवकालीन चलन होय. ते सोन्यापासून बनवले गेले होते. होन याचे वजन सुमारे २.७ ते २.९ ग्रॅम असायचे. होन शिवाजी महाराजांनी



Scanned with CamScanner

राज्याभिषेकाच्या वेळी प्रसिद्ध केले होते. होनाची त्यावेळची किंमत साडेतीन ते चार रुपये, पुतळीची किंमत ५ रुपये तर मोहोराची किंमत १५ रुपये होती. सुवर्ण होनावर सूर्य, चंद्र, बलाचे पान, वृक्ष आणि खंडा म्हणजेच तलवार या स्वरुपाचे चिन्ह असत. इतिहासकारांच्या मते शिवराईवर बिंदूमय वर्तुळ आहे. त्या शिवरायांच्या काळातील असाव्यात. एक ठिकाणच्या संदर्भात शिवराय म्हणतात. इंग्रजांचे शिक्क्यांचे रुपये, पैसे व मोहरा या भूतकाळात चालणार नाही आणि म्हणूनच त्यांनी पारशी, मोगली व इंग्रजी चलनांचे अस्तित्व झुगारुन अर्थव्यवस्थेवरही आपली मराठी शाहीची मोहोर उमटवली. या व्यतिरिक्त चंद्रमे, निशानी, येळुरी होनांची संख्या कोट्याहून अधिक होती. ही फक्त सुवर्ण नाण्यांची मोजदाद होती. राजे श्री शिवछत्रपतींच्या काळातील प्रामुख्याने निर्मिती होन, पुतळी, मोहोर ही सुवर्ण नाणी होय. सह्याद्रीच्या मुतुषाप्रमाणे सोन्याचे होन पाडण्याची पध्दत होती. मात्र केवळ धातुवरुन या नाण्याचे महत्त्व लक्षात येते. सोन्याचे होन हे खूपच दुर्मिळ नाणे आहे. आज हाताच्या बोटावर मोजता येतील इतकेच होन शिल्लक आहे. तरीही काही संशोधक तसेच अभ्यासक महाराज राज्याभिषेकाआधी नाणे पाडत असावेत असे समजतात.

## शिवराई :-


स्वराज्याचे चलन 'शिवराई' राज्याभिषेकाच्या वेळी पाडलेले नाणे आहे. ब्रिटीश राजवटीत नवीन नाणी आल्यानंतर ते हळूहळू बंद झाले. ब्रिटीशांनी सर्व शिवराया गोळा करण्याचा प्रयत्न केला. पण अजूनही काही शिवराया नदीतील वाळूत किंवा जमिनीत सापडतात. शिवरायांचे नाव घेताच डोळ्यासमोर येणारी नाणी म्हणजे शिवराई. होनाच रुक्का, तांबडा, छत्रपती अशीही अन्य संबोधने आहेत. तांब्याच्या शिवराई पैशाचे वजन साधारणत: १२ ते १४ ग्रॅम इतक असते व तिचा व्यास २.५ इतका होता. शिवराई पैसा तसेच सोन्याचा होन हे हाती पाडले जायचे. त्यामध्ये तांब्याची पट्टी व त्यावर उलटी अक्षरे असून हातोड्याने त्यावर घाव घातला जायचा. नाण्यावरील निशाण बरेचदा बाजूला सरकलेली दिसते. या पद्धतीने पाडलेल्या नाण्यास क्रूड एईन्स असे म्हणतात. त्यामुळे ही नाणी ओबडधोबड स्वरुपाची दिसतात. शिवराई हे नाणे पुणे व त्या इतर भागात जास्त प्रमाणात वापरत होते.

## शिवराई चलनाचा इतिहास :-

छत्रपती शिवाजी महाराज जितके थोर त्याचप्रमाणे त्यांनी केलेल्या सर्व गोष्टी देखील तितक्याच थोर आहे. महाराजांच्या काळात दळणवळणासाठी वापरले जाणारे चलन श्री छत्रपती शिवाजी महाराजांनी सन १९६४ मध्ये त्यांच्या राज्याभिषेकापूर्वी वापरात आणले. महाराजांनी सर्वात पहिले आणलेले हे चलन म्हणजेच नाणे. महाराजांच्या ताकदीइतकी वजनाने नाणे भारदस्त होते. या नाण्याचे वजन अंदाजे पाऊन तोळा तरी असेल असे आपल्याला इतिहासात डोकावल्यावर कळेल. महाराजांनी चलनात आणलेल्या या नाण्यावर 'जी' आणि 'सी' अक्षरे अंकीत केलेली होती. या नाण्यावर महाराजांनी शिवराई हे चलन अस्तित्वात आणले व तेच बाजारात दळणवळणासाठी पेशवाईच्या अस्तापर्यंत वापरले गेले. (संकलित)



Scanned with CamScanner



# रामशेज किल्ला

तिडके शुभांगी मोहन, द्वितीय वर्ष (बी.ए.)

मराठ्यांचे साम्राज्य नष्ट करण्यासाठी औरंगजेब प्रचंड सैन्यासह दख्खनमध्ये उतरला. नाशिक प्रांतात त्याचे वर्चस्व होते. पण नाशिकजवळ असणारा रामशेज प्रचंड आणि उंस असा नाही, पण प्रचंड अशा मोगली सैन्याला या किल्ल्याने जवळपास सहा वर्षे झुंजवले. रामशेजला वेढा घालून बसलेला सरदार शहाबुद्दीन खान याला यशच काय, यशाचा सदराही धरता आला नव्हता. हे यश मिळाले नाही. तर बादशहांकडे आपली अप्रतिष्ठा ठरलेलीच.

रामशेजवर हल्ला चढवायचा आणि आपल्या सैनिकांना दफन करायचे एवढेच काम त्यांच्याकडे उरले होते. अखेर त्याचा मोतदार त्याला म्हणाला भुते वश करण्याकामी मी पटाईत आहे. शंभर तोळे वजनाचा एक सोन्याचा साप तयार करा. तो माझ्या हातात द्या आणि हल्ल्याच्या वेळी मला आघाडीवर ठेवा. मी भूतांच्या सहाय्याने किल्ल्याच्या प्रवेशद्वारापर्यंत कोणतीही अडचण न येता जाऊ शकतो. खानाने त्याच्या म्हणण्यानुसार केले. तो मोतदार हल्ल्याच्या वेळी पुढे उभा राहिला. तेवढ्यात किल्ल्यावरुन गोफणीचा गोळा येऊन त्याच्या छातीवर इतक्या जोरात लागला की, मोतदाराच्या हातातून सोन्याचा नाग उडाला आणि मोतदार धाराशाई झाला. हे पाहून मोगल सैन्याचा धीर खचला. खूप प्रयत्न केले, पण रामशेजवरील मराठे त्यांच्यासाठी अजेय ठरले.

औरंगजेबाने खानास वेढा उठवून परत येण्यास सांगितले. अपमानित झालेला खान चिडला. तंबू आवरला. रामशेजवर आग ओकण्यासाठी म्हणून लावलेल्या तोफा शांत करुन त्यांची तोंडही वळवण्यात आली. किल्ल्यावर आक्रमण करण्यासाठी म्हणून खानाने लाकडाचा दमदम उभारला होता. त्यात पेंढा आणि दारु भरुन पेटवण्यात आला. प्रचंड जाळ झाला. रामशेजवरील मराठा तटावर उभे राहून पहात होते. नगारे आणि चौघडे वाजवत ते हल्लाकल्लोळ माजवत होते.

कसा होता रामशेज ? का नाव पडले रामशेज असे का म्हणतात. श्रीराम वनवासात असताना काही दिवस त्यांचा मुक्काम या डोंगरावर होता. त्यामुळेच हा डोंगर रामाची शय्या म्हणजे रामशेज म्हणून ओळखला जातो. डोंगराच्या पायथ्याशी आशेवाडी नावाचे गाव. वाडीतून काही वेळातच राम मंदिराजवळ येता येते. इथे पाण्याची टाकी आहे. तुटलेल्या तटबंदीतून गडावर प्रवेश होता. उजव्या बाजूस गडाचे मुख्य प्रवेशद्वार आहे. तटामधील खोलगट भागात खालच्या बाजूस चोर दरवाजा, गडावर उध्वस्त चौथरे, गुहा आहेत.

शहाबुद्दीनच्या जागी औरंगजेबाने कासिमखान किरमाणी या शूर सरदारास पाठवले. परंतु कासिम खानाने परिश्रम करुनही गड अभेद्य राहिला. भीमसेन सक्सेना म्हणतो, अनेक गोष्टी केल्या. पण रामजेशचा किल्लेदार सर्व मराठ्यांमध्ये अत्यंत अनुभवी, कसलेला होता. त्याचे प्रयत्न आणि सावधगिरी यामुळे मुघली

(पान ३७ वर)



# श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे - अजिंक्य योध्दा

कु. सावकार वृषाली राजाराम, द्वितीय वर्ष (बी.ए.)

बाजीरावांचे मुळ नाव विश्वनाथ होते. त्यांचे वडील श्रीमंत बाळाजी विश्वनाथ भट हे सातान्याच्या थोरल्या श्री शाहू महाराजांचे पेशवे म्हणजेच मुख्य प्रधान होते. पूर्वीच्या काळी आपल्या पित्याचे स्मरण रहावे यासाठी त्यांचेच नाव आपल्या मुलाला ठेवण्याची पध्दत रुढ होती. बाळाजी पंतांनी आपल्या तीर्थरुपांच्याच नावावरुन (विश्वनाथ परशुराम भट) आपल्या पुत्राचेही नाव विश्वनाथ असेच ठेवले. मग विश्वानाथांचे बाजीराव कसे झाले बरे ? त्याबाबत एक दंतकथा आहे. त्या दिवशी म्हणजेच १८ ऑगस्ट १७०० साली बाळाजीपंत आजवर जितके 'बाजी' नावाचे पराक्रमी पुरुष होऊन गेले (उदा. बाजी जेधे, बाजीप्रभू देशपांडे, बाजी पासलकर, मुरारबाजी देशपांडे इ.) त्यांची बखर वाचत होते. इकडे पंतांची बखर वाचून पूर्ण झाली आणि सूईनीने येऊन वार्ता सांगितली 'पुत्र प्राप्त जाहला' बाळाजीपंतांना हा योगायोग वेगळाच वाटला. बखर वाचून झाल्यावर लगेचच माझीही त्या बखरीतच जागा आहे. हे दाखवण्यासाठीच जणू पुत्र जन्माला आला असावा. हा शुभ शकून समजून बाळाजी पंतांनी आपल्या पुत्राचे नाव 'बाजीराव' असे ठेवले. अर्थात या गाष्टीला अस्सल कागदोपत्री पुरावा नाही. कथा काहीही असो, परंतु बाळाजी विश्वनाथांच्या मनोरथाप्रमाणे साऱ्या जगाचे डोळे दिपवून टाकले !. इ. स. १७१९ च्या पुर्वार्धात बाळाजी विश्वनाथांच्या दिल्ली मोहिमेत बाजीराव जातीने सहभागी झाले होते. हे त्यांचे पहिलेच दिल्ली दर्शन. दिल्ली दरबाराचे काम कसे चालते हे पाहण्याची संधी बाजीरावांना प्रथम याच वेळेस मिळाली. परतु दुर्दैवाने काहीच दिवसात श्रीमंत बाळाजी विश्वनाथ पेशव्यांचे निधन झाले. (मृत्यु दि. २ एप्रिल १७२०) आणि स्वराज्याचे पेशवेपद रिक्त पडले..... इ.स. १७१३ मध्ये कान्होजी आंग्रे यांनी शाहू महाराजांचे पेशवे बहिरो मोरेश्वर पिंगळे यांना अटक केल्यानंतर शाहू राजांनी बाळाजीपंतांना पेशवे पद दिले. तेव्हा गरज होती म्हणून ते कोणालाही खटकले नाही. पण आता त्यांच्या निधनानंतर मात्र सातारा दरबारातील देशस्थ महाराष्ट्रीय ब्राह्मणांना पेशवेपदी पुन्हा देशस्थच हवा असे वाटू लागले. श्रीपतराव परशुराम पंत प्रतिनिधी, आनंदराव पंत सुमंत, नारो रंगराम शेणवी पंतमंत्री, चिमणाजी दामोदर मोघे अशा देशस्थांनी बाजीरावांसारख्या चिपळुण्याला पेशवेपद मिळू नये यासाठी प्रयत्न सुरु केले. पण तरीही शेवटी अंबाजीपंत पुरंदरे, नाथाजी धुमाळ, पिलाजीराव गायकवाड यांनी योग्य रितीने महाराजांना समजावल्यामुळे महाराजांनी 'चैत्र शुध्द सप्तमी शके १६४२ शार्वरीनाम संवत्सरी गुरुवारी राजेश्री बाजीराव बल्लाळ, राजश्री बाळाजी विश्वनाथ मुख्य प्रधान यांचे



Scanned with CamScanner

पुत्र राव मशार निल्हे यांजवरी कृपाळू होऊन पेशवाईची वस्त्रे दिली आणि म्हणूनच जळफळाट झालेल्या सातारा दरबारातल्या देशस्थांनी पुढे आयुष्यभर बाजीरावांना पाण्यातच पाहिले. बाजीरावांना पेशवेपद मिळाल्यानंतर क्षणाचीही उसंत मिळाली नाही. मोगल सुभेदार हुसेनअली सय्यद हा खानदेशात आपल्याच एक बंडखोर सरदाराशी लढत होता. शाहू महाराजांच्या आज्ञेवरुन बाजीराव खानेदशात गेले आणि हुसेन अलीला मदत करुन खानदेशातील बंड मोडले. परंतु बाजीरावांसारखा 'पोरगा' पेशवा झालाच आणि तोही आता बाहेर खानदेशात गुंतलाय हे पाहून हैद्राबादच्या निजाम-उल-मुल्काने, मीर कमरुद्दीन सिद्दीकीने स्वराज्यावर आक्रमण केले. निजामाच्या मोगली फौजा शेवगाव-पैठण ओलांडत असतानाच बाजीराव झंझावाती वेगाने येवून निजामाच्या मोगली फौजावर तुटून पडले. अखेरीस निजाम दाती तृण धरुन शरण आला.

औरंगाबादेत निजामाचा जनाना होता. तहासाठी बाजीराव पेशवे औरंगाबादेत आलेले पाहून त्या सुरतपाक पेशव्याला बघून निजामाच्या बेगमांनी श्रीमंतांवर कौतूकाने चक्क मोती उधळले ! अर्थात या साऱ्या प्रकाराने निजामाचे काय झाले हे वेगळे सांगायला नकोच ! अर्थात पुढे निजामाला असा जळफळाट करण्याची सवयच झाली. कारण युध्द भूमीवर यापुढच्या प्रत्येक वेळी निजामाचा पराभवच झाला. इ. स. १७२७ मध्ये बाजीराव कर्नाटकात असतांना निजाम पुणे जाण्यासाठी निघाला. अर्थात बाजीरावांना ही बातमी समजलीच. निजाम नगरला येईपर्यंत त्याला समजले की, आपण पेशव्यांचे पुणे जाळण्याआधीच पेशवा असफजाहीत घुसून जाळपोळ करतोय... शेवटी आपल्या राजधानीचे रक्षण करण्याच्या नादात आपला अवजड तोफखाना नगरलाच ठेवून निजाम परत फिरला. हे पाहताच बाजीराव त्वरेने औरंगाबादकडे निघाले. औरंगाबाद आणि पैठण यांच्यामध्ये असणाऱ्या पालखेडच्या मैदानातच बेसावध असतांना पेशव्यांच्या फौजांनी निजामाला गराडले आणि त्यांचे पाणीच तोडले. २५ फेब्रुवारी १७२८ मध्ये पालखेड येथे पेशव्यांच्या फौजांनी निजामाला झोडपले. पाण्याने तहानलेला निजाम शरण आला. ६ मार्च १७२८ रोजी 'मुंगी-पैठण' येथे निजाम आणि पेशवे यांच्यात तह झाला. यानंतर जवळपास दहा वर्षे निजामाने पेशव्यांविरुध्द हत्यार उचलले नाही. परंतु सातारा दरबारातील पंतप्रतिनिधी, पंतसुमंत, पंतमंत्री, सेनापती दाभाडे अशा लोकांनी पेशव्यांना पाण्यात पाहणाऱ्या लोकांना भडकावण्याचे काम मात्र त्यानी सुरुच ठेवले. पुढे ऑक्टोबर १७३७ मध्ये बाजीराव दिल्लीवर भेट देण्यास निघाले असता. दिल्लीच्या बादशहाने निजामास मदतीसाठी साद घातली.

खरं तर निजाम बाजीरावांना शह द्यायला निघाला खरा, परंतु पेशव्यांची अत्यंत जलद हालचाली करुन निजामाची छावणी भोपाळला पडली असता. पालखेड प्रमाणे इथेही प्रथम त्यांचे पाणी तोडले आणि त्यांच्या संपूर्ण छावणीला गराडले. आपल्या बापाला मराठ्यांनी पकडला हे पाहून निजामाचा मुलगा नासिरजंग हा हैदराबादहून निघाला, परंतु तो सातपुडा ओलांडून जात असतानाच चिमाजी आप्पांनी त्याला नर्मदेच्या



Scanned with CamScanner

दक्षिण तीरावरच रोखून धरले. झाले ! फक्त टाचा घासण्याशिवाय नासिरजंग काहीच करु शकला नाही. इकडे मराठ्यांच्या हल्ल्यांमुळे निजाम इतका घाबरला की तो हत्तीवरच्या अंबारीतच लपून राहिला. अखेरीस याही वेळेस नाक हातात धरुन शरण येण्याखेरीज निजामाला पर्याय नव्हता.

श्रीमंत बाजीराव पेशवे दक्षिणेत चिमाजी आप्पांना लिहिलेल्या पत्रात म्हणतात, '... नबाब बुनर्ग काही भुपाळात व काही इस्लामपुरात टाकून सुलूखाची संपद लावून कोस-दोन कोस चालतात. आमच्या फौजा चौतर्फा चालवून दाणा गल्ला-घास-लकडी बंद केली ऐसा प्रसंग जाहला तेव्हा नवाब सर्वांचे दुःख पाहून बहुतच काहीला होऊन सलोखाविसी त्वरा केली. जो नबाब चौथाई व सरदेशमुखाची नावे घेत नव्हता. त्याने मालवे दरोबस्त एसे खास दस्तफाने लिहून दिले....' दुराई सराईच्या या कराराने मराठ्यांचा उत्तरेतला प्रभाव बाजीरावांनी निश्चित केला. जून १७२१ च्या सुमारास पेशव्यांनी मोगल सरदार दाऊदखान पन्नी याचा माळव्यात प्रचंड पराभव केला. इ. स. १७२२ मध्ये कोकणात सरखेल कान्होजी आंग्रे आणि पोर्तुगीज यांच्यात काही बेबनाव झाला. तो सोडविण्यासाठी कान्होजी आंग्रांनी बाजीराव पेशव्यांना मदतीसाठी साद घातली. हे पाहताच केवळ बाजीरावांच्या नावाच्या धाकानेच पोर्तुगीजांनी आंग्रांशी तह केला. इ. स. १७२३ मध्ये माळवा प्रांतातील उज्जैनीचा सुभेदार दया बहादूर या पराक्रमी मोगल सरदाराचा बाजीरावांनी प्रचंड पराभव केला. नोव्हेंबर १७२५ मध्ये बाजीराव कृष्णा नदी ओलांडून दक्षिणेत उतरले. या स्वारीत दक्षिणेतल्या सार्‍या संस्थानिकांनी गुबीचे मुराररराव घोरपडे, आकर्टचा नवाब, गंदग, लक्ष्मेश्वर, कनकगिरी, चित्रदुर्ग, सुशपूर, श्रीरंगपट्टणम्, बिंदनूर इ. लहान-मोठ्या संस्थानिकांनी शाहू महाराजांचे मांडलिकत्व मान्य केले. बाजीराव पुढे तंजावर, मदूर पर्यंत जाणार होते. परंतु निजामाच्या स्वराज्यावरील स्वारीमुळे पेशव्यांना हैद्राबादकडे दौडणे भाग पडले. इ.स. १७२८ मध्ये चिमाजी आप्पांनी पुन्हा माळव्यात दया बहादूर आणि गिरीधर बहादूर या दोघा भावांना मात दिली. आप्पांनी खास गिरी बहादूर मारला. इ. स. १७२९-३० मध्ये बाजीरावांचा मुक्काम मध्य. प्रदेशातील गढामंडला होता. येथे असतांना महाराणा छत्रसालाची ''जो गती ग्राह गजेंद्र की, सा गती भाई है आज ! बाजी जात बुंदेलाकी राखो बाजी लाज'' अशी मदतीची हाक आली. छत्रसाल हे मोगल सरसेनापती महंमदखान बंगश यांच्या वेढ्यात, पन्याच्या किल्ल्यात अडकून पडले होते. बाजीराव आपल्या फौजा घेऊन दिवसाला सरासरी तीस-पस्तीस कोसांची (१ कोस= २ मैल, १ मलै = १.६ कि.मी.) दौड मारुन बुंदेलखंडात पोहोचले. पन्न्याच्या किल्ल्यांच्या बाहेर जवळच घमासान युध्द झाले. बंगशाचा प्रचंड पराभव झाला. आणि तो जैतपुरच्या रोखाने पळाला. परंतु बाजीरावांनी जैतपूरलाही वेढा घातला. अखेरीस बंगश शरण आला.

बंगशाने बाजीरावांची इतकी धास्त खाल्ली की, पुढे १७३५ मध्ये बाजीरावांच्या मातोश्री राधाबाई साहेब काशी यात्रेला गेल्यावर काशीचा सुभेदार असलेल्या बंगशाने राधाबाईंची उत्तम बडदास्त ठेवून त्यांना भेटीदाखल एक हजार रुपये रोख आणि तांबडी आलवण (विधवा स्त्रियांनी नेसण्याची तांबडी वस्त्रे)



Scanned with CamScanner

नजर केली. बुंदेलखंडातल्या या पराक्रमावर खुश होऊन छत्रसाल महाराजांनी बाजीरावांना पन्ना येथील हिऱ्याच्या खाणी आणि आपल्या राज्याचा एक तृतीयांश हिस्सा, म्हणजेच सुमारे बत्तीस लक्ष वार्षिक उत्पन्नाचा मुलूख बाजीरावांना बक्षीस म्हणून देऊन टाकला. अर्थात् बाजीरावांनी अत्यंत उदारपणे आपल्याला खासगीत मिळालेली ही मिळकत सरकारात जमा केली हे विशेष कौतूक ! शिवाय छत्रसालांनी आपली कन्या 'मस्तानी' हीचा विवाह बाजीरावांशी लावून दिला. बुंदेलखंडानंतर लगेच सेनापतींचा तट उद्भवला. सेनापती त्र्यंबकराव दाभाडे हे पेशव्यांनी मिळवलेल्या 'माळवा' या मोक्याच्या प्रांतावर नजर ठेवून होते. पेशव्यांना खाली ओढण्यासाठी दाभाड्यांनी आणि गायकवाडांनी निष्कारण 'ब्राह्मण विरुध्द मराठा' असा जातियवाद पेटवून दिला. अखेरीस शाहू महाराजांच्या आज्ञेवरुन पेशव्यांनी दाभाड्यांना गुजरातेत शिरुन मात दिली. खासा सेनापती त्र्यंबकराव दाभाडे जुबुरीयाचा (लहान तोफेचा) गोळा लागून पडला. एप्रिल १७३७ च्या पहिल्या आठवड्यात बाजीरावांनी थेट दिल्लीवरच धडक दिली. बादशाहा घाबरुन लाल किल्ल्यात लपून बसला. दिल्ली लुटली गेली. एकेकाळी दिल्लीचे स्वर्गही जिंकून पुन्हा न परतण्याच्या मोहिमेवर गेला. बाजीराव पेशव्यांचे कर्तृत्व असामान्य होते. हिंदुस्थानच्या इतिहासात मराठ्यांना आणि महाराष्ट्राला मानाचे स्थान मिळवून देण्याचे कार्य बाजीरावांनी केले. शिवाजी महाराजानंतर महाराष्ट्रात झालेल्या कर्तृत्ववान पुरुषांत बाजीराव पेशव्यांचा प्रथम क्रमांक आहे. एवढे मात्र निश्चित. दि. १८ ऑगस्ट रोजी असणाऱ्या जयंती निमित्त या थोर पेशव्यांची आठवण ताजी रहावी हाच या साऱ्या उपद्व्यापा मागचा हेतू ! अर्थात् जोपर्यंत पुण्याचा शनिवारवाडा उभा आहे. तो पर्यंत बाजीराव पेशव्यांचे नाव मराठी मनातून पुसणे अशक्य आहे हे मात्र नक्की ! महाराष्ट्राच्या या महान पेशव्याला मानाचा मुजरा....! त्रिवार मानाचा मुजरा.... !!

(संकलित)


## रामशेज किल्ला

(पान ३३ वरुन) फौजेचे ही चालेना. गडात लोखंडी तोफा बनवल्या जात. त्यात ते कातडे भरवून तोफा उडवत. अशी एक एक तोफ दहा तोफांचे काम करी. सतत होणारा पराभव आणि सैनिकांचे होणारे नुकसान यामुळे हताश झालेल्या औरंजेबाने वेढ्याचे काम तहकूब केले. रामशेजवरील लोकांचा पराक्रम पाहून छ. संभाजी महाराजांनी किल्लेदाराकडे मानाचा पोशाख, रत्नजडीत कडे, रोख रक्कम पाठवून त्यांचा गौरव केला. त्यांची आपल्या प्रमुख गडावर नेमणूक केली. संभाजीराजांनी गडावर अन्य किल्लेदारांची नेमणूक केली खरी, पण याच किल्लेदाराने सहा वर्षांनी स्वराज्याशी बेईमानी करुन हा किल्ला मोगलांच्या स्वाधीन केला. परंतु रामशेजच्या काळजात असलेले आनंदाचे क्षण न झिरपता चिरंतन राहिले आहेत. (संकलित)

### चारोळी

खूप काही सांगायचं होतं तुला
पण मनातल मनात राहून गेलं...
एके दिवशी सांगणार तर
पाखरु रानात उडून गेलं...

– गांगुर्डे मोहिनी मोतीराम, तृतीय वर्ष (बी.ए.)



# हिरोजी इंदलकर

कु. मोगल वृषाली संपत, द्वितीय वर्ष (बी.ए.)

शिव छत्रपती महाराजांनी जीवनभर एकच वसा पेलला तो म्हणजे माणुस जोडण्याचा. मराठ्यांनी इतिहास घडविला, परंतू स्वराज्य उभे केले ते नेमके यांच्याच बळावर... निष्ठावान माणसं कशाच्या मोहिमेने शिवाजीकडे आली... विश्वास दिला राज्यांनी. आपले राज्य उभा करायाचा, मला छत्रपती व्हायचं म्हणून नाही... तमाम मराठ्यांचं राज्य निर्माण करायचं, रयतेचं राज्य, गरीबांचं राज्य निर्माण करायचे आहे. ही काळजी इथल्या माणसा-माणसांमध्ये होती.

अशाचं निष्ठावान माणसांमध्ये होता हा हिरोजी इंदलकर नावाचा बांधकाम प्रमुख शिवाजी महाराजांकडे होता. रायगड किल्ला बांधायची जबाबदारी राजांनी त्यांच्यावर सोपविली. शिवाजी महाराज स्वारीवर गेले. हिरोजीने किल्ला निम्म्यावर बांधत आणला आणि पैसा संपला. हिरोजीला समजेना काय करावे ? महाराजांनी तर जबाबदारी टाकली आहे. किल्ला तर पुर्ण केला पाहिजे. तर पैसा शिल्लक नाही. त्या हिरोजीने अपूर्ण काम केले. आपला राहता वाडा, आपली जमीन विकली. बायकोसह रायगडावर आला. पैशासह जोडपी घेऊन राहू लागला आणि मराठ्यांची राजधानी बांधून काढली. शिवाजींना आल्यावर कळले की, हिरोजीने काय केले. राज्यभिषेकाच्या वेळी त्या शिवाजींना वाटले या हिरोजींचा सत्कार करावा. राज्यभिषेकाच्या वेळी ते हिरोजींना म्हणाले, **'हिरोजी राजधानीचा गड तुम्ही बांधला, बोला तुम्हाला काय हवय.'** त्यावेळी हिरोजी नम्रपणे मान झुकवून म्हणाले, ' महाराज उभं स्वराज्य तुम्ही पदरात टाकलं आम्हाला आणखी काय हवंय...' महाराज म्हणाले, 'नाही. काहीतरी मागितलेच पाहिजे', त्यावेळी हिरोजी म्हणाला, **'महाराज एक विनंती आहे. रायगडावर आपले जगदिश्वराचे मंदिर आहे. रायगडावर आम्ही जगदिश्वराच्या या एका पायरीवर आमचे नाव कोरायची अनुमती आम्हाला द्या.'**

महाराजांना कळेना हे कसलं मागणं... पगार वाढ नाही मागितली. देशमुखी नाही मागितली.. पाटीलकी नाही मागितली... वतन नाही मागितलं... मागून मागून मागितलं तर काय दगडावर नाव कोरायची परवानगी. महाराजांनी विचारले, **'हिरोजी असं का ...?'**

आणि हिरोजी उत्तर देतात. 'राजे ! ज्या ज्या वेळी रायगडावर असाल. त्या त्या वेळी जगदिश्वराचे दर्शन घेण्यास तुम्ही याल. त्या त्या वेळी तुमची पाऊले त्या पायरीवर पडत जातील आणि महाराज त्यातल्याच जर एका पायरीवर माझे नाव कोरलं असेल... तर त्या त्या वेळी तुमच्या पाऊलाची पायधूळ माझ्या मस्तकावर सतत अभिषेक करत राहील.' (संकलित)

नात्यांना जोडायला प्रेमाची गरज भासते
माणसांना शोधायला विश्वासाची साथ लागते...
प्रत्येकाच्या जीवनात वेगवेगळी माणसे येतात
पण आमच्यासारखी माणसं भेटायला
मात्र नाशिबच लागते...

**चारोळी**

गांगुर्डे मोहिनी मोतीराम, तृतीय वर्ष (बी.ए.)



# संताजी घोरपडे
## मराठा साम्राज्याचे सरसेनापती

नंदकुमार विष्णु तिडके, द्वितीय वर्ष (बी.ए.)

संभाजी महाराजांच्या मृत्युनंतर मराठ्यांच्या स्वातंत्र्य लढ्याची धुरा वाहिली. ती संताजी घोरपडे यांनी हे नाव धनाजी जाधव यांच्यासोबत मराठीशाहीत घेतले जाते. या दोघांनी मिळून दीर्घकाळ (१७ वर्षे) औरंगजेबाच्या बलाढ्य सेनेचा सामना केला. मुघल सैनिकांमध्ये संताजी आणि धनाजी यांची प्रचंड दहशत होती. सार्वत्रिकरित्या मुघल छावण्यांवर हल्ले हे यांच्या युध्दनीतीचा भाग होता. अत्यंत नाजूक पडत्या काळात व जसजसे औरंगजेबाचा प्रतिकार क्षीण होत गेला. तसतसे नंतर धुनाजींनी स्वराज्य पसरवण्याचे धोरण अवलंबले. १७०७ मध्ये औरंगजेबाच्या मृत्यु समयी मराठ्यांनी मध्य भारतापर्यंतचा भूभाग स्वराज्यात आणला होता. शिवाजी महाराजांनी स्थापिलेल्या स्वराज्याला संताजी व धनाजी यांनी वाचवले व पसरवले. मराठ्यांनी १८ व्या शतकात जवळपास संपूर्ण भारतावर आपला दरारा निर्माण केला. त्यांच्या एका मोहिमेचा हा किस्सा...

शंभु राजानंतर राजाराम महाराजांनाही आता औरंगजेब वाट मोकळी करत नव्हता. त्यामुळे पन्हाळ्यावरुनच राजाराम महाराज राज्यकारभार पाहत होते. सर्व मराठा मावळ्यामध्ये एक शल्य होते आणि ते म्हणजे संभाजी महाराजांसाठी काहीच करु शकलो नाही. मनात ठासून राग भरला होता. पण याला पर्याय काय ? कोण घेणार पुढाकार ? कोण राखणार स्वराज्य ? कोण राखणार शिवरायांची शान ? कोण मिळवून देणार मावळ्यांना आत्मविश्वास ? आणि याचा उद्रेक शेवटी होणार तो झालाच. मराठा सरदारांच्या गुप्त बैठका सुरु झाल्या ? कसा बदला घ्यायचा ? त्या औरंग्याचे दात कसे घशात घालायचे ? कसे दाखवायचे मराठ्यांचे सळसळते रक्त ? कोण येणार पुढे ? गुप्त सल्ला मसलतीमध्ये आघाडीवर होते संताजी घोरपडे आणि धनाजी जाधव. सोबतीला संताजींचे दोन बंधू बर्हिजी आणि मालोजी. सोबत विठोबा चव्हाण तसेच आणखी काही शूर सेनानी. या गुप्त बैठकीत धाडसी बेत ठरला की, औरंग्याला त्याच्याच छावणीत घुसून लज्जित करायचा. त्याचा पाडाव करायचा.

त्यात सोन्याहून पिवळी एक गोष्ट म्हणजे शंभू राजांचा बदला तुळापूर येथेच करायचा. कारण औरंगा येथेच होता. (तुळापूर जिथे संभाजी राजांना मारण्यात आले.) चर्चा झाली. निर्णय ठरला. धनाजीरावांकडे पाहत संताजी घोरपडे म्हणाले, 'खानाचा माज तुम्ही जिरवा फलटणला आणि मी खुद्द २००० निवडक मावळ्यांसोबत औरंग्याला मराठ्यांचा रुद्रावतार दाखवतो'. संताजींनी सर्व मोहिम नियोजनबध्द आखली.

दस्तुरखुद्द संताजींनी एका एका मावळ्याला प्रत्यक्ष भेटून त्यांचा जोश वाढविला आणि प्रसंगी संयम राखण्याचा सल्ला दिला. हळूहळू संताजींची ही तुकडी तुळापूरकडे कूच करु लागली. औरंग्याला त्यावेळी



Scanned with CamScanner

विचारसुध्दा नव्हता की, अशी त्याची वाट मावळे लावतील. भयान अंधारातून पायवाट काढली जाऊ लागली. झाडाझुडपाचा, पालापाचोळ्याचा आणि रातकिड्यांचा आवाज कानी घुमू लागला. तुळापूर जसजसे जवळ येत होते तसतसे मुघलांची घुबडं दिसू लागली. रात्रीची भयाण शांतता तुळापूरभोवती पसरलेली होती. त्यावेळेस काही मराठी लोकांच्या फौजाही औरंग्याकडे होत्यात. त्यामुळे मुघल सैन्याला वाटले आपलीच माणसे असतील आणि नेमका याच गोष्टीचा आणि अंधाराचा फायदा घेत मावळ्यांची तुकडी थेट औरंग्याच्या छावणीत घुसली. काही कळायच्या आतच मावळ्यांनी 'हर हर महादेव' चा जयघोष करत आणि 'जय भवानी, जय शिवाजी' या नावाने मोगलांची अक्षरश: कत्तलच सुरु केली. शीर धडावेगळे होत होतं, कुठे नुसती रक्ताची चिळकांडी दिसून येत होती. औरंग्यासोबत अख्खी त्यांची लाखोंची सेना भांबावून गेली होती. या अवस्थेत ते स्वत:च्याच सैन्यासोबत युध्द करु लागले. बरगडीत मराठ्यांच्या तळपत्या तलवारी घुसून बाहेर पडू लागल्याने तडफडत जीव सोडू लागले. एकच हल्लकल्लोळ सुरु झाला. परंतु तरीही संताजींचा एक मनोदय फसला. तो म्हणजे औरंग्याला भुईसपाट करायचा. अंगरक्षकांनी अक्षरश: पळवूनच नेले त्याला.

जेवढे प्रचंड नुकसान करता येईल तेवढे करत करत शेवटी औरंग्याचा तंबूच उखडून टाकला. औरंग्याचा डेरा भुईसपाट करुन त्याचा सुवर्णकलश निशाणी म्हणून घेऊन संताजींनी मावळ्यांना माघारी फिरण्याचा आदेश दिला. या अगोदर की, औरंग्याची सेना तयार होईल. छोट्या छोट्या तुकडीत विभागून संताजींनी मावळ्यांना शेवटी मोहिम सिंहगडाकडे कूच करण्याचा आदेश दिला. मोहिम फत्ते झाली होती. (संकलित)

# तानाजी मालुसरेंचा पोवाडा

**शाहीर तुळशीदास....**

राजगड राजाचा । प्रतापगड जिजाबाईचा ॥
सिंहगड पन्हाळा । पहा त्या मोगलांचा ॥
शिवाजी महाराज । राजगड किल्ल्यावर नसले ॥
जिजाबाई माता । आहे प्रतापगडावरी ॥
सोमवारच्या दिवशी । हाती हस्तनाची फणी ॥
उगवते बाळू नजर गेली । नजर सिंहगडावर गेली ॥
बारा मावळ पुण्याखाली ।बारा मावळ जुन्नराखाली ॥
पुण्याच्या तोंडाला (जेजुरीच्या बाजूला)।
किल्ला सिंहगड पाहिला ॥
नवे कोंबडीचे अंडे । (ऐसा) किल्ला सिंहगड झळकला
ऐसा तो पंतोजी काका । त्याने हुजरा बोलविला ॥
जावे राजगड किल्ल्याला । अंचरावे प्रतापगडाला ॥
शिवाजी महाराज पाच पोशाख नटला ।
पाई तुमानी सुरवारी चढविल्या ॥
आले प्रतापगड किल्ल्याला ।
सलाम जिजाबाईला केला ॥
धाडला तुम्ही हुजराचा जासूद । काम सांगावे आम्हाला
शिवाजी महाराज । डाव फाशाचा खेळावा ॥
तीन डाव गेले ज्याचे । त्या शिवाजी महाराजांचे ॥
जिजाबाई ग माते । आता डाव येऊ दे तुझा ॥
बाईचे तिरपडगे पडले । जिजाबाईचे डाव पुरे रे झाले
ऐक जिजाबाई । सत्तावीस किल्ल्यांचा मी राजा ॥
माग माग जिजाबाई । जे मागाल ते देतो तूज ॥
सिंहगड किल्ला घेणे । मला कोणी उमराव दिसेना ॥
किल्ला घेईल सुभेदार । तानाजी सुभेदार ॥
खर खर लखोटा लिहिला ।
ज्याने हुजऱ्या बोलविला ॥

– **अर्चना बाळासाहेब गचाले**, तृतीय वर्ष (बी.ए.)



Scanned with CamScanner

# येसाजी कंक

**तिडके शुभम लक्ष्मण**, द्वितीय वर्ष (बी.ए.)



छत्रपती शिवराय हे राज्याभिषेकानंतर दक्षिण दिग्विजयासाठी गेले होते. त्यावेळी आदिलशाही संपवण्यासाठी त्यांनी कुतुबशहाशी हातमिळवणी केली होती. कुतुबशहाने भेटीच्या वेळी विचारले की, 'मराठा सैन्यामध्ये हत्ती का नसतात ?' त्याबदल्यात शिवरायांनी उत्तर दिले होते की, 'स्वराज्याच्या सैन्यातील प्रत्येक मावळा हा हत्तीवर भारी पडू शकतो.' तेव्हा येसासी कंक यांनी आपल्या राजाचा शब्द खरा करुन दाखवण्यासाठी म्हणून आखाड्यात उडी घेतली. त्यांनी हत्तीशी एकट्याने झुंज दिली व हत्तीस पळवून लावले.

येसाजी शांतपणे मैदानातून वर आला. शामियान्यात येवून त्याने मुजरा केला. घामाने डबडबलेल्या राजांनी येसाजीला मिठी मारली. आपल्या हातातील रत्नखचित सलकडी येसाजीच्या हाती घातली. काही न बोलता राजे परत बसले. तानाशहानी येसाजीवर देणग्यांची खैरात केली. येसाजी कुतुबशहाच्या दरबारी कुतुबशहा तयार झाले. येसाजी मुजरा करुन म्हणाला, 'मी महाराजांचे अन्न खातो. ते आपलेच आहे. त्यापेक्षा जहागिरी का जास्त आहे ?' त्या उत्तराने तानाशहा आणखीन खुश झाले ते राजांना म्हणाले, 'महाराज हा तुमचा माणूस आम्हाला द्या. राजांचा हात गळ्यातल्या नवरत्नांच्या कंठ्याशी गेला. राजांनी हसून विचारले. 'या कंठातलं एखादा रत्न निखळेल तर काय होईल ?' कंठाची शोभा जाईल !' हजरत आम्ही कंठा वापरतो, तो हौसेसाठी नाही, न ऐश्वर्यासाठी प्रदर्शनासाठी हा कंठा या माणसांची आठवण आहे. यातला प्रत्येक माणूस हा आमचाच तोलामोलाचा आहे. आमचे राज्य हत्तीच्या बळावर नव्हे. यांच्या आधारावर सुरक्षित आहे. एक एक माणूस मिळवून माळेस मनी जोडले आहेत. ते मनी कसे काढता येतील ? 'तानाशाहा निरुत्तर झाले.' त्यांना काही तरी एकदम आठवले. ते राजांकडे वळून विचारते झाले, 'एक विचारु ? संकोच कसला ? जेव्हा तुमचा माणूस हत्तीशी झुंजत होता. असल्या झुंजीची भीती वाटते ? आपका कहना दुरुस्त है. राजे म्हणाले, 'हि जीवला जीव देणारी माणसे, वेळ का सांगून येते ? घात, अपघात होतात. चुकून पाऊल फसते. करमणुकीच्या पायी असे मोहरे खर्ची टाकण्याची सवय आम्हाला नाही. आपल्या इच्छेखातर आम्ही येसाजीला पाठवले, पण तो माघारी येईपर्यंत आमच्या जीवात जीव नव्हता.' (संकलित)

**चारोळी..**

पहिल्यांदा तुला पाहिल्यावर
जीवनात प्रेमाचे वादळ आले...
तुझ्या त्या स्मित हास्याने
मी त्यात गुरफटले
अन् तुझ्या त्या सहज होकाराने
माझे प्रेमरुपी वादळ शांत झाले...

– **गांगुर्डे मोहिनी मोतीराम**, तृतीय वर्ष (बी.ए.)



Scanned with CamScanner

# कान्होजी आंग्रे

**कु. जगताप पूजा सुनिल,** द्वितीय वर्ष (बी.ए.)



सुमारे २५ वर्षे कोकणचा सागरी किनारा स्वराज्यात सुरक्षित ठेवण्यात यशस्वी ठरलेले 'मराठी आरमार प्रमुख' स्वकर्तृत्वावर उत्तुंग झेप घेणारा, परकीय शत्रूंची दाणादाण करुन त्यांची झोप उडविणारा मराठी सरदार, दर्याबहादूर कान्होजी. कान्होजी आंग्रे यांचा जन्म १६६९ मध्ये रत्नागिरी जिल्ह्यातील हर्णे या गावी झाला. पुणे जिल्ह्यातील काळोसे हे त्यांच मूळ गाव. काळोसे गावातील सारंगवाडी या छोट्या भागावरुन त्यांचे आंग्रे हे आडनाव रुढ झाले. कर्तृत्व, पराक्रम आणि निष्ठा यांची परंपरा कान्होजीला पुर्वजांकडून लाभलेली होती. तरीही स्वपराक्रमाने स्वत:चा एक स्वतंत्र ठसा त्यांनी इतिहासात उमटविला. इ. स. १६८८ च्या सुमारास सिद्दी कासम या औरंगजेबाच्या सेनापतीस कान्होजीच्या अभ्यासपूर्ण योजनेपुढे आणि जिद्दीपुढे हार पत्करावी लागली. आमिष दाखवून कोकणातील किल्ले ताब्यात घेणाऱ्या मोगलांचे स्वप्न कान्होजींनी धुळीस मिळविले. सुवर्णदुर्गचा लढा यशस्वी करुन त्यांनी आपल्या पराक्रमास सुरुवात केली. तसेच ह्या विजयानंतर मोगलांनी ताब्यात घेतलेले किल्ले काबीज करण्यास त्यांनी सुरुवात केली.

छत्रपती राजारामांच्या काळात मराठ्यांचे अस्तित्व टिकविण्याची जबाबदारी कान्होजींवर आली होती. त्यांची स्वतंत्र कामगिरी पाहूनच राजारामांनी त्यांना 'सरखेल' हे सन्मानाचे पद दिले. कान्होजींनी अलिबागचा कुलाबा किल्ला जिंकून राजधानी तेथे थाटली. छत्रपती राजारामांनी आंग्रे यांना आरमारचा प्रमुख केले. आंग्रे कोकण किनाऱ्याचे राजे झाले. इ. स. १७०० मध्ये राणी ताराबाईनीही ह्या पराक्रमी वीराला सन्मानित करुन सावंतवाडी ते मुंबईपर्यंतची किनारपट्टी रक्षणासाठी ताब्यात दिली. ह्या नव्या आव्हानाबरोबर कान्होजींना एकाच वेळी परकीय आणि स्वकियांबरोबर लढा द्यावा लागत होता. कोकणाबरोबरच कच्छ, सौराष्ट्रापासून त्रावणकोर, कोचीनपर्यंतची सागरी सत्ता कान्होजींच्या हाती होती. सागरी भागात मुक्तपणे संचार करणाऱ्या परकीयांवर निर्बंध आले होते. १६९८ पासून मराठी राज्याची सारी सागरी सत्ता कान्होजींकडे आली होती. त्यांच्या परवान्याशिवाय कोणीही सागरावर व्यापार करु शकत नव्हते. ह्याचा प्रतिकार करण्याचे परकीयांनी ठरविले. सर्व परकीयांनी एकत्रित येऊन कान्होजींना संपविण्याचे ठरविले. तरीही त्यांनी इंग्रज, पोर्तुगीजांनाही पराभूत केले. शत्रूच्या आक्रमणांना तोंड देण्यासाठी कान्होजींनी दुरदृष्टीने अगोदरच अनेकांशी मैत्रीचे संबंध ठेवलेले होते. त्यांनी आपले आरमार अधिक शस्त्रसज्ज केले. पोर्तुगीजांच्या मार्गदर्शनाखाली शस्त्रनिर्मितीचा कारखाना आणि कुलाबा, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग येथे सुधारित पध्दतीने जहाज बांधणीचे कारखाने त्यांनी उभारले. कान्होजींचा लढा धार्मिक आक्रमणाची धार कमी करण्यासाठीही होता. कान्होजी आंग्रे यांनी कोकणातील मंदिरांसह पंढरपूर, आळंदी, जेजुरी, तुळजापूर येथील देवस्थानांना इनाम व रोख देणग्याही दिल्या. छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्युनंतरही औरंगजेबाला मराठी मुलूख काबीज करता आला नाही. यामागे अनेक शूर सरदारांचे योगदान होते. कोकण किनाऱ्यावरील राजसत्तेचा जागता पहारा असणारे कान्होजी त्यातीलच एक... (संकलित)



Scanned with CamScanner



# मुल्हेर किल्ला

कु. सावकार वृषाली राजाराम, द्वितीय वर्ष (बी.ए.)

सह्याद्री पर्वताच्या उत्तर दक्षिण रांगेची सुरुवात नाशिक जिल्ह्यातील बागलाणातून होते. उत्तरेकडून सुरु होणाऱ्या या सह्याद्रीच्या रांगेला सेलबारी किंवा डोलबारी रांग असे म्हणतात. सेलबारी रांगेवर मांगी-तुंगी सुळके, न्हावीगड, तांबोळ्या असे गड आहेत. तर दुसऱ्या डौलबारी रांगेवर मुल्हेर, मोरागड, साल्हेर, हरगड, सालोटा हे गडकिल्ले आहेत. पश्चिमेकडील गुजरात मधील घनदाट जंगल असलेला डांगचा प्रदेश आणि महाराष्ट्रातील बागलाण विभाग यांच्या सीमेवर हे किल्ले वसलेले आहेत. बागुलगड म्हणजे बागलाण. सुपीक, संपन्न आणि सधन असा प्रदेश, गुजरात आणि महाराष्ट्रीय अशा संमिश्र आचारविचारांचा प्रभाव पडलेला आहे. पाण्याचे प्रमाण जास्त असल्याने बागायती शेती मोठ्या प्रमाणावर चालते. त्यामुळे लोकांची आर्थिक स्थिती ही फार चांगली आहे. मुल्हेरचा किल्ला हा नाशिक जिल्ह्यात सटाणा तालुक्यात आहे. किल्ल्याच्या पायथ्याशी मुल्हेर गावं आहे.

मुल्हेरचा किल्ला हा प्राचीन किल्ला आहे. पूर्वी किल्ल्यातच गावं वसलेले होते. मात्र कालांतराने गाव खाली उतरले आणि पायथ्यापासून सुमारे २ कि.मी. अंतरावर वसले. हे मुल्हेर गाव महाभारतकालीन आहे. याचे नाव होते रत्नपूर. या भागात मयुरध्वज नावाचा राजा होऊन गेला आणि गावाला मयुरपूर नाव पडले. तर किल्ल्याला मयुरगड हे नाव पडले. औरंगजेबाने किल्ला जिंकला तेव्हा याचे नाव औरंगगड असे ठेवण्यात आले. पुराणात मुल्हेरचा उल्लेख येतो. मात्र खात्रीलायक माहिती चौदाव्या शतकाच्या पहिल्या दशकात मिळते. मुल्हेरचा किल्ला बागुल राजांनी बांधला. इ. स. १३०८ ते १६१९ पर्यंत बागुलांनी येथे राज्य केले. या घराण्याच्या नावावरुनच परिसराला बागुलखेड व त्याचा अपभ्रंश बागलाण हे नाव पडले. बागुल राजे हे मुळचे कनोजचे या बागुल घराण्याच्या काळातच जगप्रसिध्द मुल्हेर मुठ बनवण्यात आली. या घराण्यात एकूण ११ राजे आले. या राजांना बहिर्जी ही पदवी होती. विजयनगर अगोदर बागलाणमध्ये हिंदुसत्ता प्रस्थापित होती. अकबराने जेव्हा खानदेशाचे राज्य जिंकले. तेव्हा प्रतापशहा बहिर्जी बागलाणचा राजा होता. त्याने मोगलांचे सार्वभौमत्व पत्करले. पुढे शाहजहानशी या राजाने मैत्रीपूर्ण संबंध निर्माण केले. जुलै १६३६ला औरंगजेबाची दक्षिणेचा राज्यपाल म्हणून नेमणूक झाली. इ. स. १६३८ मध्ये मोगलांनी बागलाणवर हल्ला केला आणि मुल्हेर किल्ला जिंकला व त्याचे नाव औरंगगड असे ठेवले. १५ फेब्रुवारी १६३८ रोजी वैभवशाली हिंदूंचे राज्य संपुष्टात येऊन तेथे मोगलांची सत्ता प्रस्थापित झाली. मुल्हेर ही बागलाणची परंपरागत राजधानी होती.

किल्ल्यावर महंमद ताहिर याची नेमणूक प्रथम किल्लेदार म्हणून झाली. या ताहिरने मुल्हेरजवळ ताहीर नावाचे गाव वसवले व त्याचे कालांतराने ताहिराबाद असे नामकरण झाले. इ. स. १६६२ मध्ये मुल्हेर



Scanned with CamScanner

किल्ल्यामधील सैनिकांनी अपुऱ्या पगारासाठी बंड केले. दुसऱ्या सुरत लुटीनंतर शिवाजी महाराजांनी बागलाण मोहीम उघडली. यामध्ये त्यांनी साल्हेर, मुल्हेर व इतर किल्ले स्वराज्यात सामील करुन घेतले. मराठ्यांनी १६७१ मध्ये मुल्हेरगड काबीज केला. त्यानंतर पुन्हा किल्ला मोगलांच्या हातात पडला. इ.स. १७५२ च्या मालकीच्या तहानुसार मुल्हेर सकट खानदेशमधील सर्व प्रदेश मराठ्यांच्या हाती आला. यानंतर त्रिंबक गोविंद मुल्हेरचा किल्लेदार झाला. १७६५ मध्ये किल्ल्यावर गुप्तधन मिळाल्याच्या नोंदी पेशवे दप्तरात आहेत. अशा रितीने १५ जुलै १८१८ रोजी हा किल्ला ब्रिटीशांच्या तावडीत सापडला.

## गडावरील पाहण्यासारखी ठिकाणे :-

मुल्हेरगडाचे प्रामुख्याने दोन भाग पडतात. एक म्हणजे मुल्हेर माची आणि मुल्हेर बाले किल्ला. गणेश मंदिरापासून २ वाटा फुटतात. एक वाट वर चढत जाते व दुसऱ्या वाटेला येऊन मिळते. या वाटेने डावीकडे गेल्यावर १० मिनीटातच सोमेश्वर मंदिर लागते, तर उजवीकडे जाणारी वाट आणि गणेश मंदिरापासून निघणारी उजवीकडची वाट एकत्र येऊन मिळतात. याच वाटेने थोडे पुढे गेल्यावर एक पठार लागते. पठरापासून दोन वाटा लागतात. वर जाणारी वाट मोती तलावापाशी जाते. या टाक्यातील पाणी पिण्यास योग्य आहे. पठारापासून समोर जाणारी वाट राजवाड्यांच्या भग्न अवशेषांपाशी घेऊन जाते. येथेच एक गुप्त दरवाजादेखील आहे. राजवाड्यांच्या थोडे खाली आल्यावर रामलक्ष्मण मंदिर लागते. राजवाड्यांच्या वाटेने थोडे अंतर चालून गेल्यावर मुल्हेर व हरगड यामधील खिंड लागते. सोमेश्वर मंदिराकडे जात असताना वाटेतच डावीकडे ३ मजली चंदनबाव लागते. सध्या येथे प्रचंड झाडी झुडपे आहेत. सोमेश्वर मंदिर राहण्यासाठी उत्तम जागा आहे. मोती टाक्यांच्या उजवीकडे वर चढत जाणाऱ्या वाटेने अर्धा तास चालल्यावर आपण बालेकिल्ल्याच्या महाद्वारापाशी येऊन पोहोचतो. आत गेल्यावर डावीकडे गुहा आहेत. तर समोरच पाण्याचे टाकी आहे. मुल्हेरगडाचा बालेकिल्ला म्हणजे मोठे पठार, बाले किल्ल्यावर पोहोचल्यावर समोरच पाण्याची ९-१० टाकी आहेत. राजवाडाचे भग्नावशेष आहेत. भडंगनाथ मंदिराच्या वर असणाऱ्या टेकडीवरुन खाली उतरलो की, मोरागडाकडे जाणारी वाट दिसते. समोरच असणारी मांगी-तुंगीची शिखरे, न्हावीगड, तांबोळ्या, हनुमानगड लक्ष वेधून घेतात.

मुल्हेर गडावर जाण्यासाठी दोन वाटा अस्तित्वात आहेत या दोन्ही वाटा मुल्हेर गावातूनच जातात. मुल्हेर गाव ते किल्ल्याचा पायथा यात २ कि.मी. चे अंतर आहे. गावातून २५ मिनीटे चालत पुढे आल्यावर डावीकडे एक घर लागते. आणि समोरच वडाचे एक झाड दिसते. झाडापासून सरळ पुढे जावे. दहा मिनिटातच धनगरवाडी लागते. धनगरवाडीवरुन जाणारी वाट पकडावी. साधारण ४५ मिनीटांनी २ वाटा फुटतात एक वाट सरळ तर दुसरी उजवीकडे वळते. सरळ जाणाऱ्या वाटेने २० मिनिटांत मुल्हेर माचीवरील गणेश मंदिरापाशी पोहोचतो. ही वाट हरगड व मुल्हेर किल्ला यांच्या खिंडीतून वर चढते. राहण्याची मुल्हेरमाचीवरील सोमेश्वर आणि गणेश मंदिरात आणि बालेकिल्ल्यावर असणाऱ्या गुहेत सोय आहे. मुल्हेर किल्ला हा अतिशय प्राचीन आणि छान किल्ला म्हणून ओळखला जातो.

(संकलित)



Scanned with CamScanner

# भारतीय संविधान जाणिवेला अभिप्रेत आम्ही भारतीय लोक आहोत काय ?

कु. गांगुर्डे निकिता लक्ष्मण, तृतीय वर्ष (बी.ए.)




२६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिवस म्हणून आपण साजरा करीत असतो. राज्य व केंद्र शासनाकडून या दिवशी संविधानाच्या मुद्यांचे जतन व संवर्धन वेगवेगळ्या उपक्रमांचे आयोजन व अंमलबजावणीने होत आहे. ही बाब स्वागतार्ह आहे. सन २००५ पासून महाराष्ट्रातून संविधानाचे प्रास्ताविक वाचण्यास सुरुवात झाली आहे. प्रत्येक प्राथमिक व माध्यमिक शाळांमधून संविधानाचे महत्त्व व मौलिकता वाढविण्यास सुरुवात झाली. माजी सनदी अधिकारी इ. झेड. खोब्रागडे डे संविधान जागरण अभियानाचे आद्यप्रवर्तक आहे. त्यांची संकल्पना घेऊन आता देशपातळीवर संविधान दिवस साजरा करुन संविधानाचे लौकिक व पावित्र्य वाढविण्याचे प्रयत्न होत आहेत. या आधीपासून आंबेडकरवादी संघटना, नेते, संविधानाचे महत्त्व सांगत होते, परंतु पहिल्यांदाच शासन पातळीवर केंद्र शासनाने २०१५ पासून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महान योगदान उजागर करण्यासाठी उपक्रम हाती घेतला. संविधानाचे आशय व तत्वप्रणाली विषद करण्यासाठी भाषणे, व्याख्याने व चर्चासत्र आयोजित करुन प्रभावी अंमलबजावणी होत आहे. भारतात संसदीय शासनप्रणालीचे महत्त्व जाणीवपूर्वक बिंबविले जात आहे. लोकशाही मुल्यांचा आदर करणे व आचरण करणे. प्रत्येकाचे परम कर्तव्य आहे. यासाठी राष्ट्राला सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही, गणतंत्र घडविण्याची प्रतिज्ञा आपण करतो, परंतु ज्यावेळी मानवतावाद पायदळी तुडवून विज्ञानवादाच्या चिंध्या करणारे, धर्मा-धर्मांमध्ये तेढ निर्माण करुन तीव्र जातीयवादी वातावरण तयार करणारे लोक संविधान विरोधी मुल्यांचा अनादर करणारे लोक भारतीय संविधानाच्या जाणिवांना अभिप्रेत असलेले आम्ही भारताचे लोक आहोत काय ? भारतात राहणाऱ्या लोकांची लाईफ लाईन म्हणुन संविधानाचा वापर व अंमलबजावणी व्हायला हवी तशी होत नाही. यासाठी २६ डिसेंबर हा दिवस संविधान दिवस म्हणुन घोषित झाला. याला अनन्य साधारण महत्त्व आहे.

देशाच्या संविधानात मुळ ३९५ कलमे, ८ परिशिष्टे आणि २२ भागात असून त्यासाठी ७५३५ प्रस्ताव आले होते. त्यापैकी २४७३ दुरुस्त्या केल्या. यासाठी २ वर्षे ११ महिने १८ दिवसांचा कालावधी लागला. मसुदा समितीचे अध्यक्ष या नात्याने डॉ. आंबेडकरांनी रक्त आटवून प्रकृतीची तमा न बाळगता रात्रंदिवस राबून निर्माण केले. याची साक्ष म्हणजे संविधान सभेचा वृत्तांत विषद करणारे १२ खंड हे होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विद्वतेचा, परिश्रमाचा, जिद्दीचा आणि अपरिचित ज्ञानाचा ठसठशीत पुरावाच उपलब्ध आहे.



Scanned with CamScanner

देशाच्या एकुण जडणघडणीत एक व्यक्ती, एक मुल्य सिध्दांत, संसदीय लोकशाही, प्रत्येक भारतीयासाठी मुलभूत अधिकार, कायद्यापुढे समानतेचा अधिकार, संधीची व दर्जाची समानता, अभिव्यक्ती स्वातंत्र्ये आणि नागरिकांसाठी मुलभूत कर्तव्याच्या तरतुदींचा समावेश करुन एक आदर्श आचारप्रणाली निर्माण केली. आतापर्यंत संपूर्ण देश एकसंघ व धर्मनिरपेक्ष राहिला. हे श्रेय संविधानालाच जाते. प्रत्येकाला मिळालेले विचार व अभिव्यक्ती यांचे स्वातंत्र्य ही भारतीय संविधानाचीच देणगी आहे. संविधानाची उद्देशपत्रिका हे आमच्या आम जनतेच्या जीवनाचे घोषणपत्रच आहे.

आम्ही भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय, विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे स्वातंत्र्य, दर्जा व संधीची समानता निश्चितपणे प्राप्त करुन देण्याचा आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता व एकात्मता यांचे आश्वांसन देणारी बंधुता प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करुन आमच्या संविधान सभेत दिनांक २६ नोव्हेंबर १९४९ रोजी याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करुन स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.

सदरील उद्देशपत्रिका लोकशाहीवादी मुल्यांनी ओतप्रोत भरलेली असून त्याची सुरुवात आम्ही भारताचे लोक या वाक्यप्रचारांनी झाली आहे. संविधान अबाधित ठेवण्यासाठी भारतात राहणाऱ्या लोकांना सर्वश्रेष्ठ मानण्यात आले आहे. त्यामुळे प्रखर लोकशाहीवादी जाणीव देशात नांदाव्यात अशी अपेक्षा आहे. आम्ही भारताचे लोक या संकल्पनेत भारतीय संविधानाला अभिप्रेत असणाऱ्या इच्छा, अपेक्षा आणि आकांक्षांना मनापासून अनुसरणारे लोक अपेक्षित आहे, परंतु ज्यांना लोकशाही जाणीवा नको, ज्यांना बुद्धीप्रामाण्यवादी शासनप्रणाली नको, ज्यांना लोकशाही समाजवाद नको, ज्यांना विज्ञानवाद सार्वत्रिक होऊ नये असे वाटते. असे लोक संविधानाला अभिप्रेत नाही. मुळात जे लोक धर्मभेद, लिंगभेद, जातीभेद व जन्मावरुन भेद करतात अशा लोकांचा समावेश संविधानाला अभिप्रेत असणाऱ्या 'आम्ही भारताचे लोक' या वाक्यप्रचारात नाही. तर विषमतेला लाथाडणारे, समानतेची भावना वृद्धींगत करणारे, समताधिष्ठीत समाजरचना निर्माण करणारे, बुद्धीनिष्ठ जीवनाचा आधार मानणारे, विचार तर्कशुध्द असला पाहिजे याचा आग्रह धरणारे, भावनाशुन्य नव्हे तर प्रखर बुध्दीवाद बाळगणारे लोक संविधानाला अभिप्रेत आहेत.

तेव्हा संविधानाची उद्देशिका, अतिशय बोलकी, प्रेरणादायी व कालसापेक्ष वाटते. आज मुलतत्ववादी, हुकूमशाही, झुंडशाही तथा साम्राज्यवादी शक्ती झपाट्याने वाढत आहे. जागतिकीकरण, खाजगीकरण व माहिती तंत्रज्ञानामुळे प्रचंड बेकारी, आर्थिक संकटे व दारिद्र्य या चक्रव्युहात आपण अडकलो आहोत. याचा भीषण परिणाम दलित, शोषित भटके विमुक्त, आदिवासी आदींना भोगावा लागत आहे. एकूणच मुलतत्ववादी शक्ती वंचितांना, शोषितांना दडपताना दिसत आहेत. सर्व बाजूंनी संविधान निर्मित लोकशाहीवादी व्यक्ती, स्वातंत्र्यवादी, धर्मनिरपेक्षवादी शक्ती संपवून टाकण्याचा प्रयत्न जोरदारपणे चालू आहे. तथापि, संविधानाचे आदर व जोपासणे व पावित्र्य आणि मानवी जीवन व मुल्ये अबाधित ठेवणे, प्रत्येकाचे घटनात्मक कर्तव्य आहे.

(संकलित)



Scanned with CamScanner



# भारतीय समाजातील स्त्रीचे स्थान

**निखाडे वैष्णवी दिगंबर**, तृतीय वर्ष (बी.ए.)

'एक कोटी स्त्री भ्रूणांची गर्भाशयातच हत्या' ही बातमी वाचताना मला आज 'भारतीय समाजातील स्त्रीचे स्थान' हा विषय मांडायचा आहे. या एकाच बातमीने भारतात स्त्रीचे स्थान काय आहे, हे स्पष्ट होत नाही का ? पण या एकाच नव्हे तर अशा अनेक बातम्यांनी स्त्रीचे स्थान खरोखरच काय आहे. हा प्रश्न निर्माण होतोय. आजही भारतात स्त्री जन्माला येण्यापूर्वी मारली जाते आणि जन्माला आलेली स्त्री अनेक रुढी, परंपरा समाज, समज-गैरसमज यांनी जखडून जखडून मारली जाते.

स्त्री मुक्ती, स्त्री विकास असे शब्द आपण ऐकतो. हे शब्द जितके अवघड आहेत. तितकाच त्यांच्यात सामावलेला अर्थही खूप मोठा आहे. पण असे शब्द वापरण्याची वेळ का यावी ? मानवाने स्वत:ची संस्कृती तयार केली आहे. त्याचप्रमाणे जगरहाटी चालू आहे. मग स्त्रियांबद्दल स्वतंत्र विचार करण्याची वेळ का यावी? कारण एकच, या मानवी संस्कृतीनेच स्त्रीला कमी लेखून तिला बंधनात जखडले. कारण संस्कृती बनवणारा पुरुष होता. भारतीय स्त्रीला असीम त्याग, न्यूनत्व, कमीपणा यांच्या शृंखला घातल्या आणि तिला सोन्याच्या पिंजऱ्यात बसवले हे स्त्रीला मुळी कळलेच नाही. ती त्यातच समरस होऊन गेली.

पंडिता रमाबाई, सावित्रीबाई फुले अशा काहीच स्त्रिया या पिंजऱ्यातून सुटका करुन घेतलेल्या दिसतात.चूल आणि मूल यातच स्त्रीला गुरफटून ठेवले गेले. नाही म्हणायला आता स्त्रियाही नोकरी करायला लागल्या आहेत. पण कितीजणी केवळ आनंद मिळतो म्हणून बाहेर पडतात ? फारच थोड्या स्त्रियांच्या ध्यानी-मनी एकच अक्षर कोरलेले असते. समर्पण संसारासाठी सर्वार्पण, सर्वार्पण आणि सर्वार्पण. या स्त्रियांसाठी वि. दा. च्या कवितेतील हा भाग भावून जातो. ते म्हणतात....

कर कर करा, मर मर मरा
सोसा भोगा अन् सोसतच रहा
रड रड रडा, कुढ कुढ कुढा

सोसत राहणे अन् कुढत राहणे नव्हे तर काय ? जन्माला आल्यापासून तिचे हे सोसणे आणि कुढणे मरेपर्यंत चालूच असते. जेथे आवश्यकता असते तेथेही केवळ दर्शनी वस्तूप्रमाणे स्त्रीचा वापर केलेला असतो. आज स्त्रीने रात्री तर सोडा, पण दिवसासुध्दा एकटने जाणे सोपे राहिले नाही. आजची स्त्री गुरफटली गेली आहे. आपल्यापुढे आदर्श आहे. सावित्रीबाई फुलेंचा, अवकाशात झेप घेणाऱ्या कल्पना चावलाचा, तेजस्विनी सावंतचा ! आपला आपण विचार करावा

तरावया पार भवसिंधु !
एक किरण आशेचा अंध:कार त्यागण्याचा...
एक किरण पुन्हा नव्याने भरारी घेण्याचा....
एक किरण पुर्ण आसमंत सिमीत करण्याचा..

(संकलित)

# खरंच !
# फक्त तुच गं आई.....!

शेळके सोनाली संपत, तृतीय वर्ष (बी.ए.)



**'आई माझी मायेचा सागर दिला तिने जीवनाला आधार !'** आ म्हणजे आई आणि ई म्हणजे ईश्वर हे आपल्या सर्वांनाच माहिती आहे, परंतु खरं सांगायचे म्हटले तर या एका मूर्तीसारखी या जगात दुसरी कोणतच मूर्ती नाही. जी परमेश्वर रुपी प्रत्येकाच्या घरामध्ये आहे. देवाला प्रत्येकाच्या घरी जाणे शक्य नाही म्हणून देवाने ही परमेश्वर रुपी आई प्रत्येकाच्या घरामध्ये पाठविलेली आहे. आईबद्दल कितीही बोलले ना तरी कमी पडेल.

**'स्वामी तिन्ही जगाचा, आई विना भिकारी'**

जगामध्ये कुठेही जा आईसारखी माया, ममता, प्रेम, वात्सल्य देणारी आई कुठेच सापडणार नाही. पोटाला अन्न नसेल तर ते भिक मागून मिळविता येते. पण मातीत गेलेली आई परत मिळविता येत नाही. तो कोणीही असो, आई विना भिकारीच असतो. माझे सर्वांना एकच सांगणे आहे की, आईने आपल्याला खूप अनमोल जन्म दिलेला आहे. तिचे उपकार कधीच फेडू शकत नाहीत. आपल्या कातड्याचे जोडे करुन जरी तिच्या पायात घातले तरी तिचे उपकार तुम्ही, आम्ही कोणीच फेडू शकत नाही. अरे ती गरोदरपणामध्ये असताना आणि नंतरही तिने आपल्याला तळहाताच्या फोडाप्रमाणे जपलेले आहे. आणि जपते आहे. सर्वांची इच्छा असते मुलगा पाहिजे, वंशाला दिवा पाहिजे, परंतु हे का समजत नाही की, मुलगी ही सुध्दा दोन्ही घरांचा ठेवा. उद्या तिही एक आईच होणार, मग तर हे जग आपणास पहावयास मिळणार. पण नाही अनेकांचा मुलगी होण्यास विरोध असतो. मुलगाच पाहिजे. आईला तर मुलगा-मुलगी दोन्हीही सारखेच असतात. परंतु मुलगा म्हटला की, त्याचे मग लाड करायचे. त्याच्या म्हणण्याप्रमाणे चालायचे, वागायचे, परंतु हाच मुलगा मोठा झाल्यावर आईला उलट उत्तर काय देतो ? आईच्या मर्यादा सांभाळत नाही, अरे तुझ्यासाठी तिने खूप कष्ट घेतले. रक्त आटून आटून रक्ताचे पाणी करुन अनवाणी पायांनी राना-वनात फिरुन तुझ्या पोटासाठी तिने खूप कष्ट करुन पोटाची भूक भागविली तुझी. अन् आज तू तिला असे बोलतो. खरंच मुलीसाठी एवढे करेल का कोणी. कारण मुलगी काय परक्याचे धन असते ना. अन् मुलगा म्हटल की, भविष्यात सांभाळ करणारा. असे सांभाळणारे या जगामध्ये फक्त ४०% मुले असतील. असं मी सांगू शकते. खरंच माझ्यासारख्या एका लेकीला एवढीच तळमळ आहे. की तुम्ही मुलींना का कमी लेखतात, कमी समजतात.

मुलाला शिकवून मोठ करतात. परदेशात नोकरीसाठी पाठवितात. त्या आई-वडिलांना केवढं कौतुक असते. परंतु तोच मुलगा जेव्हा त्याला आई-वडील सांभाळण्याचा कंटाळा येतो. म्हणून तो त्यांना वृद्धाश्रमात पाठवितो, परंतु तो वृद्धाश्रमाच्या जेव्हा बाहेर पडतो अन् त्याला जोरात अशी ठेच लागते ना तेव्हा ती आईच धावत येते म्हणून दुसरे कोणीच येत नाही. तेव्हा त्याला समजते, खरंच काय असते या



Scanned with CamScanner

वेड्या आईची माया.

मी एका ओळीतून असे सांगू इच्छिते की,

पंख फुटल्यावर सारी पाखरे भुर्रकन् उडून गेली.

आई-बापाला विसरली. खरंच असंच आहे. मुलीला का नाही घेवू देत शिक्षण. तिने या जगामध्ये येऊन काय असे पाप केलेले आहे की, तिच्यावर चोहोबाजूंनी दडपण टाकले जाते. तिला जगण्याच्या अधिकार नाही देत अन् दिलाच अधिकार तर तिला शिक्षण नाही. अरे तुम्हाला हे का कळत नाही की, सावित्रीबाई फुले या स्व:त शिकल्या अन् त्यांनी मुलींना शिकविले. त्यांना कर्तबगार बनवलं. एवढी माया, ममता, प्रेम, जिव्हाळा, आपुलकी, वात्सल्य, संस्काराची शिदोरी हे सर्व आईच का सांभाळू शकते ? वडीलांना का या जबाबदाऱ्या देवाने दिलेल्या नाही ? कारण देवाने फक्त एका अशाच मुर्तीला पाठविलले आहे की, ती किड्या मुंग्या, पशु-प्राणी, गाई-वासरे या सर्वांचा व्यवस्थित सांभाळ करेल. ती म्हणजे फक्त आणि फक्त तुमची माझी सर्वांची आई. आईच्या डोळ्यांमध्ये नेहमी मायेची, प्रेमाचे अश्रू तरळतात, परंतु ते आपल्याला तो परमेश्वर दाखवत नाही. त्यातलीच माझी एक आई जिने फक्त तोंडावरुन हात जरी फिरविला ना तरी खूप बरं वाटत. डोळ्यांतून आनंदाश्रू वाहतात. आई गावी जरी गेली अन् शेजारच्या बाईने जेवण दिले ना तरी ते पोटभर खावून न खाल्यासारखे वाटते. कारण आईने बनवलेल्या जेवणामध्ये फक्त तिच्या लेकरांसाठी तिने त्या स्वयंपाकामध्ये टाकलेले मिठाप्रमाणे थोडसं ते प्रेम असतं. म्हणतात ना की, **'शेजी घाली भात अन् आई उतरवी हात'**. हे नक्कीच योग्य आहे.

शेवटी आईची लेक या नात्याने अन् तुमची बहिण या नात्याने एवढंच सांगू शकते की, आईबद्दल कधी वाईट बोलू नका ? तिला कधी कमी समजू नका. तिच आपल्या आधाराची काठी आहे. आपणही उद्या कुणाच्या तरी आधाराची काठी बनणारच आहोत, परंतु खरंच ! फक्त या आईसाठी तिने आपल्यावर केलेला उपकार आपल्याला दिलेला अनमोल जन्म, आपल्यासाठी पायाला चटके बसायचे. तिचे पाय भाजायचे, कधी पोटाला तिच्या पोटभर अन्न मिळाले नसेल, पण तिने आपल्या भविष्याचा विचार केला. फक्त तिने आपल्यावर केलेले उपकार विसरु नका. आपल्याला ठेच लागली तर आपण आधी म्हणतो ते फक्त आई गं म्हणून शेवटी म्हणते की,

**खरंच ! फक्त तुच गं आई..**

**फक्त तुच गं आई ई ई...**

---

# कुटूंबाची आठवण

तुमच्यापासून दूर गेल्यावर भावनांच्या
आठवणींचा प्रवास सुरु झाला.
तुमच्या सोबत घालवलेला प्रत्येक क्षण
डोळ्यातून पाझरु लागला
एक थेंब जमिनीवर पडताच....
मुक्याने रडू लागला
काळजावर घाव घालावा
असा प्रवास होऊ लागला
मग हृदयाच्या स्पंदनात ही
तुमच्या सर्वांच्या आठवणींचा गजर होऊ लागला.


**- कतवारे निलम रामदास,**
द्वितीय वर्ष (बी.कॉम)



Scanned with CamScanner

# 'यश म्हणजे काय ?'

शेळके सोनाली संपत, तृतीय वर्ष (बी.ए.)




**'यश'** तर सर्वांनाच हवं हवंस असते, पण यश म्हणजे नेमके काय ? तुम्ही परिक्षेत यश मिळविता.

एखाद्या स्पर्धेत यश मिळवतात. तेही यशच असते, पण ती फक्त एक 'झलक' असते यशाची. आयुष्यातलं यश म्हणजे त्याहून अधिक असे खूप काही असते. यश म्हणजे तुमच्या कष्टाचे फळ. यश म्हणजे तुमच्या कर्तबगारीवरचा शिक्का मोर्तब. यश म्हणजे तुमच्या मनोरथांची पुर्तता. यश म्हणजे प्रगती, यश म्हणजे वैभव. यश म्हणजे धन्यता आणि मान्यता, यशाची सोपी व्याख्या अशी करता येईल 'यश म्हणजे काही साध्य करायचं आणि ते करुन दाखवणं' आपल्याकडे काही गुण, काही क्षमता असतात. म्हणून आपण यश मिळवितो. पण आपण आपले गुण, आपली क्षमता पुर्णता वापरतो की नाही हे महत्त्वाचे आहे. आपल्याकडे जे जे उत्तम आहे ते सर्व प्रकट करणे म्हणजे यश. काम करताना आपण संपूर्ण झोकून देऊन करतो की नाही ? खेळताना आपण आपली सगळी ताकद, सगळे कौशल्यपणाला लावतो की नाही ? चित्र काढतांना, गाणे म्हणतांना, अभिनय करतांना आपण स्वत:ला विसरुन जातो का ? रंगुन तल्लीन होऊन जातो का ? यश हे अस स्वत:ला विसरण्यात सर्वस्व पणाला लावण्यात आणि स्वत:च सर्वोत्तम ते देण्यात असते. तुम्हाला बक्षीस मिळते ते त्यामुळेच.

बक्षीस मिळवितांना तुम्हाला इतरांशी स्पर्धा करावी लागते. पण एक विसरु नका. तुमची खरी स्पर्धा ही स्वत:शीच असते. आमक्याला ९०% मिळाले आणि तुम्हाला ९२% मिळाले. येथे यश संपत नसते. पुढच्या वेळी तुम्हाला ९२% पेक्षा जास्त टक्के हवेत की नकोत? यश एक सफर असते. दरवर्षी कोणी 'एव्हरेस्ट'वर चढाई करत असते. 'एव्हरेस्ट' गाठलं की, तो धन्य होतो. मोहिमेत यशस्वी होतो. त्याने यशाचं शिखर गाठलं, असे आपण म्हणतो. पण यश म्हणजे शिखर नव्हे, की ते एकदा गाठलं की, पुढे आता आणखी काही सर करायचे नाही, जिंकायचे नाही. असे नसते यश ही एक सफर असते. जी कधी संपत नसते. जशी जीवन ही एक सफर आहे.

**'जीवन चलने का नाम... चलती रहे सुबह शाम!'** तुम्ही जेव्हा यश मिळविता, तेव्हा तुम्हाला आनंद तर होतोच. त्याचबरोबर तुमचा हुरुप वाढतो. आत्मविश्वास वाढतो. साहजिकच आपण अधिक यश मिळवावं आणि ते मिळवू शकतो असे तुम्हाला वाटते.

आणखी एक होते. यशामुळे तुमच्या पालकांच्या, तुमच्या शिक्षकांच्या तुमच्याबद्दल अपेक्षा वाढतात. तुमच्यावरची जबाबदारी वाढते. आधीच तुम्हाला त्यासाठी इतरांकडून प्रोत्साहनही मिळते. स्काय इज द लिमीट म्हणतात ते खरेच आहे. **'आकांक्षांना गगन ठेगणे'** याचाही तोच अर्थ आहे. यश हे क्षितीजासारखे असते. जेवढे वर जावे तेवढे ते विस्तारत जाते. यश मोजायचे कसे ?

फक्त पैसा, मानमरातब म्हणजे यश नव्हे. आपण



Scanned with CamScanner

यशाचा विचार पैशाच्या भाषेत करतो. त्यामुळे यश मर्यादित वाढते, पण प्रत्यक्षात यश हे त्याहून व्यापक असते. एखादा यशस्वी उद्योगपती. आता त्याला उद्योजक म्हणतात. त्याचे यश कसे मोजायचे ? त्याला त्याच्या उद्योगातून मिळणारा नफा एवढंच त्याच यश समजणे चुकीचे आहे.

परीक्षेत पहिला क्रमांक मिळविणे हे यश असतेच, पण ते एखाद्याने कॉपी करुन मिळविलेले असेल तर त्याला यश म्हणता येईल का ?कॉपी पकडली गेली नसली तर इतरांना कळत नाही, पण त्याला स्वत:ला कळतंच ना ? त्याचा त्याला मनापासून आनंद होऊच शकत नाही.

मित्र हो, यश हे खरंच हवं ! आपण यश मिळवलं आहे. हे तुम्हालाच मनापासून वाटायला हवं !!!

# एक हास्यविनोद

एका सैनिकाच्या पत्नीने त्याला पत्र लिहिले, परंतु तो नवसाक्षर असल्याने पूर्ण विराम कोठे द्यायचा याचे तिला ज्ञान नव्हते. त्यातून निर्माण झालेली गंमत वाचून तर पहा.

तुमची आठवण येते आपल्या शेंडीला. पिलं झाली सासुबाईना. गुडघेदुखीचा त्रास परत सुरु झाला गाईला. वासरु झाले शेजारच्या मावशींना. नातू झाला आपल्या दिपूला. चांगले मार्क मिळाले आत्याबाईंना. येतांना साडी आणा लवकर या.

**– साळुंके गायत्री बाजीराव**

एस.वाय.(बी.कॉम.)

## छत्रपतींचा पोवाडा

शिवछत्रपतींची कीर्ती । गाऊ दिनरात्री ॥
येईल मग स्फुर्ती । जाई भयभीती पार विलयाला ॥
बाळपणी झेंडा उभा केला ।
स्वराज्याचा इमल बांधून धन्य तो झाला ॥
पांडुरंग शाहीर गातो त्याच्या कवनाला ॥धृ.॥
असंख्य तारे तेजबलाने शोभविती आकाशाला ।
परि शुक्राचा तारा एकच खेचूनी घेतो डोळ्याला ॥
दाहकता सूर्याची भरली शिवरायाच्या मूर्तीत ।
तशी मोहकता चंद्राची ती कडूलिंबाची कडवटता ॥
आम्र फळाची रसलता ती बाभळीची ही संकटता ॥
अथांग गंभीरता दरियाची सरोवराची गोडी ती ।

## फाळणी

परवाच एका स्फोटात मेलो
पहिल्याच झटक्यात स्वर्गात गेलो,
स्वर्गात जायचा एकच फायदा होतो
सरळ जगण्याचा हाच एक कायदा होता...
स्वर्गात जाताच टिळक भेटले
नमस्कार म्हणताच प्रसन्न हसले,
टिळकांनी विचारले...
काय रे स्वातंत्र्यानंतर बदललय का काही
म्हटले छे हो, सरकारच डोक ठिकाणावर नाही...
तिथे लगबगीने सुभाष बाबु आले
विचारु लागले, खाली नेमके काय झाले
मी म्हणालो, नेताजी काय काय म्हणून घडतय हल्ली
फक्त आमदारच म्हणतात चलो दिल्ली...
नेताजी, आजही स्वातंत्र्यासाठी आम्ही रक्त देतोय
फक्त 'खून' आमचं असतं आणि आझाद काश्मीर होतोय

**– अर्चना बाळासाहेब गचाले,**


तृतीय वर्ष (बी.ए.)



Scanned with CamScanner

# केवळ माझा सह्यकडा (सह्याद्री)

साळुंके गायत्री बाजीराव, द्वितीय वर्ष (बी.कॉम.)



१ मे १९६० या दिवशी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. महाराष्ट्र अस्मितेची छत्रपती शिवाजी महाराजांनी केलेला उच्चार पुर्णत्वास पोहोचला. त्याला शब्दबध्द करणारे काव्य निर्माण होऊ लागले. त्यात अनेक कविंनी महाराष्ट्राला काव्यपुष्प अर्पण केली आहेत

महाराष्ट्र ही शुरवीरांची, संतांची, प्रेक्षणीय व धार्मिक स्थळांची, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, औद्योगिक आदी विविध कार्यात पुढाकार घेणाऱ्या महान व्यक्तींची भूमी आहे. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांनी प्रत्येक मराठी माणसात मराठीचा अभिमान जागृत केला. अमृतापेक्षाही मराठी श्रेष्ठ असल्यास दाखला देतांना व मराठीचा गौरव करतांना ज्ञानेश्वरांनी म्हटले आहे की,

**'माझ्या मऱ्हाटीची बोलू कौतुके ।**
**परिअमृतातेही पैंजा जिंके ॥**
**ऐसी अक्षरे रसिके । मेळवीन ॥'**

भारत भूमीवर ज्यावेळी संकटे आली. त्या त्या वेळी अतिशय लढाऊपणाने महाराष्ट्राने संकटांना तोंड दिले आहे. भारतीय स्वातंत्र्य संग्रामात महाराष्ट्रातील अनेक रणझुंजार, अग्रणी नेत्याबरोबरच सर्वसामान्य जनतेनेही सहभाग घेऊन भारताला पारतंत्र्यातून मुक्त केले. म्हणूनच 'महाराष्ट्र गौरव' या कवितेत काव्यविहारी धोंडो वासुदेव गद्रे म्हणतात.

**'निष्ठुर परसत्तेशी मग सतत जोमाने**
**झुंज दिली टिळकाच्या याच महाराष्ट्राने**
**वीर विनायक, बापट, राजगुरु, कान्हेरे**
**प्राणपणाने लढले क्रांतिकारी हे सारे'**

स्वतंत्र महाराष्ट्रामुळे आपल्याला जन्म व नावलौकिकच नव्हे, तर वेगळे असे अस्तित्वही मिळाले आहे. अशा माऊलीचा गौरव करतांना कविवर्य कुसुमाग्रज म्हणतात

**हे शिवसुंदर समशालिनी महाराष्ट्र माऊली ।**
**युगायुगांची जीवनगंगा उठे तुझ्या पाऊली ॥**

दुसऱ्या एका महाराष्ट्र गौरवपर कवितेत महाराष्ट्र भूमीला, संजीवनी, परिसाची उपमा देतांना कुसूमाग्रज म्हणतात.

**माझ्या मराठी मातीचा लावा ललाटासी टिळा**
**तिच्या संगे जागतील मायदेशातील शिळा**

महाराष्ट्राची स्थापना झाल्यानंतर मराठीला राजभाषेचा दर्जा मिळाला. राजभाषा झालेल्या माय मराठीचा गौरव करतांना सदाशिव अनंत शुक्ल म्हणतात.

**सिंहासनी बैसली मराठी, आली दरबारा**
**अलय मराठी दुनियेचा, तिज मानाचा मुजरा**

मराठी माणसात मराठी भाषा, मराठी अस्मिता फार कमी प्रमाणात राहिलेली आहे. मराठी भाषा बोलणारे सर्व मराठी बांधव आज विविध भेदांमुळे एकमेकांपासून दूर गेलेले आहे. एकमेकांना एकमेकांचा



Scanned with CamScanner

उत्कर्ष सहन होत नाही. मात्र, यात कुठेतरी बदल व्हावा असा आशय सांगणारी मायबोली मराठीचा उचित शब्दात गौरव सांगणारी कविता लिहितांना सुरेश भट लिहितात.

**लाभले आम्हास भाग्य, बोलतो मराठी ।**
**जाहलो खरेच धन्य, ऐकतो मराठी ॥**
**धर्म, पंथ, जात एक जाणतो मराठी ।**
**एवढ्या जगात माय मानतो मराठी ॥**

शिवाजी महाराजांनी महाराष्ट्राची अस्मिता, जागृत केल्यानंतर महाराष्ट्र धर्माची पताका फडकू लागली. आजतागायत महाराष्ट्राने अनेक चढ-उतार पाहिले. अनेक अस्मानी, सुलतानी संकटांवर मात करुन आपली प्रगती साधून विकासाची परिसीमा गाठली. शेवटी एवढेच म्हणेन.

**हिंद मनाचे दैवत झाले शिवशंभु माऊली**
**माता धन्य जिजाऊ झाली. शिवबाची साऊली**
**केला महाराष्ट्र साकार, आई थोर तुझे उपकार**
**केला महाराष्ट्र साकार, दिला आम्हा तू आधार.**

(संकलित)

## मैत्री

मी रुसावे, अन् तू मला हसवावे...
तू रुसावे, अन् मी तुला हसवावे...
असेच नाते आपुले, कायम असावे...
मैत्री माझी पुसू नकोस,
कधीच माझ्याशी रुसू नकोस,
मला कधी विसरु नकोस...
मी दूर असून सोबत आहे,
माझ्या मैत्रीची
जागा कोणाला देऊ नकोस...

**- कतवारे निलम रामदास,** द्वितीय वर्ष (बी.कॉम)



## छत्रपती शिवाजी महाराजांचा पोवाडा

कुळवाणी - भूषण पवाडा गातो भोसल्यांचा
छत्रपती शिवाजीचा ॥ धृ॥
लंगोट्यांस देई जानवी पोषिंदा कुणब्याचा ।
काल तो असे यवनांचा ॥
शिवाजीचा पिता शहाजी पुत्र मालोजींचा ।
असे तो डौल जहागिरीचा ॥
पंधराशे एकूण पन्नास साल साल फळले ।
जुन्नर ते उदयासी आले ॥
शिवनेरी किल्ल्यामध्ये बाळ शिवाजी जन्मले ।
जिजाबाईस रत्न सापडले ॥
हाता पायांची नखे, बोटं शुभ्र प्याजी रंगीले ।
ज्यांनी कमला लाजिवले ॥
वरखाली टिऱ्या पोटऱ्या गाठी गोळे बांधले ।
छदादिकारी भासले ॥

**- कु. शेळके सोनाली संपत,**
तृतीय वर्ष (बी.ए.) (मराठी)

# साल्हेर
# उत्तुंग आणि वज्रनिर्धारी

प्रा. ज्ञानेश्वर भगुरे



'साल्हेरचा कब्जा घेतल्याबिगर हा सूर्याजी काकडे आपणास तोंड दाखवणार नाही महाराज !' असे म्हणत राजीयास मुजरा करुन मोहिमेवर निघालेला वीर मावळा सूर्याजी काकडे यांची अजरामर आठवण करुन देणारा हा किल्ला – साल्हेर !

साल्हेर–मुल्हेर या जोडीतला हा साळेरचा किल्ला सह्याद्री पर्वतरांगेतील सर्वात उंच किल्ला आहे. हा किल्ला नाशिक जिल्ह्यातील आहे. नाशिक जिल्ह्यात लहान मोठे असे ६७ गिरीदुर्ग आहेत. महाराष्ट्रातील सर्वात उंच असा साल्हेरच्या किल्ल्याचा बहुमान आहे. नाशिक जिल्ह्यच्या उत्तरेकडील भागामध्ये बागलाण नावाचा प्रांत आहे. तो सध्या सटाणा तालुक्यात गणला जातो. नाशिक जिल्ह्यातील सर्वात जास्त किल्ले सटाणा तालुक्यातच आहे. किल्ल्याची उंची १५६७ मीटर असून या गिरीदुर्गाची चढण मध्यम आहे. या किल्ल्याच्या पायथ्यालगत वाघांचे साळेबांदी ही गावे असून हा किल्ला सेलबारी–डोलबारी या डोंगर रांगेचा भाग आहे. सध्या हा किल्ला सुस्थितीत असून याच्या मुळ संस्थापका संदर्भात खात्रीशीर माहिती उपलब्ध होत नाही. साल्हेरचे युध्द – इ. स १६७१–७२ मध्ये शिवाजी महाराजांनी साळेरचा हा गिरीदुर्ग जिंकून स्वराज्यात सामील केला. तो पुन्हा हस्तगत करण्यासाठी मुघल फौजा चाल करुन आल्या आणि त्यांनी साल्हेरच्या दुर्गाला वेढा घातला. तो फोडण्यासाठी शिवाजी महाराजांनी मोरोपंत पिंगळे आणि प्रतापराव गुजर यांना पाठविले. यावेळी इख्लाखान हा मुघर सेनेचा अधिपती होता. मुघल फौज लाखाच्या आसपास होती. मुघल, पठाण, राजपूत, तोफा, हत्ती, उंट, गराडा घालून युध्द झाले. जय स्वराज्याचा झाला. जिवंत सापडले ते ६००० घोडे राजाकडे गणतीस आले. सव्वाशे हत्ती सापडले. मालमत्ता, खजिना, जडजवाहीर, कापड, बिछायत अगनित हातास लागले. २३ वजीर नामांकित धरुन खासा इसलाखानाचा पराभव झाला. या युध्दात वरश्री अंगी लेवून लढलेले शिवाजी महाराचांजे एक सहकारी पुरंदर तालुक्यातील पांगरे गावाचे शिलेदार सुर्याजी काकडे शत्रूच्या तोफेचा गोळा लागून पडले. 'माझा सूर्याजीराव पडिला, तो जसा भारतीचा कर्ण !' ऐसे शिवबा उद्गरले.

साल्हेरच्या युध्दाचा मोगलांच्या मनावर फार मोठा परिणाम झाला. हिंदवी स्वराज्याने मोघलास दिलेला हा मोठाच दणका होता. तिथून पुढे ते शिवाजी महाराज अजिंक्य आहेत असे ते मानू लागले.


साल्हेरवाडीतून गडावर जाण्यासाठी रस्त आहे. हा रस्ता साल्हेरच्या नैऋत्येकडून गडाच्या पश्चिमेकडील माचीवर पोहचतो. तेथे उत्तराभिमुख दरवाजा असून ही माची भक्कम तटबंदी घालून बंदिस्त केलेली आहे. माची मधून पायवाटेने उत्तरेकडे चालत निघाल्यावर गडाच्या माथ्यावर जाणारी पायवाट लागते. ही वाट चार दरवाजे ओलांडून गेल्यावर आपण गडावर पोहचतो. वीर सूर्याजी काकडेच्या पराक्रमाची साक्ष देणारा साल्हेर अवश्य अनुभवावा असाच आहे. उत्तुंग आणि वज्रनिर्धारी ! (संकलित)



Scanned with CamScanner

# चांदवडचा प्रसिध्द रंगमहाल

कु. भालेराव हर्षल सिताराम, तृतीय वर्ष (बी.ए.)



**होळकरवाडा (रंगमहाल) चांदवड :-**

होळकरकालीन कलेचा एक सुंदर अविष्कार म्हणजे चांदवडचा रंगमहाल. सह्याद्रीच्या पर्वतरांगेत मुंबई-आग्रा महामार्गावर वसलेल्या चांदवडला ऐतिहासिक वारसा आहे. येथेच अहिल्याबाई होळकर यांनी रंगमहाल बांधला. चांदवडनगर यादव वंशातील पन्नार राज्याच्या काळात इ. स. १० व्या शतकात वसले असून ही नगरी चंद्रहास राज्याची राजधानी असल्याचा उल्लेख आढळतो. नंतरच्या पेशवाईच्या काळात होळकर घराण्याचा सुभा म्हणून चांदवडचा लौकिक वाढला. याच काळात अहिल्याबाईनी रंगमहाल उभारला. येथील लाकडी कोरीव काम आजही लक्ष वेधून घेते. पूर्वी हा महाल होळकर वाडा म्हणून ओळखला जात असे, परंतु येथील दरबारामध्ये असणाऱ्या रंगीत चित्रांमुळे या वाड्याला रंगमहाल नाव पडले असे सांगण्यात येते.

हा वाडा बघतांना तत्कालिन वैभवाच्या खुणा दृष्टीस पडतात. परंतु त्याचे योग्य प्रकारे जनत होत नसल्याने पर्यटकांबरोबरच चांदवडकरांमधून नाराजीचा सूर उमटत आहे. या महालाच्या मुख्य प्रवेश द्वारातून आत गेल्यावर सुरुवातीलाच मोठा भूभाग लागतो. थोड्या अंतरावरच वाड्याच्या मुख्य इमारतीस सरुवात होते. दर्शनी बाजूच्या दोन्हींकडून दोन जिने आहेत. ते दुसऱ्या मजल्यावरील दरबार सभागृहात जातात. या भव्य सभागृहात अनेक निसर्गचित्रे, पशु-पक्षी, तत्कालिन महिला व पुरुष, त्यांची वेशभूषा अशी चित्रे आहेत. इतिहासकाळात न्यायदान व आस्थापनासाठी याच सभागृहाचा उपयागे केला जात असे. चांदवड जैन साहित्यात चंददिव्यपुरी तर यादवांच्या काळातल चांदोर अशी निरनिराळ्या काळातील, आत्ताच्या काळातील नावे सापडतात. गिर्यारोहक मंडळीचा चांदवडच्या प्रदेशात नेहमीच चक्कर असतो. कारण या भागाच्या सातमाळा पर्वत रांगेतले तालेबार, गडकिल्ले नेहमीच त्यांना खुणावत असतात. घाटात असणाऱ्या रेणुका देवीच्या दर्शनाला बऱ्याचदा जाणे होते. पण चांदवड गावात जावून तिथले ऐतिहासिक वास्तू पाहणे राहूनच गेलेले असते.

चांदवडला कसे जायचे हे काही वेगळे सांगायला नको. काळाच्या ओघात काही जुने वाडे, वेशी आणि तटबंदी पडून गाव विस्तारलेले असले तरी आज २ ते ३ वेशी आपल्याला बघायला मिळतात. चांदवड गाव पुर्वी सात वेशींमध्ये बांधलेले होते. दिल्ली दरवाजा, धोडंबे (धोडप) दरवाजा, बाजार वेस, जुनी सरकारी वेस, आनकाई वेश, ढोलकीची वेस, गुजरात गल्ली वेस अशा वेशींपैकी काही आज पहावयास मिळतात. तर काहींना वाढत्या गावाने फोडून टाकल्या आहेत. एस.टी. स्टॅण्डकडून गावात जाताना आठवडे बाजार वेस आपले स्वागत करते. या वेशीवर जरी हल्ली फ्लेक्स बोर्ड झळकत असले तरी मुख्य दरवाज्यांच्या दोन्ही बाजूंना पूर्वीचे शिला लेख आढळतात. एक मराठीतल्या तर दुसरा फारशी भाषेत कोरलेला आहे. मराठीतल्या शिलालेख थोडे बारकाईने बघितले तर वाचता येतो. इथूनच चांदवड आपल्याला त्याच्या प्राचीन तत्वाची



Scanned with CamScanner

प्रचिती देतो. गावात काही प्रसिध्द आणि शिल्पकलेचे अद्वितीय नमुने असले तरी साकळी वाडा, तरटेवाडा, गोखले वाडा, वैद्य वाडा असे जुने वाडे होते असे म्हणावे लागते. कारण तेही पोखरुन नेस्तनाबूत झाले आहेत. या सर्वात आजही आपले अनोखे सौंदर्य घेऊन उभा आहे, तो म्हणजे रंगमहाल. गावातल्या कोणालाही विचारले रंगमहाल कुणीकडे तर तो लगेच बोट करुन रस्ता दाखवतो. आजुबाजूला दोन भव्य बुरुज, तटबंदी आणि मध्यभागी उंच असे दगडी प्रवेशद्वार. रंगमहाल इतका मोठा की, अगदी जवळ जवळ पुण्याच्या शनिवारवाड्या इतका मोठा असेल याची आपल्याला कल्पनाही नसते. उत्तरेकडे तोंड असलेल्या प्रवेशद्वाराची कोरीव कमान, छोट्या खिडक्या, पहारेकऱ्यांच्या खोल्या आणि वर अंबारीसारखी घुमट असलेली तटबंदी असा रंगमहालाचा रुबाबदार थाट दिसतो. प्रवेशद्वाराचा लाकडी दरवाजा आजही शाबूत असून तोही वैशिष्ट्यपूर्ण पद्धतीने घडविलेला दिसतो. परकीय आक्रमण झाल्यास दरवाजा हत्तीच्या धडकेने तोडला जाऊ नये म्हणून त्यावर लांब व टोकदार असे लोखंडी खिळे बसविलेले दिसतात. दरवाज्याच्या भव्यतेवरुन दरवाजाच्या आतल्या रंगमहालाचा पसारा किती असावा याचा अंदाज येतो. आत प्रवेशताच समोर मुख्य महाल नजरेस पडतो. इथे बऱ्यापैकी लोकांची वर्दळ दिसून येते. ही वर्दळ रंगमहाल बघण्यासाठी नाही तर यात चालणाऱ्या पोस्ट ऑफीस, ग्रामीण कार्यालय व कोर्ट कचेरीच्या कामासाठी आलेल्यांची असते. रंगमहालासारख्या वास्तूंचा वापर सरकारच्या सार्वजनिक कामासाठी होतोय हे बघून कलेचा पुरातन वारसा जतन व्हावा अशी प्रामाणिक इच्छा असणाऱ्या कलाकाराला निश्चितच दुःख होते. पण तरीही आज इतक्या सुस्थितीत असलेला महाल बघून आनंदही होतो. मुख्य इमारतीत आत गेल्यावर लाकडाचे भव्य खांब, त्यावरील नक्षीकाम, गोलाकार कमानी, बारीक कलाकुसरीची वेलबुट्टी, लाकडाला कोरुन केलेल्या जाळीच्या भिंती असे सौंदर्य नजरेत भरते.

आपण महालाच्या मध्यभागी असलेल्या मोकळ्या चौकात येऊन पोहोचल्यावर सभोवती नजर फिरविल्यास लाकडावर किती किती बारीक आणि देखणे नक्षीकाम होऊ शकते याचा प्रत्यय येतो. खुल्या चौकाच्या चारही बाजूंना वेगवेगळी दालने. त्या दालनांचे लाकडी खांब आणि त्या खांबांवरील शिल्प आडव्या तुळईवरच्या बारीक वेलबुट्टी आणि असे कोरीव लाकडी खांबाचे एकावर एक तीन मजले असा हा भव्य दिव्य सेट उभारलेला आहे.

या काष्ठ शिल्पात आपल्याला अनेक वेगवेगळी फुले, पोपट, मोर इत्यादी पक्षी तसेच हत्ती, सिंह, वानर अशा अनेक प्राण्यांच्या कलात्मक प्रतिमा कोरलेल्या दिसतात. रंगमहालाच्या भिंती जुन्या विटांच्या आणि दगडी बनावटीच्या भक्कम अशा बनविलेल्या आहेत. संपूर्ण बांधकाम चुन्यात केलेले आहे. या मध्यभागाच्या चौकात आपण या सर्व कलात्मकतेत हरवूनच जातो. येथे दर्शनी भागातल्या एका दालनात होळकरांची राजगादी ठेवलेली असून होळकर वंशीयांचे जुने फोटोही लावलेले आहेत. हल्लीच इथे अहिल्यादेवींची छोटी मूर्ती बसवून त्यासमोर कारंजा बसवून सुशोभिकरण केलेले आहे. (संकलित)

## चारोळी

जगा इतके की, आयुष्य कमी पडेल<br>
हसा इतके की, आनंद कमी पडेल<br>
काही मिळाले तर नशीबाचा खेळ आहे<br>
पण प्रयत्न इतके करा की,<br>
परमेश्वराला द्यावेच लागले.

**– कतवारे निलम रामदास,** द्वितीय वर्ष (बी.कॉम)



Scanned with CamScanner



# वेशीवरच्या पाऊलखुणा

कु. सातभाई भारती अशोक, द्वितीय वर्ष (बी.कॉम.)

अनेक लोक विविध प्रकारची माहिती मिळवतात व ती आत्मसात करतात, परंतु आपल्याच गावाबद्दल , आपल्या गावाच्या वेशीबद्दल असणारी पार्श्वभूमी जाणून घेण्यास कोणीही प्रयत्न करत नाही. म्हणूनच मी आपल्या गावाबद्दलची असणारी पार्श्वभूमी, इतिहास मिळविण्याचा व तो कंठस्थानी न ठेवता तो शब्द रुपात मांडून लोकांपर्यंत पोहचवण्याचा हा एक छोटासा प्रयत्न.

शेकडो वर्षांचा इतिहास अंगाखांद्यावर घेऊन मिरविणारे वडनेर भैवर हे गाव आपल्या वेगळेपणाबद्दल अजूनही अज्ञात आहे. मुख्य बाजारपेठ व त्याकाळी जिल्ह्याचे स्थान असलेले ऐतिहासिक वडनेर प्राचीन ताम्रपटातून उलगडते. भैरवनाथाचे मंदिर अन् रथयात्रेच्या परंपरेमुळे प्राचीन वडनेर भैरवमय झाल्याचे अनुभवायला मिळते.

नाशिक-चांदवड रस्त्यावर शिरवाडे फाटा लागतो. तेथून वडनेर भैरव ४ किलोमीटर आहे. फाट्यावरुन डाव्या हाताने वडनेर भैरवकडे निघाल्यावर लगेचच पालखेडचा कालवा लागतो. तो ओलांडतांना डाव्या हाताच्या वडाच्या झाडाखालील एक अनोखी वीरगळ आपल्या स्वागताला सज्ज असलेली दिसते. वीरगळीला न्याहाळतांना आपली पावले एका ऐतिहासिक गावाकडे झेपावताहेत असे वाटायला लागते अन् मनात कुतूहल निर्माण होते ते नेत्रावती नदीच्या कुशीत वसलेल्या गावाचे वडनेर भैरव असे नाव कसे पडले असेल याचे. पूर्वी वडनेर व भैरव ही दोन्ही वेगळी गावे होती. वडनेर म्हणजे वड नेहार म्हणजेच वडांच्या झाडाचा समुह अथवा धापी अन् नेहर म्हणजे नदी नदीच्या लगत असलेल्या वडांच्या झाडांचा समुह ते वडनेर तसेच वटक ऋषी नावाच्या ऋषींनी हे नगर वसवल्याचा पुराणामध्ये उल्लेख मिळतो.

म्हणूनच गावाला वडनेर म्हटले गेले असावे असे ग्रामस्थ सांगतात. भैरव गावाला भैरवनाथाच्या मंदिरामुळे भैरव नाव पडले असावे. वडनेर भैरव ही दोन्ही गावे केव्हा एकत्र आली हे सांगणारी पिढी अथवा नोंद उपलब्ध नाही. मात्र वडनेर व भैरव ही दोन गावे वेगळी होती हे निश्चित करण्यासाठी दोन्ही गावांच्या दोन वेशी, दोन मारुती मंदिरे, दोन तालमी पुरेशा ठरतात. वडनेर भैरव ही गावे एक होण्याबद्दल शिंदे व होळकर घराण्यांमधील एक व्यवहाराची नोंद महत्त्वाची ठरते.

वडनेरला भैरवचे वैभव लाभल्याने वडनेर हे गाव वडनेर भैरव म्हणून ओळखले जावू लागले. भैरवनाथाच्या १२५० पासून ४४१ बिघा जमीन मिळाल्याचा उल्लेख गुरवांकडील एक दस्तात मिळतो. अशी माहिती चंद्रकांत भंडारे यांनी दिली. गावात प्रवेश करतांना मल्लासारखी दिसणारी आग्या वेताळाची मूर्ती आपले स्वागत करते. हे गाव मल्लांसाठीही प्रसिध्द असल्याचे जणू वेताळ देव सांगायला लागतो मंदिरासमोर रस्त्यापलिकडे वर्तुळाकार दगड आहे. हे भैरव मंदिराच्या दीपमाळेचे दगड आपल्याला गावाच्या इतिहासात डोकावायला लावतात.

वडनेर भैरव प्रवास येथेच संपत नाही. तर हा प्रवास आपल्याला येथून १४०० वर्ष मागे मूळच्या



Scanned with CamScanner

प्राचीन वडनेरपर्यंत घेऊन जातो. वडनेरचा उल्लेख आतापर्यंत तृतीय गोविंद राजांचा शके ७३० मधील वणी ताम्रपटात मिळतो. हा ताम्रपट दिंडोरी येथे सापडला असून तो सध्या बॉम्बे ऑफ रॉयल एशियाटीक सोसायटीत आहे. हा ताम्रपट चतुर्वेदी दामोधर भट्ट याला नाशिक देशातील वटनगर म्हणजे वडनेर भैरव दान दिले असे नमूद केलेले आहे.

हा ताम्रपट वत्सराजपूत अरुणादित्य याने लिहिला व या ताम्रपटामधील वडनेरच्या उल्लेखावरुन वडनेर मुख्य बाजारपेठ असल्याचे निर्देश करते. यातील एक ताम्रपट गावातील एका व्यक्तीकडे आहे. मात्र तो दाखविला जाता नसल्याने वडनेर भैरवच्या इतिहासाचे अनेक पैलू अजूनही अज्ञात आहेत.

मारुती मंदिरातील दगडावरील शिलालेख ग्रामस्थांनी न जपल्याने त्यावर नोंदविलेला इतिहास गमवला आहे. हा शिलालेख कुठे आहे. हे कोणालाही माहिती नाही. गावाबद्दलच्या अशा पाऊलखुणा समजल्या जाण्याची गरज आहे.

बाराबलुतेदारांचे वडनेर भैरव गाव आजही गावगाड्याची रचना पेठांच्या माध्यमातून दाखविते. मुख्य बाजारपेठ रस्त्याला बाराही बलुतेदारांची दुकाने असल्याचे आजही पहायला मिलतात. ही पेठ पाहतांना व्यापाऱ्यांच्या लाकडी नक्षीकामातील माड्या पाहतांना नवल वाटते. त्यामुळे वडनेर भैरवच्या या पेठेला गुलजार पेठ म्हणतात. दोन्ही गावच्या वेशी आज नाही. मात्र बाजारपेठ गल्लीने गावाचे वैभव आजही टिकवून ठेवल्याचे दिसते. औरंगजेबाच्या काळात हानी झाल्याने हे गाव पाडण्याचे आदेश दिले. मात्र तेव्हा चार मुस्लिम सरदारांनी मंदिराचा कळस पाडण्याचा प्रयत्न केला. मात्र हे सरदार कळसावरुन खाली पडून मरण पावले. त्यांच्या चार दगडी शिळा आज मंदिराभोवती आहे. औरंगजेबाने हे करु नये म्हणून तिडके पुढे आले तेव्हा त्याने तिडक्यांना मुस्लिम धर्म स्वीकारुन पटेल असे नाव देण्यात आले. तेव्हा भैरवनाथाच्या पालखी सोहळ्यात पटेलांना महत्त्वाचे स्थान आहे.

पोळ्याच्या दिवशी वडनेरच्या वेशीतून भालेरावांचे व भैरवच्या वेशीतून तिडके यांचे मानाचे बैल वाजत गाजत प्रवेश करतात. गावातील प्रत्येक समाजाला मानपान दिला जातो. अशी माहिती अरुण तारकुंडे व सोपान वक्टे देतात. भैरवनाथाचे मंदिर सुंदर सभामंडप आवजूर्न पाहण्यासारखा आहे. मंदिराचा मुळ मंदिर गाभारा दगडी आहे. त्यात भैरवनाथ, जोगेश्वरी राळ्याच्या लुकनने बनवलेला मुखवटा आहे.

जोगेश्वरी शेजारी तिची पाठराखण पुतळाबाईची मूर्ती आहे. मंदिराच्या उजव्या हाताच्या दरवाजातून आत गेल्यावर भैरवनाथाच्या रथाचे अवशेष ठेवलेले आहेत. चैत्रेला उत्सवासाठी हे अवशेष जोडून रथ बनविला जातो. तेथून पुढे माहुराची रेणुका मातेचा तांदळा आहे. त्याशेजारी भैरवाची व शंकर पार्वतीची दगडी मूर्ती आहे. भैरवनाथाचा उत्सव हे गावाचे मुख्य आकर्षण असते. या उत्सवात रथयात्रा चोवीस तास अविश्रांत चालते. रथात भैरवनाथाची मूर्ती ठेवण्यापासून प्रत्येक चौकात पूजेच्या मानपानाचे त्या त्या समाजाचे मानपान आधीपासूनच ठरवलेले आहे. त्यानुसार भैरवनाथाची मिरवणूक गावातून डोंगराकडेच्या कोकणटेंभी वस्तीजवळच्या जानुस घरात (जानोसा) येथे भैरवच्या लग्नासाठी जाते.

भैरवचा जोगेश्वरीशी विवाह लावला जातो व पुन्हा मिरवणूक मंदिराच्या दिशेने गावातून काढली जाते. मात्र यामध्ये एक गोष्ट अडवून उभी राहते ती म्हणजे दोन भैरवामध्ये भांडण होते. या भांडणामध्ये लग्नमंडपाच्या बाजूलाच एक तलाव आहे. त्या तलावामध्ये एक भैरव दुसऱ्या भैरवाला त्यात ढकलतो व पाण्यातील हा भैरव लोकांना बाहेर काढण्याचे



Scanned with CamScanner

आव्हान करतो व तो सांगतो की, तुम्ही मला बाहेर काढले तर तुमचे गाव मी सोन्याचे करेल व पहिला भैरव सांगतो तुम्ही याला बाहेर काढले तर तुमचे गाव भस्म करेन. त्यामुळे भीतीपोटी लोक त्यास बाहेर काढत नाही. तेव्हापासून भैरवनाथाच्या व वडनेर भैरव गावाच्या यात्रेच्या वेळी त्या ठिकाणातून पाण्याचा खळखळाट ऐकू येतो. कालांतराने ते नाहीसे झाले व आता सध्या तो एक इतिहास जमा झालेला घटक असावा असे वाटते. कारण त्या ठिकाणाहून पाण्याचा खळखळाट ऐकू येत नाही.

भैरवाचा विवाह जोगेश्वरीशी लावला जातो व पुन्हा मिरवणूक मंदिराच्या दिशेने गावातून काढली जाते. यावेळी महिला मिरवणुकीसमोर दंडवत घालतात, तर पुरुष मंडळी मिरवणुकीसमोर लोटांगण घालतात. हा सोहळा अनुभवण्यासारखा आहे. गावात मारुती मंदिर, ईदगाह व जामा मशीद आहे. भैरवनाथ मंदिरामागे गोसावी समाजाच्या समाधी असून त्या पाहण्यासारख्या आहे. बाबुराव गोसावी यांनी त्याला चांगल्या पध्दतीने सांभाळल्या आहेत. गावात दहा–बारा मठ आहे, गणपती मंदिर आहे व या मठामध्ये नागासाधूचे मठ सर्वाधिक होते. मात्र आज फक्त एकच पुरी मठ गावात अहे. संत जिवनेश्वर काळू बाबा हे वडनेरचेच. त्यांची समाधी आणि मंदिर वडनेर–शिरवाडे रस्त्यावर आहे.

सोनार अन् ब्राम्हणासाठी ओळखले जाणारे वडनेर भैरव हे गाव पूर्वी नागवेलीच्या पानमळ्यांसाठी प्रसिध्द होते. आता हे गाव द्राक्षांसाठी प्रसिध्द आहे. काळानुसार गावाची ओळख बदलली असली तरी गावचा प्राचीन इतिहास आपली ओळख ठळक व्हावी यासाठी आसुसलेला पहायला मिळतो. प्राचीन वास्तू, ताम्रपट, वीरगळ व शिलालेखांच्या माध्यमातून गावभर विखुरलेल्या पाऊलखुणा जपण्याची गरज आहे. (संकलित)

## मैत्रीच्या अंगणात....

जरी फाटकी होती जिंदगी
तरी दोघांचाच मायेचा आधार
दारिद्र्याचा अंधार पितांना
प्रेम शब्दांतच मिळे खुशी
पण मन कधीच रडले नाही...

बोर्डिंग जिणं जगतांना
ताटात पडे शिळी भाकरी
घास तिचा चावतांना
हसता–हसताच गोड होई
पण मन कधीच रडले नाही...

उधानलेल्या तुफानागत
होते निर्धर वय ते
जगण्याच्या रेषा ओढतांना
झाल्या चुका किती किती
पण मन कधीच रडले नाही...

कधी आजारी, व्यथा, वेदना
दूर एकाकी सहन करीत
इवल्या हाताने सेवा करतांना
तेच वेदनेला औषध होई
पण मन कधीच रडले नाही...

निराधार जीवन क्षितीज
तरी मैत्रीचा अमृत श्वास
भवितव्याचे वर्तुळ काढतांना
अंधार होता किती भोवती
पण मन कधीच रडले नाही...



– **गांगुर्डे मोहिनी मोतीराम**, तृतीय वर्ष (बी.ए.)



Scanned with CamScanner




# मुलीने वडीलांशी केलेली हितगुज...

कु. सातभाई भारती अशोक, द्वितीय वर्ष (बी.कॉम.)

बाबा आज मला तुम्हाला काहीतरी सांगायचय तुमच्या कानात कुजबुजायचय. बाबा.... मी आईच्या पोटात असतांना सोनोग्राफीद्वारे मुलगा की मुलगी निदान केलं मात्र हे सरकारच्या आणि कायद्याच्या विरुध्द आहे ना. मी तर आईच्या पोटात एक गर्भाचा गोळाच होते. पण ते तुम्हाला डॉक्टरांकडून कळाले की, तुम्हाला मुलगा होणार नसून घरात मुलगी जन्माला येणार हे कळताच तुम्ही डॉक्टरांना माझा गर्भ पाडण्यासाठी सांगितला.

बाबा... एक सांगू तुम्ही काळजावर दगड ठेवून निर्णय खरा घेतला. मात्र आईचे काय ? तुमचे काळीज दगडाचे मग आई काय ? बाबा, आईच्या मनाचे काय, तिने किती स्वप्न रंगवली असेल. बाबा याही पलिकडे जावून तुम्ही स्वत:च्या हाताने माझा (मुलीचा) गर्भ तुम्ही भर कचऱ्यात फेकला. फेकतांना आईचा विचार सुध्दा नाही आला का बाबा सांगा ना....

माणसाला आयुष्यात सगळे काही मिळते मात्र शिक्षणाची वेळ चुकलेली असते. आज आयुष्याच्या मागे वळून बघावे तर म्हणतात ना... निसर्गाचे नियम कोणीच मोडू शकत नाही. तसेच माझ्या बाबतीत घडले मी मुलगी म्हणून जन्माला आले आणि कोणालाही तोंड दाखवायच्या लायकीची राहिली नाही. पण बाबा... मी काय केले हे माझ्या हातात कुठे होते की, जगात मुलगी म्हणून जन्माला न येता गर्भाच्या गोळ्याला मुलगा म्हणूनच जन्माला आले पाहिजे.

बाबा..आहो... मुलगा म्हणजे वंशाचा दिवा, मग सांगा आजपर्यंत या दिव्यांनी किती दिवे लावलेत. मुलगी म्हणजे वंशाची पणती, बाबा दिवा केवळ घरापुरता जळतो. मात्र पणती दिव्यापेक्षाही जास्त तापते व घरापुरता प्रकाश न देता घराबाहेर अंगणातही फुलते. तुम्ही मला कचऱ्यात फेकलत खरे. मी आनंदाने स्विकारेलही, पण दादाला राखी कोण बांधले, भाऊबीजेला दादाला कोण ओवाळेल, दादा ताई अशी हाक कोणाला मारेल, ताईसाठी भाऊबीजेला आणलेली भेटवस्तू कोणाला देईल सांगा ना.. आहे का उत्तर तुमच्याकडे... ?

मुलगी म्हणून जन्माला आले तर माझ्याच वडीलाच्या चेहऱ्यावर प्रश्नचिन्ह. बाबा मला सांगा मुलगी म्हणून जन्माला येणे काही पाप असते का ? हे बाहेरचे जग मलाही न्याहाळायच होतं... या निसर्गाच्या सान्निध्यात राहून निसर्गाशी अलगद मैत्री करायची होती.

आईच्या काळाजाला होणाऱ्या या वेदना माझ्या तुमच्या बाबतीत असलेली ही आसुया या दोन गोष्टीच्या पलिकडे जावून बाबा तुम्हाला काहीच का वाटलं नाही. इतके कसे तुम्ही दगडाचे झालात बाबा... का तुम्ही मनावर दगड ठेवलाय... का म्हणून तुमच्या मनात मुलीबद्दल प्रेम नाही... आई देखील एक मुलगी, मग तरीसुध्दा तुम्हाला मी नकोशी....

बाबा... आईला एक दिवस म्हणालात. जेव्हा मी आईच्या पोटात होते की, पहिल्या महिला डॉक्टर आनंदीबाई जोशी, अंतराळात झेप घेणारी कल्पना चावला, पहिल्या महिला राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील,

आय.पी.एस. किरण बेदी या देखील महिलाच. तरी सुध्दा तुम्ही मला कचऱ्यात फेकलतं. बाबा...एक सांगू तुम्ही मला सोडून निघून जाणार मला इथून कोणीही उचलणार नाही. कारण हा गर्भाचा गोळा काय कामाचा. त्यामुळे मला स्वत:लाच हिम्मत करुन या कुत्र्याच्या स्वाधीन व्हाव लागणार.

बाबा.... मी गर्भाचा गोळा आहे म्हणनू काय झालं. गर्भाच्या गोळ्याला काळीज तर आहे. हेच काळीज तुमच्या सोबत बोलतय बाबा, आणि हे काळीज एका मुलीच आहे हे विसरु नका... मी तुमच्या सारखी नाही बाबा. मी गप्प बसेन. काहीच बोलणार नाही. कारण मी एक मुलगी आहे ना ? मुलीच्या जातीने वर मान करुन बोलू नये. पुरुषाच्या डोळ्यात डोळे घालून बोलू नये असे नियम लावणारा हा मानवी पुरुषी देहच आहे बाबा.. मात्र एक नेहमी लक्षात ठेवा.

तो देव पाहतोय बाबा तुम्ही केलेले हे पाप. ना स्वर्गात ना नरकात धुतली जाणार, ना फेडली जाणार, कुठे फेडाल ही पाप. मी काय तो देव सुध्दा तुम्हाला माफ करणार नाही.

मुलगी म्हणजे वंशाची पणती, मुलगी म्हणजे घरातील लक्ष्मी, मुलगी म्हणजे दुधावरची साय असे म्हणणारा आपलाच समाज जेव्हा त्याच्यावर ही वेळ आली की, तो देखील आपली बाजी पलटवतोच.

बाबा.... हे निसर्गरम्य वातावरण, पाने, फुले हा मोहक फुलांचा सुगंध, चांदण्याची रात्र, पक्ष्यांचा किलबिलाट, फुलपाखरांची हवेतील भरारी सगळ्या गाष्टी माझ्यासाठी अनुभवायला राहून गेल्या. कारण मी एक मुलगी आहे. माझी जागा तर कुत्र्याचे भक्ष्यच आहे. बाबा... तुम्हाला एका मुलाने जेवढे प्रेम दिले असते. त्यापेक्षा काहीपटीने मी तुम्हाला दिले असते.

जाता जाता एकच सांगते तुम्ही मला परत नेणार नाही आणि नाही मला अनाथ म्हणून कोणी उचलून नेणार. हे माल माहित आहे. पण बाबा हे पाप कुठे फेडाल हो.... फेकलेल्या गर्भाच्या गोळातील काळजातून जे शब्दरुप भाव प्रकट केले त्याचा तुमच्यावर काय परिणाम होणार. काळीज आता बंद होतय. मी आता मरणार, माझं आयुष्य केवळ दोन मिनिटांचे होत ना. बाबा आणि त्यानंतर राहिलेल्या देहरुपी गर्भगोळा कुत्र्याच्या हवाली होणार. बाबा.. जाते मी अहं... आईच्या पोटात असतांना बरेच काही गोष्टी शिकत होती. आई म्हणायची की, जाते मी न बोलता केव्हाही येते मी म्हणावं. आईकडून खूप काही शिकले पण वरंच काही शिकायचं राहून गेलय. बाबा... तुमच्या सोबत खेळायच राहून गेलं. तुम्हाला गच मिठी मारायची राहून गेली.(संकलित)

## चारोळ्या

एकदा वाटलं तुला स्पष्टच सांगावं
मग वाटलं कागदावर लिहावं...
नंतर म्हटलं जाऊ दे
तुझं तुला कळतंय का ते पहावं...

मैत्रीला रंग नाही
तरीही मी रंगीत आहे
मैत्रीला चेहरा नाही
तरीही ती सुंदर आहे
मैत्रीला घर नाही म्हणूनच
ती माझ्या अन् तुझ्या
हृदयात आहे...!!

-----------

मी कमी बोलतो म्हणून
शब्द कागदावर उतरतात...
बोलायलो गेलो तर वेडे
ओठातून पडतात...

– **कतवारे निलम रामदास**, द्वितीय वर्ष (बी.कॉम)



Scanned with CamScanner

# पद्य विभाग....

## नको ती गोळी



या रक्ताचे थारोळे साचवून तुला काय मिळाले ?
सांग आधुनिक मानवा, तु काय मिळवलेस ?
या माणसांच्या गर्दीत तु बसला माणुसकी हरवून
म्हणुन का या निरपराध्यांना द्यायचे उडवून....?
कुठेतरी तुझा अंतरात्मा आहे ना धगधगत,
पण सामान्यांचे प्राण घ्यायला हात का नाही थरथरत...
या धरणीमातेने केले ना सगळ्यांना सहन,
तुमच्या या उन्मत्तेपोटी तिने केले तुमचे अपहरण...
एका आईची आहोत ना आपण सारी लेकरे,
मग थांबव ना ! पाडायचे रक्ताचे थारोळे...
या प्रेतांच्या जंगलात जीव नाही का घाबरत,
कशाला ही स्मशानभूमी सगळीकडे आहे पसरवत...
आता उचल तो हात फक्त एकतेसाठी,
नको ती गोळी दुसऱ्यांना मारण्यासाठी....

– निखाडे वैष्णवी दिगंबर,
तृतीय वर्ष (बी.ए.)

## कधीतरी असेही जगून बघा

माणूस म्हणून जगताना
हा एक हिशोब करुन तर बघा
'किती जगलो' या ऐवजी 'कसे जगलो'
हा एक प्रश्न मनाला विचारुन तर बघा...
कधीतरी असेही जगून बघा
एखाद्यावर विनोद करण्याआधी
समोरच्याचा विचार करुन तर बघा...
तर कधी कोणाच्या हास्यांसाठी, समाधानासाठी
न आवडलेल्या विनोदावरही हसून तर बघा...
कधीतरी असेही जगून बघा
संकटामुळे खचून जाणारे तर हजारोंने मिळतात
कधीतरी अडचणीवर मात करण्याची
एकदा हिम्मत तर दाखवून बघा...
स्वत: पुरता विचार तर नेहमीच करतो आपण
कधीतरी बुडत्यासाठी काठीचा आधार होऊन तर बघा
कधीतरी असेही जगून बघा
वर्तमान आणि भविष्याची चिंता तर
सदाचीच असते
कधीतरी भुतकाळाच्या विश्वात गुंतून तर बघा
काळाची वाळू हातातून निसटली म्हणून काय झाले ?
आधी अनुभवलेले क्षण पुन्हा एकदा जगून तर बघा ।
कधीतरी असेही जगून बघा...
प्रतिसादाची काळजी का करावी नेहमी ?
एखाद्यावर जिवापाड, निर्मळ प्रेम करुन तर बघा !

– निखाडे वैष्णवी दिगंबर,
तृतीय वर्ष (बी.ए.)



Scanned with CamScanner



# संभाजी राजांचा पोवाडा

हिंदवी राज्य स्थापून
मोठ्या हिमतीने शूर शिवाजीनं
राज्यभिषेक समारंभ खास
केला यथाविधी रायगड किल्यास
ऐका शिवशाहीचा इतिहास... जी जी जी

कोण मानीत नाही कोणाला
देवादिकाला देश धर्माला
जुलूम जबरदस्ती अन्याय फार
अशा भूमीवर वाढता भार
देवाला घ्यावा लागतो अवतार.. जी जी जी

या न्यायाने शहाजी राजे व जिजाईची पोटी शीव अवतार माता या शिवाजी बरोबर सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यातील बाजी तानाजी येसोजी, सुर्योजी पीरंगोजी सारखे मर्द मावळे स्वातंत्र्यासाठी देहाची कुर्बानी करायास तयार झाले आणि त्यांनी

स्वराज्याचे बांधून तोरण प्रथम तोरण्याला
गड किल्ले घेवून स्वराज्याचा झेंडा फडकवला
पण आर्थिक प्रश्न महत्त्वाचा भासू लागला जी जी जी

हिम्मत ए-मर्दा तो मदद ए-खुदा
याचवेळी विजापूराहून निघालेल्या कल्याण खजिना स्वराज्याच्या कल्याणाकरिता लुटण्याचा सुयोग आला आणी या लुटीत,
शिवाजीचे वर्ण गुण किती
न्याय आणि निती सदाचार प्रिती
कल्याण खजिन्याच्या लुटीत एक महान
तरुणी लाभली रुपाची खान
पण तीच्यापुढे नमुनी मान
परस्त्रीचा या केला बहुमान
असा शिवराय चारित्र्यवान ..... जी जी जी
विजापूरचा अफसुल खान
शिवाजीला करण्या हैराण
किंवा त्याचा घ्यावया प्राण
पैजेचा विडा उचलून
आला प्रतापगडावर जाण
पण त्या अफसुल खाणाला शिवाजी राजाने
कायमचा ढासविला तिथेच कबर बांधून.. जी जी जी
मग एजीला, सिध्दी आला
विशाळगी पोचता झाला,
पोचता झाला... जी जी जी
मग दिल्लीहून तडफेन
चाळीस हजार फौज घेवून
आला मामा शाहिस्तेखान
पुण्यामध्ये कडक शिस्तीने
बैसला तळ ठोकून
पण त्याला शिवाजी राजान
अचानक रात्री गाठून
घेतली बोट कापून
जीवावरील संकट बोटावर भागवून



Scanned with CamScanner

शाहिस्ता पळला पार पुणे सोडून... जी जी जी
पुढे औरंगजेबाने आपला
राजकारणी डाव खेळलेला
मुत्सदी व धोरणी असलेला
मीर्झाराजा जयसिंग आला
शिवाजीवर पाठवून दिला
त्यान पुरंदर वेढिला
तोफांचा भडीमार केला
जोराचा हल्ला चढविला
शिवाजीनं अशा वेळेला
जाणून भविष्यकाळाला
माघारी पाय घेतला
तडजोडीने किल्ले दिले गेले अकर्मकाला
त्यामुळे मीर्झा राजा तो माणी शिवबाला... जी जी जी
शिवाजीचे नाव गाजले
चहूकडे भली सहन नाही झाली
दिल्लीपती औरंगजेब बादशहास
मीर्सा राजा जो दक्षिण मार्गात
त्याच्या मार्फत शिवाजी राजास
वाढदिवसाच्या निमित्ताने खास
हिकमतीने बोलावून शिवबास
नजरकैदेत ठेवील आग्र्यास... जी जी जी
पण शिवाजीही शेराला सव्वाशेर होता
हातोहात फसवून जाळ्यातून सिंह बाहेर पडला
दिल्ली सम्राट थक्क झाला
म्हणे ये क्या हुआ अल्ला हो... जी जी जी
दिल्लीच्या बादशहाची कायमची झोप उडवून शिवाजी
महाराष्ट्रात आल्याची बातमी पसरताच,
विजापूरच्या आदिलशाहाला
परस्पर धक्का हा बसला
जशास तसे वागण्याला
शिवाजीने विचार केला
आणि तडजोडीन त्याला
दिलेले किल्ले मोगलाला
पुन्हा फिरुन सर करण्याचा प्रारंभ केला... जी जी जी
विस वर्ष परकीय सत्तेशी सामना देवून
महाराष्ट्राचा मुलूख शिवाजीने घेतला जिंकून
स्वराज्याचे स्वप्न साकार झाले मानून.. जी जी जी
शिवाजीच्या राज्यभिषेकाला
शास्त्र निपून भारतभुला
अशा गागाभटाने अपुला
संपूर्ण पाठींबा दिला
आणि सांगितले सर्वाला
चार यवनी पातशहाला
शिवाजीने सुरुंग लावला
असा मराठा राजा आपला
छत्रपती शहाला पाहीजे महाराष्ट्राला
ऐकून विरोधकांचा विरोध विरघळला... जी जी जी
रायगडावर अष्टप्रधानांनी
वैदीक ब्राह्मणांनी वेदोक्त मंत्रांनी
अभिषेक केला. शिवाजी राजास
विजापूर इंग्रज पोर्तूगीज खास
प्रतिनिधी हजर समारंभास... जी जी जी
शिवशक सुख जाहला, राज्यभिषेकाला
आणा ध्यानाला,अशा शिवछत्रपती चरणास
मुजरा त्रिवार करुन समयास
शाहीर पीराजी गातो कवनास... जी जी जी

**- पवार संजीवनी निवृत्ती**, तृतीय वर्ष (बी.ए.)

# आई - बाबा



'आई'
एकमेव स्त्री जी माझा चेहरा
बघायच्या आधीपासून
माझ्यावर प्रेम करते....
'बाबा'
एकमेव माणूस जो
माझ्यावर स्वत:पेक्षा ही
जास्त प्रेम करतो.....
आई - वडील म्हणजे
आपले आधारस्तंभ असतात
म्हणूनच....
आई-वडील सोडून या जगात
फुकट काहीही मिळत नाही
पण आपल्याला आधार देणाऱ्या या
स्तंभांना आपण किती दु:खावतो ना ?
म्हणूनच...
या दोन फुकट मिळालेल्या गाष्टींचे
आपण मोल करत नाही...

**- कतवारे निलम रामदास,**
द्वितीय वर्ष (बी.कॉम)

# निरंतर साथ



प्रत्येकाला जीवनात एक तरी
जिवाभावाचा मित्र लाभतो

देवाने आपल्याला दिलेला
तो एक वर असतो...

अशा मित्राशी रक्ताच्या नात्यापलीकडे
अतुट अनामिक नाते जुळते

मित्राची निरंतर साथ लाभते
मित्रा समवेत हास्य विनोदाचे क्षण फुलतात

दु:ख, संकटाचे चटके हालके होतात
राग, रुसवा, अबोल्याचे प्रसंग येतात

कापसासारखे-क्षणार्धात जुळूनही जातात
अभ्यास, गप्पा टप्पा, फिरणे, करमणूक

जिथे-तिथे मित्र भागीदार असतो...
घरातल्या हर एक लहान मोठ्या कार्यात

मित्र भक्कम पाठीराखा असतो...
मैत्रीचे अंध दिखाऊ नसतात

स्थान तयाचे अंतरी असते
काळ पुढे जातो. तसा
मैत्रीची वीण घट्ट होत जाते...

**- गांगुर्डे मोहिनी मोतीराम,**
तृतीय वर्ष (बी.ए.)

## स्वाभिमान



रस्त्यावर होता उभा
पाहत चोहीकडे कसा,
अंगार कपडा फाटका,
पायात नव्हत्या चपला.
पाहून त्या वेड्या जीवाला
आली दया या हृदयाला,
सरसावली खिशातील नोट
नकळत त्याच्या समोर,
तोच हात आला पुढे
सांगण्यास मज नकार.
म्हणे नको फुकटचा पैसा
असेल तर द्या काही काम...
मेहनतीच्या कामाचे
घेईल मालक मी दाम
ऐकून ते हृदयस्पर्शी शब्द,
झाले मी क्षणभर निस्तब्ध...
कळले तेव्हा या स्वार्थी मनाला,
असतो स्वाभिमान गरीबाला

**– निखाडे वैष्णवी दिगंबर,**
तृतीय वर्ष (बी.ए.)

## व्यथा अनमोल वृक्षाची



जीवन वेचले माणसासाठी
.मी स्व:त काहीच पाहिले नाही.
निसर्गाने मला जन्म दिला
पाणी सुध्दा कुणी घातले नाही
ऊन, वारा, पाऊस खाऊन
मोठा झालो कसा तरी ॥१॥

जे उन्हाळ्यात आश्रय घेतात
तेच कधीतरी मारायला येतात
हातात त्यांच्या कुऱ्हाड दिसतांना
अंगार किती तरी काटे येतात ॥२॥

करवतीने कापतांना आवाज कसला होत नाही
पण याचा अर्थ असा नाही
की मला वेदना होत नाही
मला ही जगण्याची इच्छा आहे

थोडा अधिकार मला ही द्या ॥३॥
या निसर्गाच्या कुशीत थोडसं मन
मोकळ करु द्या
अनमोल मनाची व्यथा कुणी
येथे समजेल का ?

थांबवून सारी वृक्षतोड
मला नवीन जन्म मिळेल का ?

**– पाचोरकर श्रध्दा बाळासाहेब,**
द्वितीय वर्ष (बी.कॉम)

## जनतेच्या अपेक्षा

महागाईची विराट समस्या त्यांनी सोडवावी ।
बळीराजाची आत्महत्याही त्यांनी थांबवावी ॥

आमचे खरे शिक्षण त्यांनी स्वस्त दरात करावे ।
सर्व गरीब विद्यार्थ्यांस तुम्ही आर्थिक साह्य करावे ॥

सुख अन् दु:खामध्ये त्यांनी जनतेमध्ये मिसळावे।
प्रत्येकाच्या गावी असावी अडचण समजून घ्यावे ॥

गल्लोगल्ली मात्र असावी सुंदर ग्रंथालये ।
प्रत्येकाच्या गावी स्वच्छ असावी रुग्णालये ॥

सर्व माता, भगिनींना तुम्ही संरक्षण द्यावे ।
नोकरीसाठी भटकणाऱ्यांना तुम्ही सहाय्य करावे ॥

फक्त आश्वासने नको तर अंमलबजावणी व्हावी ।
सामान्यांची अडचण त्यांनी क्षणार्धात दूर करावी ॥

त्यांनी आमच्या देशाला प्रगतिपथावर न्यावे ।
राजकारणी त्याचे नाव सुवर्ण अक्षरी असावे ॥

योग्य समस्या सोडवाव्या हीच आमची अपेक्षा ।
योग्य उमेदवार निवडून यावा हीच आमची इच्छा ॥

**– गांगुर्डे निकिता लक्ष्मण,**
तृतीय वर्ष (बी.ए.)

## प्रिय अतिरेक्यांनो....



मारुन मारुन माराल किती
हा सोळाशे कोटींचा देश आहे
काहीही झाले तरी
एकात्मता अजुनही शेष आहे ॥१॥

लपून छपून वार करता तुम्ही
औलाद तर भित्र्याची आहे,
दाखविली जी झलक तुम्ही
ती तर पिसाळलेल्या कुत्र्याची आहे ॥२॥

कधी भगवा, कधी हिरवा
ही तर धार्मिक ढाल आहे
वाहिले जाते जे रक्त सारे
ते तर, फक्त लाल आहे ॥३॥

हे मनातून काढून टाका की
तुम्ही आम्हाला गुलाम कराल
उलट तुम्ही भारत माता की जय
म्हणून तिरंग्याला सलाम कराल ॥४॥

**– निखाडे वैष्णवी दिगंबर,**
तृतीय वर्ष (बी.ए.)

## आई...



माझा पहिला गुरू माझी आई...
माझ्या आयुष्याची सुरुवात
या दोन शब्दांपासून झाली
त्यावेळेस या दोन शब्दांचा
अर्थ समजत नव्हता...!
आणि आता अर्थ काढायला
शब्द कमी पडतात.
जे शब्द तिनेच मला शिकवले,
तिच्याच डोळ्यातून मी पहिल्यांदा
या जगाकडे पाहिले,
आजही तसच पाहण्याचा प्रयत्न करतो.
तिने मला प्रेम करायला शिकवलं
जगावर, माणसांवर
प्रेमाची भाषा शिकवली,
जी कुठल्या शाळेत
शिकवली जात नाही.
अशी माझी आई
माझा पहिला गुरू.

**– गवळी रविंद्र संजय,**
तृतीय वर्ष (बी.ए.)

## राजा एक दिवसाचा



तो सुध्दा एक
भिकारीच आहे.
पाच वर्षातून एकदा येणार
ए.सी. कारमधून.
गाड्यांचा ताफा आहे मागे पुढे
पैशाचा समुद्र आहे, सत्तेचाच माज आहे.
पण या क्षणाला, तो पार परावलंबी आहे.
तुझ्या एकुलत्या एक क्षुद्र मतासाठी
काकुळतीला येऊन तो
मागणार आहे जोगवा मतांचा.
कारण सत्तेशिवाय जगणे त्याला अशक्य झालय.
तेव्हा समजू नकोस स्वत:ला हीन दीन
आजच्या एक दिवसाचा तू राजा आहेस.

**– आहेर सुमित बंडू,**
तृतीय वर्ष (बी.ए.)

### विनोद

- शिक्षक – गण्या.... सांगा पाहू कंडक्टर आणि ड्रायव्हरमध्ये काय फरक आहे ?
  गण्या – कंडक्टर झोपला तर कोणाचेच तिकीट नाही निघणार आणि ड्रायव्हर जर झोपला... तर सर्वांचेच तिकीट निघेल

**– आवारे राणी नामदेव,**
तृतीय वर्ष (बी.ए.)



Scanned with CamScanner

## मैत्रीण....



मैत्रीण म्हणजे
कधी हसणारी, कधी हसवणारी
कधी रडणारी, कधी रडवणारी
कंटाळा येईपर्यंत बडबडणारी
नाकावर नेहमी राग असणारी
आपण जेव्हा जोडीला नसलो
तेव्हा आपल्यासाठी चिंतीत होणारी ...
आपण दिसलो की, गालावर
छान खळी पडणारी...
कधी चुकून न बघता पुढे गेलो तर
मागुन आवाज देणारी
वेळ प्रसंगी आपल्याला समजणारी
आपल्या सुखात मिसळून जाणारी
आपल्या दु:खात साथ देणारी
यशाच्या शिखरावर मात्र नेहमी
आपली पाठ थोपटणारी
आपल्या मनातले सगळे ओळखणारी
आपल्याला जिवलग मित्र म्हणून
आपल्यावर खूप प्रेम करणारी
खास अशी एक मैत्रीण असावी.

**– महाले निशा साहेबराव,**
तृतीय वर्ष (बी.ए.)

## गारपीट

काल अगदी अचानक
आला सोसाट्याचा वारा...

माझ्या शेतात बरसल्या
अशा भल्या मोठ्या गारा...

काही सावरायच्या आत
त्यानं शिवार व्यापलं...

अन् माझ्या डोळ्यांम्होरं
धन सगळच झोपलं...

माझ्या गव्हाचं रानं
हाती यायचं राहिलं...

मी असं कस धन्या
दृष्ट सपान पाहिलं...

असा कसा देव तू बी
माझ्यावरच राग भरतो...

मी अन्न देतो सर्वांना
अन् मीच सदा मरतो...

**– पाटील ऋषिकेश कैलास,**
तृतीय वर्ष (बी.ए.)

## चारोळी

आयुष्यात कधीच कोणावर
रागावू नका. कारण
रागाचा १ मिनीट तुमचे
सुखाचे १०० सेकंद वाया घालवतो.

**– गांगुर्डे निकिता लक्ष्मण,** तृतीय वर्ष (बी.ए.)



Scanned with CamScanner

## ग्रुप

ग्रुप असावा कुटुंबासारखा
नकोच नुसते जॉयनिंग.....!!

तिथे असावा प्रेम जिव्हाळा
नकोस नुसते शायनिंग...!!

त्या शब्दांना अर्थ असावा
नकोच नुसते पोस्टींग...!!

सुर जुळावे परस्परांचे
नकोच नुसते चॅटींग ...!!

इमेजेसचे मर्म कळावे
नकोच नुसते लोडींग ...!!.

व्हॉटस्अप मधून ज्ञान मिळावे
नकोच नुसते जोकींग ...!!

स्नेह सदा वृद्धिंगत व्हावा
मस्त रहावे बोंडींग ...!!

**– महाले निशा साहेबराव,**
तृतीय वर्ष (बी.ए.)

## विनोद

लडका – कहा जा रही हो ?
लडकी – आत्महत्या करने
लडका – तो इतना मेकअप क्यों किया हुआ है ?
लडकी – अबे गधे ! कल न्यूज पेपर मे फोटो आएगी ना !

**– महाले निशा साहेबराव,**
तृतीय वर्ष (बी.ए.)

## बाबा



असा कसा रे बाबा तू,
कितीही थकलास तरी,
तु तुझ्या भावना
कधीच व्यक्त करत नाही...
तुझं माझ्यावरचं प्रेम
कधीच बोलून दाखवत नाही...
तुझ्या कुठलाही त्रास
एक लेकच समजू शकते...
तू कितीही नाही बोललास
तरी तुझ मन मीच वाचू शकते...
तुझी शिकवण, आजही मला आवडते
तुझ्या सोबत घालवलेल्या प्रत्येक क्षण
मी रोजच जगत असते,
रोज येते रे बाबा
तुझी आठवण मला...
तुझी लेक आता मोठी झाली
हे कळलय ना रे तुला...

**– सातभाई भारती अशोक,**
द्वितीय वर्ष (बी.कॉम)



Scanned with CamScanner

## आई...



आई असते एक फुलाची कळी
सतत उमलत राहून सुगंध
दरवळत ठेवणारी...

आई असते क्षमतेची मूर्ती
आपल्या मुलांचे अनेक
अपराध पोटात घालणारी...

आई असते एक सावली
सतत सोबत राहून
मार्ग दाखविणारी...

आई असते परोपकारी
स्वत:साठी न जगता
इतरांसाठीच जगत राहणारी...

**– पाटील ऋषिकेश कैलास,**
तृतीय वर्ष (बी.ए.)

## आयुष्य

आयुष्य म्हणजे आहे एक अवघड गणित
सुटता नाही सुटत

बेरीज करताना घ्यावे लागते ध्यानात
वजाबाकी करावयाची तर चित्त होत विचलित.

गुणकाराने वाढते किंमत
भागाकार केला असता भाग पडतात

सर्व रिती करुन पाहिल्या पण उत्तर नाही येत
कर्ता करविता गणितज्ञ जेव्हा येते त्याच्या मनात

चुटकीसरशी तो बरोबर सोडवितो गणित.
पण हे पाहावयास आयुष्यरुपी अस्तित्वच उरत नाही

**– आहेर सुमित बंडू,**
तृतीय वर्ष (बी.ए.)

## सुविचार

जी माणसे पायाने चालतात ती फक्त अंतर कापतात, आणि जी माणसे डोक्याने चालतात, ती निश्चितच ध्येय गाठतात.

---

शेतात काय पिकतं त्यापेक्षा बाजारात काय विकतं हे ज्याला कळतं. तो माणूस जीवनात निश्चित यशस्वी होतो.

**– महाले निशा साहेबराव,**
तृतीय वर्ष (बी.ए.)



Scanned with CamScanner



## प्रेम

तुला माझं करता करता
मीच तुझा झालो...
नकळत मी तुझ्या
प्रेमात वाहिलो...
प्रेमाला होकार मिळवताना
जीव ही आता थकला होता...
एवढं सार होऊन देखील
तुझा प्रेमाला नकार होता....
खूपच प्रेम करतो तुझ्यावर
तुझा होकार नसतांना...
जग प्रिये सुखाने तू
मी या जगात नसतांना....

**– पाटील ऋषिकेश कैलास,**
तृतीय वर्ष (बी.ए.)

## चारोळी

शून्यातून स्वराज्य उभे करणं
हे फक्त आणि फक्त मराठाच करु शकतो...
मराठ्यांच्या पराक्रमाची गाथा
फक्त आणि फक्त सह्याद्रीच सांगू शकतो...

**– कतवारे निलम रामदास,**
द्वितीय वर्ष (बी.कॉम)



## मैत्री

मैत्रीचं नात हे पिंपळाच्या
पानासारखं असायला हवं
त्याची कितीही जाळी झाली
तरी पण ते जीवनाच्या पुस्तकात
आयुष्यभर जपून ठेवायला हवं
सगळ्यात सुंदर नाते
हे दोन डोळ्यांचे असते
ते एकाच वेळी उघडझाप करतात.
एकाच वेळी रडतात,
एकाच वेळी झोपतात,
तेही आयुष्यभर एकमेकांना न बघता.

**– निखाडे वैष्णवी दिगंबर,**
तृतीय वर्ष (बी.ए.)

## चारोळी

आयुष्याच्या किनाऱ्यावर 'स्माईल'
ची सुंदर अशी लाट आहे.
म्हणुनच प्रत्येकाच्या हसण्यात
काहीतरी खास आहे

**– गांगुर्डे निकिता लक्ष्मण,** तृतीय वर्ष (बी.ए.)



Scanned with CamScanner

# मुलगी



पोरीची पसंती आली की
बापाचं काळीज धडधडतं,
चिमणी घरट सोडून जाणार
आतल्या आत खूप रडत असतं.
हसरे खेळकर बाबा एकदम
धीर गंभीर दिसू लागतात,
पोरीकडे पाणी मागण्यापेक्षा
स्वत:च उठून घेऊ लागतात.
या घरातला चिवचिवाट आता
कायमसाठी थांबणार असतो,
म्हणून बाप लेक झोपल्यावर
तिच्याकडे पाहून रडत असतो.
अंबूच्या लिंबूच्या करत करत
मोठी कशी झाली मला कळलच नाही,
बाप सांगतो तिला सोडून
मला पाणी ही गिळलं नाही.
दिवसातून एकदा तरी
मायेनं जवळ घ्यावं वाटतं.
परक्याच धन असलं तरी
द्यायला मात्र नको वाटतं.
उठल्यापासून झोपेपर्यंत
बाबाची काळजी घेत असते,
आज ना उद्या जाणार म्हणून
पोरगी जास्तच लाडाची असते.
पोरगी जाणार म्हणलंकी
बाप आतून तुटून जातो,
कळत नाही बैठकीतून
अचानक का उठून जातो ?
इकडे तिकडे जाऊन बाबा
गुपचूप डोळे पुसत असतात,
लेकीचं कल्याण झालं म्हणून
पुन्हा बैठकीत हसत असतात.
तिचा सगळा जीवनपट
क्षणाक्षणाला आठवत राहतो,
डोळ्यांत येणाऱ्या आसवांना
बाबा वापस पाठवत राहतो.
बी.पी.ची गोळी घेतली का ?
आता कोण विचारील गं...
जास्त गोड खाऊ नका म्हणून
कोण कशाला दटवी गं...
नका काळजी करु बाबा
मी तुमच्या आधाराची काठी आहे,
बाबा घेईल मी तुमची काळजी
मी तुमची पोरगी आहे.
एका अर्थाने पोरगी म्हणजे
काळजी करणारी आईच असते,
पोटचा गोळा देणाऱ्यांची
कहानी फार वेगळी असते.

**– पाचारोकर निकिता रतन,**
द्वितीय वर्ष (बी.कॉम)



Scanned with CamScanner

## माझा शेतकरी राजा



माझा शेतकरी राजा
कशाला देताय तुम्ही
त्यांना कर्जाची सजा...
सारा देश करतोय
त्यांनी पिकविलेल्या
अन्नधान्यावर मजा...
शेती मध्ये माझा राजा
पिकवतोस माणिक मोती...
त्यांच्या कष्टावर शासन
फिरवतोय माती...
शेतीमध्ये पिकविलेल्या
अन्नावरच आपण ताव मारतोय...
शेतकरी राजा आहे म्हणूनच
आपण आज जगतोय...
माझा राजा आपण सुखी राहू म्हणून राबतोय...
त्यानं पिकवलेलं सर्व आपण कवडी मोल करतोय...
माझा राजा कर्जापायी फाशी जातोय...
मात्र शासन त्यांना मदत करतोय...
पण त्यांच्या मार्फत मदत येण्याअगोदर
ती मदत दुसऱ्यांच्या खिशात जातेय...
म्हणून आज माझा शेतकरी राजा
खूप कमवून देखील मरतोय....

**– पाचारोकर सोनाली संतोष,**
द्वितीय वर्ष (बी.कॉम)

## जीवनात नाती

जीवनात नाती तशी
अनेकच असतात,
पण ती जपणारी लोक
फार मीच असतात....
काही नाती असतात रक्ताची,
तर काही हृदयाची...
काही नाती असतात, जन्मो जन्माची
तर काही क्षणापुरतीची...
काही नाती असतात
केसांसारखी न तुटणारी,
पण वेळ आलीच तर वाकणारी..
काही नाती असतात
लांबूनच आपले म्हणणारी,
जवळ गेल्यावर मात्र दूर करणारी...
काही नाती असतात
पैशाने विकत घेता येणारी,
तर काही प्रमाने आपले से करणारी...

**– पाचारोकर निकिता रतन,**
द्वितीय वर्ष (बी.कॉम)

## चारोळी

मी मनसोक्त रडून घेतो
घरात कुणी नसल्यावर...
मग सहज हसायला जमते
चार-चौघात बसल्यावर...

**– कतवारे निलम रामदास,**
द्वितीय वर्ष (बी.कॉम)



Scanned with CamScanner

## आई !
## मला जन्म घेऊ दे.... !

तू जसे पाहिले जग मला देखील पाहू दे
सांग आई बाबांना जन्म मला घेवू दे ॥ धृ॥

परमेश्वर प्रत्येकाच्या घरी जाऊ शकत नाही
त्याच्या जागी तू आहेस कसे तुला कळत नाही

ताईसवे माझ्या मला आनंदाने न्हाऊ दे
सांग आई बाबांना जन्म मला घेऊ दे ॥१॥

हुंडा लागतो मोठा म्हणून त्रास माझा वाटतो का ?
झरा तुझ्या मायेचा म्हणून असा आटतो का ?

राखीसाठी दादाच्या निदान मला येऊ दे
सांग आई बाबांना जन्म मला घेऊ दे ॥२॥

तु बहिण, तु कन्या, तु एक स्त्री आहे
काल जिथे तू होतीस आज तिथे मी आहे

तु जसे विणले नाते तसे मला विणू दे
सांग आई बाबांना जन्म मला घेऊ दे ॥३॥

पहा मग फिरुन मी पुन्हा कधी येणार नाही
भाग्य कन्या व्हायचे दोघांनाही देणार नाही

डोळे येता भरुन तुझे पदर मला होवू दे
सांग आई बाबांना जन्म मला घेऊ दे ॥४॥

**– कु. शेळके सोनाली संपत,**
तृतीय वर्ष (बी.ए.)

## आयुष्य

आयुष्यभर सोबत असून
जवळ कधी बसत नाही,
एकाच घरात राहुन आम्ही
एकमेकांस दिसत नाही...

हरवला तो आपसातला
जिव्हाळ्याचा संवाद,
एकमेकास दोष देवून
नित्य चाले वाद विवाद...

धाव धाव धावतो आहे
दिशा मात्र कळत नाही,
हृदयाचे पाऊल कधी
हृदयाकडे वळत नाही...

इतकं जगून झालं पण
जगायला वेळ नाही.
जगतो आहोत कशासाठी
काहीच कसला मेळ नाही...

क्षण एक येईल असा
घेवून जाईल हा श्वास,
अर्ध्यावरच थांबलेला
असेल जीवन प्रवास...


अजुनही वेळ आहे
थोडं तरी जपून घ्या.
सुंदर अशा जगण्याला
डोळे भरुन बघून घ्या...

**– कु. गायत्री संजय हाटकर,**
द्वितीय वर्ष (बी.कॉम.)



Scanned with CamScanner

## शिवकाव्य



इंद्र जिमो नृंभ पर
बांडव सअंभ पर
रावण सदंभ पर
रघुकुलराज है

पवन बारिबह पर
संभु रतिनाह पर
ज्यो सहसबाह पर
राम द्विजराज है।

दावा कुमदंड पर
चीता मृगझुंड पर
भूषण प्रितुंड पर
जैसे मृगराज है।

तेज तमअंस पर
कन्ह जिनिकंस
त्यों म्लेंच्छ बस
शेर शिवराज है ।

**– कु. शेळके सोनाली संपत,**
तृतीय वर्ष (बी.ए.)

## चारोळी

माणसांचा जन्म खाटेवर
मध्यंतरी काळ पाटावर
माणसाचा शेवट घाटावर
तरीही आयुष्यभर चित्त नोटांवर

**– महाले निशा साहेबराव,** तृतीय वर्ष (बी.ए.)

## बाप....

आग लागली होती गरिबीला
भूक लागली होती पोटाला
जाऊ नाही दिले शाळेला
शेतात लावले राबायला
अनवाणी पायांनी माळ तुडवला
गहू पेरला दुष्काळ पडला
सावकार उभा राहिला
पैसे मागायला
बाप रडू लागला विनवण्या करु लागला
अवधी द्या मला
देईल पैसे मी तुम्हाला
घरात दाणा नाही खायला
दु:खाचे सावट डोक्यार लागले घोंगायला
बाप कंटाळला
गरीब परिस्थितीला
फंदा गळ्याला लावला
वाऱ्यावर आम्हास सोडून गेला.

**– आवारे अश्विनी अरुण,**
द्वितीय वर्ष (बी.कॉम.)



## संदेश

शिवभक्त व्हायला जात पात लागत नाही...
एकच जात आणि एकच धर्म
हिंदवी स्वराज्य....
शिवराय नाव घेतलं की रक्त सळसळले पाहिजे...
चार चौघात जय जिजाऊ, जय शिवराय..
म्हणून बघा कोणाकोणाला
मिर्ची लागली ते लगेच कळतं
शब्द भगवा... नाद भगवा...
या जीवनाचा आधार भगवा
शिवबा शिवाय सोडून कोणापुढे झुकत नाय...
लावतो जेव्हा चंद्रकोर माथ्यावर,
घेतो जेव्हा भगवा खांद्यावर, गर्व वाटतो आम्हाला
जय शिवराय म्हटल्यावर दुश्मनही म्हणतो..
काय शान असते....

**– कु. शेळके सोनाली संपत,**
तृतीय वर्ष (बी.ए.)

## तानाजीचा पोवाडा



मामा बोलाया तो लागला । ऐंशी वर्षाचा म्हातारा
लगिन राहिले रायबाचे तो मजला सांगावी
माझ्या तानाजी सुभेदारा । जे गेले सिंहगडला
त्याचे पाढिरे पाहिले । नाही पुढारे पाहिले
ज्याने आंबारे खाईला । बाळा बुजरा लाविला
त्याचे आड होऊनि आंबे बांधले
किल्ला हाती नाही आला
सिंहगड किल्याची वार्ता
काढू नको तानाजी सुभेदार
जे गेले सिंहगडाला । ते मरुनशानी गेले
तुमचा सपाटा होईल । असे बोलू नको रे मामा
आम्ही सुरमर्द क्षत्री । नाही भिणार मरणाला

**– आवारे अश्विनी अरुण,**
द्वितीय वर्ष (बी.कॉम.)



Scanned with CamScanner

## जीवन

जीवनाला उपमाच नाही.
उपम्याला रवाच नाही.
रव्याला गहूच नाही.
गव्हाला पाणीच नाही.
पाण्याला पंपच नाही.
पंपाला पैसेच नाही.
पैश्याला नोकरीच नाही.
नोकरीला शिक्षणच नाही.
शिक्षणाला डिग्रीच नाही.
डिग्रीला कॉलेज नाही.
कॉलेजला पोरीच नाही.
जीवनाला उपमाच नाही.

**- आवारे अश्विनी अरुण,**
द्वितीय वर्ष (बी.कॉम.)

## सोबत

तू सोबत असतांना
आयुष्य किती छान वाटतं...
उनाड मोकळं
एक रान वाटतं....
सदैव मनात जपलेलं
पिंपळपान वाटतं....
कधी बेधुंद
कधी बेफान वाटतं
खरंच
तू सोबत असतांना
आयुष्य किती छान वाटतं...!

**- पाटील ऋषिकेश कैलास,**
तृतीय वर्ष (बी.ए.)



## आई

आभाळाहूनही मोठा माझ्या आईचा पदर
सामावून घेते जीवनातले दु:ख सार
भराया पोट म्हणून कष्ट केले अपार
काळ्या मातीत राबून सरुकुतले शरीर
कधी नाही पाहिले तिने पंढरपूर
तरी सांगती माझ्या विठ्ठलाची
लिला अपरमपार

**- आवारे अश्विनी अरुण,**
द्वितीय वर्ष (बी.कॉम.)



Scanned with CamScanner

## गाव तसा आमचा लई भारी !

गाव तसा आमचा गड्या लई लई भारी !
दूरवर पसरलेल्या पर्वतांच्या हारी
त्यात हा वसला नेत्रावतीच्या तिरी
गावावर कृपा सदैव देव भैरव करी
नावही पडलं त्यावरुन भैरवनगरी !
गाव तसा आमचा गड्या लई लई भारी !
गावच्या मंदिरात असे भैरवनाथ-जोगेश्वरी
डौलत फडके भगवा, मंदिराच्या वरी
रत्नगडाचा खंडोबा दैवत या तीर्थावरी
गावाकडे नजर विठ्ठलाची हात कमरेवरी
गाव तसा आमचा गड्या लई लई भारी !
गंमत येते आमच्या यात्रेलाच खरी
गल्लोगली फिरते रथाची वारी
रंगतात कुस्त्या, टांगे खूप भारी
गोड धोड नैवेद्य केला जातो घरोघरी
गाव तसा आमचा गड्या लई लई भारी !
समदे जण आम्ही काळ्या आईचे शेतकरी
पेटाऱ्यात भरुन द्राक्ष पाठवितो जगावरी
कणा-कणाने गुरुजन शाळेत ज्ञानदान करी
पोर बी लई हुशार त्यांची सर्वदूर भरारी
गाव तसा आमचा गड्या लई लई भारी!

– निखाडे प्राजक्ता दत्तात्रय,
द्वितीय वर्ष (बी.कॉम.)

चारोळी

यशस्वी आयुष्यापेक्षा समाधानी
आयुष्य केव्हाही चांगले
कारण यशाची व्याख्या लोक करतात
तर समाधानाची आपण स्व:त

– गांगुर्डे निकिता लक्ष्मण, तृतीय वर्ष (बी.ए.)

## आश्वासन

जिद्द धरली अवकाळी पावसाने,
आत्महत्या केल्या गरीब शेतकऱ्याने.
गारांनी ठेचले कांदे,
खायचे झाले वांदे.
पिक झालं उभ्याचं आडवं,
शेतकऱ्यानं आता काय करावं
अश्रू आले डोळ्याला,
कोणी नाही पुसायला.
हात कोणाकडे पसरवावे शेतकऱ्याने,
सरकारने दिलासा दिलाय आश्वासनाने.

– आवारे अश्विनी अरुण,
द्वितीय वर्ष (बी.कॉम.)

## निर्णय

आयुष्यातले निर्णय चुकतात,
आणि मग आयुष्यच चुकत जाते...
कधी कधी तर प्रश्न कळत नाही,
आणि उत्तरही चूकत जाते...
सोडवताना वाटते सुटत गेला गुंता,
पण प्रत्येक वेळी एक नवीन गाठ बनत जाते...
दाखवणाऱ्याला वाट माहित नसते,
चालवणाऱ्याचे ध्येय मात्र हरवत जाते...
काही गोष्टी वाटता तितक्या सोप्या नसतात,
'अनुभव' म्हणजे काय हे तेव्हाच कळते...
जेव्हा एखादी ठेच काळजाला लागते...

– गवळी रविंद्र संजय,
तृतीय वर्ष (बी.ए.)



Scanned with CamScanner

## आम्ही भारतीय

आज असा भारत हवाय,
जिथे सगळ्यांची जात भारतीय असेल.
धर्म, देशप्रेम असेल.
जाती भेद, सीमापार असेल.
नातं असेल ते फक्त भारतीयत्वाचं.
सुख... शांती समाधानाचं.
व्यक्तींच्या विचारांना एवढी धार असेल,
प्रत्येक भारतीयांचा अन्यावर होणारा वार असेल
जगातल्या प्रत्येक व्यक्तीच्या मनात
भारता विषयी आदर सन्मान असेल.

**- जयश्री भीमा सोनवणे,**
द्वितीय वर्ष (बी.कॉम.)

## तू माझी सखी

सहज ओळख झाली.
खीन्न मनाला चाहूल दिली.
तुझ्या साथीची ओढ लागली.
माया अशी नवी लाभली.
झीरपणारे अश्रू पुसू लागली.
मैत्रिण अशी नशिबाने लाभली.
त्रिलोकी गाजो मैत्री आपुली.
नजर ना लागो तू ऊन मी सावली.

**- पाचोरकर अलका केशव,**
द्वितीय वर्ष (बी.कॉम.)

## चारोळी

जीवनाचा प्रत्येक क्षण आपल्याला
काहीतरी देत असतो
पण नकळतपणे आपल्या आयुष्याचा
एक क्षण तो घेत असतो.

**- गांगुर्डे निकिता लक्ष्मण,** तृतीय वर्ष (बी.ए.)



## मुलगी कशी असावी

मुलगी असावी जिजाऊसारखी,
शिवबाला जन्म देऊन स्वराज्य घडविणारी.
मुलगी असावी सावित्रीसारखी,
शिक्षणाचा प्रसार करणारी.
मुलगी असावी सितेसारखी,
सितेचे सितापण जपणारी.
मुलगी असावी सरस्वतीसारखी,
सर्वांची ईच्छा पूर्ण करणारी.
मुलगी असावी गुलाबासारखी,
काट्यात राहून सुगंध देणारी.
मुलगी असावी सुंदर,नाजूक फुलासारखी,
पुज्य वडिलधाऱ्यांना बघून पटकन झुकणारी.
मुलगी असावी सुशील, संस्कारी,
वडिलांची मान कधी नं झुकवणारी.
मुलगी असावी संकटांना मात देणारी,
मुलगी असावी दोन्ही घरांचा उध्दार करणारी.
मुलगी असावी परिस्थितीनुसार घर सांभाळणारी,
मुलगी असावी कल्पना चावला,
तेजस्विनी, सायना नेहवाल
सारखी देशाचे नाव उंचविणारी.
मुलगी असावी मुलगी होण्याचा गर्व असणारी,
तलवारीच्या पात्यासारखी लखलखणारी.

**- तिडके शितल बाळासाहेब,**
द्वितीय वर्ष (बी.कॉम)



Scanned with CamScanner

## संभाजी महाराजांचे बालपण

संभाजी महाराजांचा जन्म १४ मे १६५० रोजी किल्ले पुरंदर येथे झाला. शिवाजी महाराजांसारखा युगपुरुषाचे पुत्र असल्यामुळे रणांगणावरील मोहिमा आणि राजकारणातील डावपेच यांचे बाळकडू त्यांना लहानपणापासूनच मिळाले. संभाजीराज्यांच्या आईचे, सईबाईचे निधन झाले, परंतु राजे अगदी लहान असतानाच त्यानंतर पुण्याजळील कापूरहोळ गावची धाराऊ नावाची स्त्री त्यांची दुध आई बनली. संभाजींचा सांभाळ त्यांची आजी जिजाबाई यांनी केला. सुरुवातीच्या काळात त्यांच्या सावत्रआई सोयराबाई यांनी देखील त्यांच्यावर खूप माया केली. अशाप्रकारे संभाजी महाराजांचे बालपण गेले.

**– कु. शेळके सोनाली संपत,**
तृतीय वर्ष (बी.ए.)

### मैत्रीचे धागे

कोळ्याच्या जाळ्यापेक्षाही मजबूत असतात.
लोखंडाच्या तारेहूनही बारीक असतात.
तुटले तर श्वासानेही तुटतात.
नाही तर वज्रघातानेही तुटत नाही.

**– पाचोरकर अलका केशव,**
द्वितीय वर्ष (बी.कॉम.)

### सुविचार

काळानुसार बदला नाहीतर काळ तुम्हाला बदलून टाकेल.

---

यशस्वी माणूस तोच होतो त्याच्यावर
शत्रूने लिंबू फेकले. तरी तो त्याचे सरबत करुन पितो.

**- महाले निशा साहेबराव,** तृतीय वर्ष (बी.ए.)

## काळीज

काळीज मी आणि ठोका तू,
सोडून जातांना एकदा
तू मागे वळायचं होतह
तुझं माझं नातं
थोड जपायच होत...
पाठ फिरवली मी
तू हाक मारायची होती.
लपवलेल्या अश्रूंना माझ्या डोळ्यात
थोड न्याहाळायचं होत...
काय हरवल आहे आपल्यात
एकदा विचारायच होतं,
अबोला धरला मी
तू कारण शोधायच होतं...
एक हुंदका मी जपला
तू ओळखायचं होतं
स्वार्थापुरतीचं प्रेम माझं
हे ही खरचं होतं...
पण स्वार्थातल्या या प्रेमात
एक प्रेम तेवढच मुद्याचं होतं,
मार्ग आपले वेगळे हे तर
शेवटी होणारच होतं...
स्वीकारायचं कस हेच फक्त कळत नव्हतं,
काळीज मी आणि ठोका तू
एवढंच मला म्हणायच होतं...
तूझं माझं नशीब त्याने असंच
का लिहायचं होतं...

**– गांगुर्डे अर्चना भाऊसाहेब,**
तृतीय वर्ष (बी.कॉम)



Scanned with CamScanner



## शिवाजी महाराजांचा पोवाडा

प्रतापगडाच्या पायथ्याशी खान
आला बेगुमान नाही त्याला जाण
शिवाजी राजाच्या करामरतीची
ज्याशी नाही जाणीव शक्तीची
करील काय कल्पना युक्तीची .... जी जी जी
महाराजांनी निरोप घेतला
न दंडवत घातला भवानीला
तसाच आई जिजाऊला
वकुत हो वंगाळ त्यो कैसा
पानी आल आईच्या डोळ्याला
न सरदार लागला रडायला
अहो हे हे हे सरदार तर रडतीलच
पण हत्ती घोडे ना शिब चार्याला
अन् गाई बघा लागल्या हंबराया
असला बेहुद वकुत आला
दुश्मनाच्या गोटामधी चालला मराठ्यांचा राजा
अहो राजा हो जी र दाजी जी जी जी
खानाच्या भेटीसाठी
महाराजांनी एक शानदार शमीयाना उभारला
भेटीसाठी छान उभारला
नक्षीदार शामीयान्याला
अन् अशा या शामियान्यात
खान डौलत डुलत आला
सय्यद बंडा त्याच्या संगतीला
शिवबाच्या संगती महाला
म्हणतात ना होता जीवा म्हणून वाचला शिवा
राजाला पाहून खान म्हणतो
आओ, आओ शिवाजी आओ, हमारे गले लग जाओ।
खान हाक मारितो हसरी, रोखूनी नजर गगनी
जी जी र जी जी
पण आपला राजा....
काही कच्च्या गरूचा चेला नव्हता
राजा गोर पाहत त्याचा नारी
चाल चित्याची सावध भारी.... जी र जी जी
खानान राजाला अलिंगन दिले अन् दगा केला
खान दाबी मान म्यानाला
कटारीचा वार त्याने केला
खर खरा आवाज झाला
चिलाखत व्हत अंगाला
खानाचा वार फुका गेला, खान गडबडला...
इतक्यात महाराजांनी
पोटामधी बिछवा ढकलला
वाघनखांचा मारा केला
हे टरटरा फाडल पोटाला
हे तडा गेला खाणाच्या कोथला
बाहेर आला.... जी र जी जी
प्रतापडाचे युध्द जाहले
रक्त सांडले पाप सारे गेले
पावन केला कृष्णेचा घाट
लावली गुलामाची हो वाट
मराठे शाहीचा मांडला थाट हो.... जी जी जी

**- गौरव निलेश कोतवाल,**
तृतीय वर्ष (बी.ए.) (संकलित)

## आयुष्य हे असचं जगायचं असतं....

जे घडेल ते सहन करायचं असतं,
बदलत्या जगाबरोबर बदलायचं असतं,
आयुष्य हे असंच जगायचं असतं...
कुठून सुरु झालं हे माहित नसलं,
तरी कुठे थांबायचं हे ठरवायचं असतं,
आयुष्य हे असचं जगायचं असतं...
कुणासाठी काहीतरी निस्वार्थपणे करायचं असतं,
स्वतःच्या सुखापेक्षा इतरांना सुखवायचं असतं,
आयुष्य हे असंच जगायचं असतं...
दुःख आणि अश्रूंना मनात कोंडून ठेवायचं असतं,
हसता नाही आलं तरी हसवायचं असतं,
आयुष्य हे असंच जगायचं असतं....
पंखामध्ये बळ आल्यावर घरट सोडायचं असतं,
आकाशात झेपावूनही धरतीला विसरायचं नसतं,
आयुष्य हे असंच जगायचं असतं...
मरणानं समोर येऊन जीव जरी मागितला तरी,
मागून मागून काय मागितलं असं म्हणायचे असतं,
आयुष्य हे असंच जगायचं असतं...
इच्छा असो या नसो जन्मभर वाकायचं असतं,
पण जग सोडतांना मात्र समाधानानं जायचे असते,
आयुष्य हे असंच जगायचं असतं...

**– गुंजाळ कविता भाऊसाहेब,**
द्वितीय वर्ष (बी.कॉम)

## तूच ती.... तीच तू

तीच तू ... रामरायाची माता कौशल्या.. गं
तीच तू ... कन्हैयाची मैय्या यशोदा ... गं
तीच तू ... शिवरायाची आई जिजाऊ ... गं
तीच तू ... रामाची पत्नी सीता .. गं
तीच तू ... कृष्णाची भगिनी द्रौपदी... गं
तीच तू ... नंदलालाची मैत्रिण गोपीका ... गं
तीच तू ... कृष्णाची वेडी प्रेमिका मीरा ... गं
तीच तू ... शूरवीर झाशीची महाराणी लक्ष्मीबाई..गं
तीच तू ... रामाची भक्त वेडी शबरी ... गं
तीच तू ... महाकाली, महालक्ष्मी,
महासरस्वती,
महाजगदंबा माता...गं
जग बदलत पण तू बदलू नकोस ... गं
तु अशी पहिली होतीस ... तशीच
तू आजपण रहा गं, तु आपल्या शौर्यपणा
ममत्व व तुझा इतिहास विसरु नकोस.. गं
तुझ्या सामर्थ्याने
आपला भारत देश महान होऊ दे गं.
जय हिंद...! जय महाराष्ट्र...!!

**– तिडके शुभांगी मोहन,**
द्वितीय वर्ष (बी.ए.)

## विनोद

बायको – अहो, एकलत का आपले लग्न लावून देणारे भटजी वारले

पती – एक ना एक दिवस त्याला त्याच्या कर्माचे फळ मिळणारच होते.

**– महाले निशा साहेबराव,**
तृतीय वर्ष (बी.ए.)

## जीवनाचे ऋतू

आयुष्यात एकदा.... इतका पाऊस पडावा
की, 'इगो' सगळा वाहून जावा.
आयुष्यात एकदा.... इतकी जबरदस्त थंडी पडावी
की, सगळी दु:ख गोठून जावी.
आयुष्यात एकदा... इतक कडक ऊन पडावं
की, जवळच्या सावल्याचं महत्त्व कळावं.
ते दिवस खूप छान होते.
घड्याळ एखाद्याकडेच असायचे,
आणि वेळ सर्वांकडे
आता घड्याळ सर्वांकडे आहे.
परंतु वेळ कुणाकडेच नाही.
आकाशाला टेकतील असे हात नाहीत माझे
फुलांचे गीत ऐकावेत असे कान नाहीत माझे
चंद्र, सूर्याला आठवून ठेवणारे असे
डोळे नाहीत माझे पण...
आपल्या माणसांची आठवण ठेवतील असे
हृदय आहे माझे...

**– तिडके शुभांगी मोहन,**
द्वितीय वर्ष (बी.ए.)

## चारोळी

उपकार नाहीत एक भास आहे प्रेम
जीवनाच्या परीक्षेत एक मुक्काम आहे प्रेम
जीव देणे मोठी गोष्ट नाही
आयुष्यभर साथ देणे म्हणजे प्रेम.

**– वाटपाडे पुजा अरुण,**
द्वितीय वर्ष (बी.कॉम)

## शेतकरी



जमिनीला म्हणतात शेतकऱ्याची आई,
तरी आमच्या शेतकऱ्याचा विकास का नाही ?
लोकांच्या पोटासाठी दिवसभर राबतो,
स्वत: मात्र चटणीभाकरीवर जगतो.
कष्ट करुन सुख याच्या नशिबात नाही,
दोन नवीन कापडं याच्या अंगात नाही.
शेतीत कष्ट करुन निसर्ग कोपतो,
दुष्काळाच्या भीतीने शेतकरी कापतो.
मी शेतकरी झालो यात माझा काय गुन्हा,
दुबार पेरणी करुन कष्ट करायला लावतो पुन्हा.
शेतमालाला योग्य भाव मिळत नाही,
सावकाराच्या त्रासातून याची सुटका नाही.
ईश्वरा तु जरी कोपला पण मी हरणार नाही,
येणाऱ्या संकटाचा सामना करेल
पण फास घेऊन मरणार नाही.
यंदा जरी नसला माझ्या
पीकांना भाव तर काय झालं
कष्ट करणार, पण मी हरणार नाही....

**– गुंजाळ कविता भाऊसाहेब,**
द्वितीय वर्ष (बी.कॉम)–



Scanned with CamScanner

# आठवण तुझी येता...

तुटले सर्व धागे
गुंतवू नको पुन्हा
विरहाचे चांदणे
कातरतील रे पुन्हा...
मन भरकटता भुतकाळी
ओल्या होती नयन पापण्या,
तुझ्या आठवणीतील त्या खुणा
जाग्या होती पुन्हा पुन्हा...
आठवण तुझी येता
ताज्या होती भरल्या जखमा,
अशा घायाळ काळजाला
नको घाव पुन्हा पुन्हा...
विनले जे प्रेम धाग्यांनी
ते वस्त्रही फाटले होते,
काय करणार मी तरी
धागे कच्चे ठरले होते...
खोट्या विश्वासाने जे
तुटले कणा कणा...
नको असे बंध मला
जे दुखवेल पुन्हा पुन्हा...

**– आहेर मोहिनी दत्तात्रेय,**
तृतीय वर्ष (बी.कॉम)

## विनोद

एक ट्रक आणि पोपट यांची धडक होते
पोपट बेशुध्द पडतो..
ट्रक ड्रायव्हर पोपटाला घरी पिंजऱ्यात ठेवतो
(पोपट शुध्दीवर आल्यावर)
आयले जेल ??? ड्रायव्हर मेला कि काय ???

**- आवारे राणी नामदेव,** तृतीय वर्ष (बी.ए.)

# क्रिकेट

क्रिकेट हा एक मजेशीर खेळ आहे.
त्यासाठी कधीही मोकळा वेळ आहे.
पुढे भारतीय क्रिकेट संघाचा परिचय आहे.
जो नवीन जुन्या खेळाडूंचा संचय आहे.
सचिनचे काय वर्णन करु आता.
गेल्या पंधरा वर्षापासून त्याचीच आहे.
भारतीय क्रिकेटवर सत्ता,
राहुल द्रविड आहे भारतीय संघाची भिंत.
याची सर्व संघांनाच वाटत असते खंत.
भारताचा यष्टीरक्षक आहे महेंद्र धोनी.
षटकार मारुन तोच करतो क्रिकेट आयोजक मंडळाच्या
चेंडूची हानी, डावखुरा बॅटस्मन आहे युवराज.
फिल्डिंग बाजूवर त्याचाच आहे राज.
ऑल राऊंडर आहे मोहम्मद कैफ.
बॉल त्याच्याकडे गेला की समजा बॉल आहे सेफ.
नवीन खेळाडू आहे वेणुगोपालराव.
त्याला करायला हवा अजून थोडा सराव.
मुरली कार्तिकला खेळायला भेटते आहे अशी पारी.
जशी वर्षातून एकदा येते एकादशीची वारी.
हरभजन सिंगच्या बॉलिंगला चांगलेच उत्तर श्रीलंकेचे.
आय.सी.सी. च्या वेळी त्याच्या मनात बॉलिंग विषयी
नेहमी वादळ शंकांचे.
नवा उपकर्णधार आहे विरेंद्र.
त्याची बॅटिंग नेहमीच करणे धरवेंद्र.
पाकिस्तानात जन्मलेला पठाण आहे बॉलर.
ज्युनिअर असून सुध्दा त्याच्याच बॉलिंगवर सगळे
कॉलर.

**– गुंजाळ कविता भाऊसाहेब,**
द्वितीय वर्ष (बी.कॉम)



Scanned with CamScanner

## हे असंच चालायचं.....



आम्ही कॉलेजला जायचं लेक्चर करायचं
तुम्ही मात्र व्हरांड्यात हिंडायचं
आम्ही लक्ष नाही द्यायचं
हे असंच चालायचं ॥१॥

कॉलेज सुटून आम्ही घरी जायचं
तुम्ही पाठीमागून यायचं
आम्ही वळूनही नाही पहायचं
हे असंच चालायचं ॥२॥

नंतर आमचं करिअर घडायचं
तुम्ही मात्र वाय.डी. होत रहायचं
बघून तुम्हाला पेढा द्यायचा
तोही तुम्ही गोड मानून खायचा
हे असंच चालयचं ॥३॥

आमच्या गल्लीत यायचं
आम्ही केस विंचरत गॅलरीत उभ असायचं
बघून तुम्हाला तोंड फिरवायचं
तुम्ही निराश नाही व्हायचं
हे असंच चालायचं ॥४॥

नंतर आमच लग्न ठरायचं
लग्नात तुम्ही हजर असायचं
पण निराश नाही व्हायचं
हे असंच चालायचं॥५॥

काही वर्षातच आम्ही माहेरात दिसायचं
आमच्याकडे लेकरु असायचं
ते आम्ही तुमच्या हाती द्यायचं
आणि.... आणि.....
त्याने निरागसपणे तुम्हाला मामा म्हणायचं
तरीही तुम्ही निराश नाही व्हायचं
हे असंच चालयचं ॥६॥

**– वाटपाडे पुजा अरुण**, द्वितीय वर्ष (बी.कॉम)

## माझी आजी

डोईवर जो पदर, तेज कसे ते सुंदर
तोंडी शब्दाची साखर, माझ्या आजीच्या ॥१॥
व्रतवैकल्याचा भांडार, पोथी पुराणाचा सार
साऱ्या कुटूंबाचा आधार, अशी माझी आजी ॥२॥
काय सांगु तिच्या हातातली चवदार जादू
सुंदर तिची पुरणपोळी आणि सुंदर तिचे लाडू
अशी माझी आजी ॥३॥
खूप हिम्मत यायची लहानपणी, तिच्या शुरू कथा ऐकतांना, खुप सुखत वाटायचे, तिच्या कुशीत झोपताना, अशी माझी आजी ॥४॥
देवावरची तिची श्रध्दा, लय वेगळीच न्यारी
कधी चुकली नाही तिची पंढरीची वारी ॥५॥
जात्यावरची तिची ओवी, रोज मला वाटे नवी
लावली शब्दाची ही गोडी, माझ्या आजीने ॥६॥
खरंच खूप छान होते ते दिवस, जेव्हा आजी होती पण आता गेले ते दिवस आणि गेले से सण, राहिल्या फक्त आठवणी.... ॥७॥
आजी तुझ्याशिवाय कसे जगायचे, तुला विसरण या जन्मात तरी नाही जमायचे ॥८॥

**– आहेर मोहिनी दत्तात्रेय,**
तृतीय वर्ष (बी.कॉम)

## अशीच आहे ती....

सुंदर दिसणारी, थोडीशी सजणारी
थोडीशी लाजणारी
खूप गोड हसणारी
अशीच आहे ती....
एकटी एकटी जगणारी
स्वतःच्याच शोधात फिरणारी
सगळ्यांपासून दूर दूर जाणारी
पण जाताना मात्र
मनात घर करुन राहणारी
अशीच आहे ती...
माझ्या एका भेटीसाठी आतुर होणारी
आतुरलेल्या डोळ्यांनी माझी वाट बघणारी
'किती रे उशीर.... ?' असं म्हणून भांडणारी
'मी वेळेवर आलोय तूच आधी येऊन बसलीस'
असं बोलल्यावर
हळूच 'सॉरी' बोलून जीभ चावणारी
अशीच आहे ती...
पावसात चालताना वीज कडाडल्यावर घाबरुन
मला बिलगणारी
अन् दुसऱ्याच क्षणी लाजून दूर होणारी
'अरे भिजू नकोस रे आजारी पडशील' असं मला सांगून
स्वतःच भिजणारी
अशीच आहे ती....
माझ्याशी हक्कानं भांडणारी, रुसणारी
रुसून माझ्याशी बोलणं सोडणारी
नंतर स्वतःहून 'मी अजून तुझ्यावर रागावलेली आहे'
म्हणून सांगणारी
अशीच आहे ती....
मी गर्दीत दिसेनासा झाल्यावर कावरी बावरी होऊन
मला शोधणारी
'हात का सोडलास रे..? हरवली असता तर...?'
असं बोलून पुन्हा माझा हात घट्ट पकडणारी
अशीच आहे ती...
मी दिलेलं गुलाबाचं फुल पुस्तकात जपून ठेवणारी
मी केलेली प्रत्येक कविता समजली नाही तरी
'वा खूप छान !' बोलणारी
माझी प्रत्येक आठवण जीवापाडा जपणारी
माझ्यावर खूप प्रेम करणारी
मला पूर्ण करणारी... अशीच आहे ती...

**- वाटपाडे पुजा अरुण,**
द्वितीय वर्ष (बी.कॉम)

## जिन्हे जन्म दिलाय मला

देवा सुखी ठेव तिला,
जिन्हे जन्म दिलाय मला.
सामोरे जावे तिने प्रत्येक संकटाला
असा आत्मविश्वास दे तिला.
आयुष्यभर तिची साथ दे मला.
जोडून ठेवीत असते कुटूंबाला
त्या कुटूंबाची साथ असू दे तिला.
जिन्हे जन्म दिलाय मला.
देवा सुखी ठेव तिला.
आयुष्य लावले तिने पणाला,
भरपूर आयुष्य लाभो तिला.
प्रत्येक संकटात तिची साथ दे मला.
देवा सुख, समृध्दी लाभो तिला,
जिन्हे जन्म दिलाय मला,
देवा सुखी ठेव तिला....

**- जयश्री भीमा सोनवणे,** द्वितीय वर्ष (बी.कॉम.)



Scanned with CamScanner

## प्रेम



प्रेम म्हणजे काय असतं ?
प्रेम म्हणजे 'प्रेमच' असतं.
प्रेम हे दोन अक्षरांचा शब्द असतो
दोन जीवाचं नातं जपतो.
प्रेमाची महती कशी वर्णवी ?
ती प्रेम करणाऱ्यानेच ठरवावी.
प्रेमाचेही प्रकार किती ?
त्याची खूप मोठी आहे व्याप्ती.
आईचं प्रेम हे मातृप्रेम असतं.
पित्याचं प्रेम हे पितृप्रेम असतं.
भगिनी प्रेम हे काही वेगळेच असतं.
त्यातही एक जिव्हाळ्याचं नातं असतं.
पत्नीप्रेम हेही अति नाजूक असतं.
जीवनातील ते एक तूप साजूक असतं.
भावाचे प्रेम हे बंधूप्रेम असतं.
पाठीशी तो एक आधार असतो.
मित्राचं प्रेम हे मित्रप्रेम असतं.
सुदाम्याच्या पोह्यांप्रमाणे
तेही निख्खळ असतं.
प्रेयसीचंही प्रेम असतं,
कधी कधी तो एक
खतरनाक गेम असतो.
प्रेम हे कुणावरही करावं
पण ते मात्र भरभरुन
नि:स्वार्थी करावं.
निर्भेळ प्रेमासाठी प्रसंगी
हसत हसत आपलं
जीवनही सरावं.
प्रेमात असावी
फक्त आपुलकी,
तरच कळते खरी
प्रेमाची बांधिलकी.
प्रेमाचा सतत वाहत राहो झरा,
हाच प्रेमाचा अर्थ खरा.

**– वाटपाडे पुजा अरूण,**
द्वितीय वर्ष (बी.कॉम)

## आयुष्य

आयुष्याची डायरी लिहिणारा देव असतो
पण वाचणारे आपण असतो.
जिवनात खूप काही हवं असते,
पण जे पाहिजे तेच मिळत नसते.
सर्व काही नशिबात असते,
पण आपलं नशिब घडविणे हे
आपल्याच हातात असते.

**– आवारे अश्विनी अरूण,**
द्वितीय वर्ष (बी.कॉम.)

## सुविचार

एवढे लहान बना की, प्रत्येकजण तुमच्या सोबत बसू शकेल आणि इतके मोठे बना की, जेव्हा तुम्ही उभे राहाल तेव्हा कोणीही बसलेला नसेल.

**– वाटपाडे पुजा अरूण,**
द्वितीय वर्ष (बी.कॉम)

## आठवण



ए, थांब ना गं
मी पण येतोय ना ?
ये नारे लवकर
दप्तर जड झालंय ना ?
आल्यावर घेईन मी
दप्तर तुझे माझ्या हातात,
मग तू देशील ना
तुझा हात माझ्या हातात...
माझ्यातले चणे-फुटाणे
देईन मी तुला,
आणिक येताना उद्या
बोरे आणेन तुला...
पण बघशील ना
माझी वाट ?
अगं.. तुझ्या सोबतीनं
लवकर संपते वाट....
ए... पुढच्या वर्षी तू
बदलणार नाहीसना शाळा...?
माझ्यातले अर्धे चॉकलेट
नक्की देईन तुला,
पण गेलीसच जरी तू
देशील ना तुझे मोरपीस मला...
तेवढीच तुझी आठवण
विसावेल मनाला...

**- वाटपाडे पुजा अरुण,**
द्वितीय वर्ष (बी.कॉम)

## कारगिल

जिस पर किया गया भरोसा
उसी ने दिया एकबार फिर से धोखा
अमन चैन के नामपर हम करते गये लडाई
जिसकी कींमत वीरों ने चुकाई ।
बीत गये कई साल, जख्म अभी हरा वही
हुए अमर कई सपूत, नाम उनके जडे वही
जली वह, अमर जवान ज्योत
पर सीने की आग जलती रही
उस दिन कारगिल की वह पावन रणभूमी
मातृभक्तों के रंग मे रंग गई ।
सन १९९९ में उन्होंने यह सुनकर अवसर पाकर
धरती माँ का कर्ज उतारा
गोली खाकर, लहू बहाकर उन्होंने देशे को सवारा
कहते तो हम बहुत है की,
भारत हमको प्राणों से प्यारा है ।
पर क्या यह स्कूलों में रोज सुबह कही जानेवाली
प्रतिज्ञा या केवल एक चुनावी नारा है ?
मैं कहती हूँ जाओ, पुछो उस बहन से
रक्षाबंधन के दिन जिसके चेहरे पर मुस्कान की जगह
आँखो से आसू आया है।
जाओ पूछो उस माँ से जिसने अपनी आँखो के आगे
अपने शहीद सपूत को मृत पाया है।
जाओ पुछो उस बच्चों से जिसके सिर से उठ गया
पिता का साया है । उन सपूतां हमारे अमन चैन के
लिये हसकर मौत को गले लागया है।
आओ आज प्रण ले कि उनके खून को व्यर्थ न बहाना
है। उनके बलिदानों को सार्थक बनाना है।
सिर्फ कथनों या भाषणों में नही
हमे इस देश को कर्मो से महान बनाना है।

**- वक्ते माधुरी संजय,** द्वितीय वर्ष (बी.कॉम)



Scanned with CamScanner

## भावना

आईच्या डोळ्यात
वडिलांच्या मिठीत
गाय-वासरांच्या नात्यात
आणि पाखरांच्या चाऱ्यात
आहेत त्या भावना...
भावाने दिलेल्या साडीत
सासरी निघालेल्या लेकीत
कपाळी सजणाऱ्या कुंकवात
आईने लपून दिलेल्या पैश्यात
आहेत त्या भावना...
मैत्रीच्या नात्यात
विरहाच्या आसवांत
हरणाऱ्याच्या मनात
आणि हसणाऱ्यांच्या डोळ्यात
असतात फक्त भावना...
महाराजांच्या आदेशात
ज्ञानोबांच्या पसायदानात
तुकोबांच्या अभंगात
आणि पंढरीच्या वारीत
आहेत त्या भावना...
मराठीच्या गोडव्यात
विठ्ठलाच्या चरणात
महाराष्ट्राच्या मातीत
आणि मराठ्यांच्या माणुसकीत
आहेत फक्त भावना...
नाहीत त्या दाखवण्यासाठी
आहे फक्त अनुभवण्यासाठी
आणि नात्यांच्या बंधनाला
घट्ट जोडण्यासाठी
आहेत फक्त आणि फक्त भावना...

– **वक्ते माधुरी संजय,** द्वितीय वर्ष (बी.कॉम)

## वडनेर भैरवचे कॉलेज म्हणजे..

गोड शब्द – वडनेर भैरव कॉलेजमधील धन दौलत आहे.
शांतता – लक्ष्मी आहे
सुव्यवस्था – शान आहे
सदाचार – सुगंध आहे
शिक्षक – परमेश्वर स्वरुप आहे
विद्यार्थी – त्या परमेश्वारची विनयपूवर्क ज्ञानार्जनासाठी भक्ती करणारा भक्त आहे.
आत्मविश्वास – कॉलेजचे देवस्थान आहे.
पैसा – कॉलेजचा पाहुणा आहे.
मदत – कॉलेजचे संस्कार आहे
अतिथी – कॉलजचे वैभव आहे
नम्रता – कॉलेजची प्रतिष्ठा आहे
सोय – कॉलेजची शोभा आहे
चारित्र्य – कॉलेजचे सुख आहे
परमेश्वराची कृपा –
अशीच वडनेर भैरवच्या कॉलेजवर राहू दे

– **वक्ते माधुरी संजय,**
द्वितीय वर्ष (बी.कॉम)

## सुंदर विचार

श्वासाला गरज असते फक्त हवेची नव्हे,
ती दिसण्याची.
जगण्याला गरज असते फक्त पाण्याची नव्हे,
त्याच्या चवीची.
प्रेमाला गरज असते त्याच्या अस्तितत्वाची नव्हे,
वारंवार भेटण्याची, ना पाहण्याची.
प्रेम असंच करायला हवं की गरजचं
उरणार नाही, तिला पुन्हा पुन्हा भेटण्याची.
ती फक्त धुंदी होऊन जावी प्रत्येक क्षण जगण्याची.

– **वाटपाडे पुजा अरुण,** द्वितीय वर्ष (बी.कॉम)

# कोण होती ती....

कॉलेजमध्ये तिची माझी पहिलीच भेट होती
पहिल्यांदाच भेटणारी ती अगदीच ग्रेट होती
माझ्या व्यक्तिमत्वाला शोभणारी वाटत होती
रोज कॉलजमध्ये पाऊल टाकताच
तिच्या भेटीची जाणीव होत होती
स्वप्नातीत तिलाच पाहण्याची ओढ होती
वास्तवात उतरवण्याची धमक होती
आयुष्याच्या धावपळीत
चुकून विसर पडला तिचा तर
तिला गमावण्याची भिती वाटत होती
अरे मित्रांनो, कोण होती ती ?
ती तर माझ्या करियरची सुरुवात होती.

**– वक्ते माधुरी संजय,**
द्वितीय वर्ष (बी.कॉम)

## विनोद

एकमेकांची जिरवण्या पेक्षा जर
पावसाचे पाणी जिरवले असते तर
कदाचित दुष्काळाने आज
आपली जिरवली नसती...!
**– आवारे राणी नामदेव,** तृतीय वर्ष (बी.ए.)

# शेतकरी



ज्या मातीने लळा लाविला
तिच्याचसाठी सोसतो झळा...
उन्हाचे दिस संपून जाती
पुढ्यात झरकन पाणकळा...!
मी मातीचा गुलाम नाही
सेवक म्हणुनी राबतसे,
कष्टाच्या थेंबातूनी तिची
पुण्य कूस उगवितेस...।
स्वप्न फुलवून ढेकळात
कोंब रुजावे हिरवेगार...
बीज पेरतो समृध्दीचे
कष्टच व्हावे हद्दपार...
कुणीही वंदा, करा निंदाही
हिरवाईचा आहे धंदा...
मेढ झाकूनी चाडे धरतो
शेतकरी मी खरा खंदा...!
मोल मिळावे याचे मजला
असेल जगती कोणी वाली...
भरपाईच्या भाकड गप्पा
फिरती सारे चोर मवाली...!

**– चौरे अमृता रमेश,**
द्वितीय वर्ष (बी.कॉम.)

# चारोळी

प्रेम म्हणजे जन्मोजन्माचे अतूट नाते,
जे मुक्या भावनांच्या शब्दांत जगत राहते...
प्रेम म्हणजे जणू थंडीतला बेधुंद गार वारा,
प्रेमाचा स्पर्श होताच अंगावर येणारा शहारा...
**– वाटपाडे पुजा अरुण,** द्वितीय वर्ष (बी.कॉम)



Scanned with CamScanner

## माझा बाप



आईचं गुणगान खूप झालं,
पण बिचाऱ्या बापानं काय केलं.
बिकट प्रसंग बापच सदा सोडवी,
आपण फक्त गातो आईचीच गोडवी.
आईकडे असतील अश्रूंचे पाट,
तर बाप म्हणजे संयमाचा घाट.
आठवते जेवण करणारी प्रेमळ आई,
त्या शिदोरीची सोय ही बापच पाही.
देवकी-यशोदेचे प्रेम मनात साठवा,
टोपलीतून बाळास नेणारा वासुदेवही आठवा.
रामासाठी कौशल्येची झाली असेल कसरत,
पुत्र वियोगाने मरण पावला बाप दशरथ.
काटकसर करुन मुलास देतो पॉकेटमनी,
आपण मात्र वापरी शर्ट-पॅन्ट जुनी.
मुलीला हवी ब्युटीपार्लर नवी साडी,
घरी बाप आटपतो बिन साबणाची दाढी.
वयात आल्यावर मुले आपल्याच विश्वात मग्न,
बापाला दिसे मुलांचे शिक्षण, पोरीचे लग्न.
मुलाच्या नोकरीसाठी जिना चढून लागते धाप,
आठवा मुलीच्या स्थळांसाठी उंबरठे झिजवारा बाप.
जीवनभर मुलांच्या पाठी बापाच्या सदिच्छा,
त्यांनी समजून घ्यावं हीच माफक इच्छा.

**- सातभाई भारती अशोक,**
द्वितीय वर्ष, (बी.कॉम.)

## लेक



लेक तांबड कुंदन, लेक हिरव गोंदण...
लेक झाडाची पालवी, लेक हाडाच चंदन...
लेक असता मनाची, सारी काळजी मिटते...
लेक असता घराची रोज समई पेटते...
लेक नसता घरास, भास लागते उरास...
वेळ जागीच थांबते, आणि मनही उदास...
अशी चिमणी बोलकी, साऱ्या घरात हसते...
थोड रागावले तर मग रुसून बसते...
सारे जगही तरी पर्वा करु नये...
पण आपली पाकळी, कधी कधी रुसू नये...
फक्त लेकीला कळते, अरे निसर्गाची भाषा...
काळ्या रात्रीला लागते कशी सकाळची आशा...

**- चौरे अमृता रमेश,**
द्वितीय वर्ष (बी.कॉम.)

## चारोळी

मिठीत तुझिया विरघळले...
गहिवरले हे मेघ..
चिंब भिजणाऱ्या सरींना आवरी
तुझिया प्रितीची रेघ ॥

**- वाटपाडे पुजा अरुण,** द्वितीय वर्ष (बी.कॉम)



Scanned with CamScanner



# साद आईची

महिनेमागून महिने
शेवटी वर्ष सरून जाते,
वृध्दाश्रमाच्या पायरीवर
वाट तुझी पाहते...
भिजून जातो पदर
आणि मन रिते राहाते.
कधी मधी मात्र तुझी मनीऑर्डर येते...
पैसे नको यावेळी
बाळा, मला तुझ्या घरी घेऊन जा...
तुझा बा होता तोवर
काळ बरा गेला
तुझी आठवण काढत
उघड्या डोळ्यांनी गेला...
शेवटपर्यंत सांगत होता
लेक माझा भला
तू मोठा साहेब
त्याचं कौतुक त्याला...
माझ्याही हृदयात फोटो
तुझा तू पाहून जा
बाळा मला तुझ्या
घरी घेऊन जा...

वर्षाकाठी एक कपडा
पुरवून पुरवून घातला
सालं घातली बापानं
पण तुला शाळेमधी घातला.
हवं तर तु हे
सगळे विसरुन जा
पण बाळा तुझ्या घरी घेऊन जा...
धुणी भांडी करीन मी
केरकचरा भरीन मी
पुरणपोळ्या, अळुवड्या,
तुझ्यासाठी रांधीन मी.
नातवंडाचं दुखलं-खुपलं,
सगळ बघेन मी.
घाबरु नकोस त्यांची आजी
असं सांगणार नाही मी
तुझ्या घरची कामवाली
म्हणून घेऊन जा....
थकले रे डोळे बाळा प्राण कंठी आले
तुझ्याविना जगणे
आता मुश्किल झाले...
विसरु कशी तुला मी
तुझ्यामुळे 'आई' झाले
बाळ माझं 'कुलभूषण'
पोरकी मी का झाले... ?
आता माझ्या थडग्यापाशी
'आई' म्हणून जा. जमलंच तुला तर
हा वृध्दाश्रम पाडून जा... !

- सलादे सोनाली शिवाजी,
तृतीय वर्ष (बी.ए.)



Scanned with CamScanner

# मला पुन्हा एकदा तरी शाळेत जायचंय..

मला पुन्हा एकदा तरी शाळेत जायचंय.
धावत जाऊन माझ्या रोजच्या बाकावर बसायचंय.
रोज सकाळी मोठ्या आवाजात राष्ट्रगीत म्हणायचंय.
नव्या वहीचा वास घेत पहिल्या पानावर छान
अक्षरात आपलं नाव लिहायचंय.
मला पुन्हा एकदा तरी शाळेत जायचंय.
मधली सुट्टी होताच वॉटरबॅग सोडून नळाखाली हात
धरुन पाणी प्यायचंय.
कसा बसा डब्बा संपवत, तिखट मिठ लावलेल्या
चिंचा, पेरु, काकडी, बोर खायचंय.
सायकलच्या चकरा मारायच्या आहेत.
मला पुन्हा एकदा शाळेत जायचंय,
उद्या पाऊस पडून शाळेत सुट्टी मिळेल का ?
हा विचार करत रात्री जोपी जायचंय,
अनपेक्षित मिळणाऱ्या सुट्टीच्या आनंदासाठी
मला पुन्हा एकदा शाळेत जायचंय.
बेल व्हायच्या आत.
मैत्रिणींशी गप्पा मारत वर्गात बसायचंय.
बेल होताच मैत्रिणींशी सायकलची रेस लावून
घरी पोहचायचंय.
मला पुन्हा एकदा शाळेत जायचयं.
कितीही जड असू दे वातानुकूलित ऑफीस पेक्षा
पंखा नसलेल्या वर्गात खिडक्या उघडून बसायचंय.
कितीही अवघडल्यासारखे असू दे ऑफीसमधल्या
एकट्या खुर्चीपेक्षा दोघांच्या बाकावर तिघी मैत्रिणींना
बसायचंय म्हणून सांगते,
मला पुन्हा एकदा तरी शाळेत जायचंय.

– **हिंगे आदिती सतिश,** द्वितीय वर्ष (बी.कॉम.)

# बाप

आईच हृदय ममतेचा, वाहता पाट असतो.
बापाच्या पाठीचा कणा, मात्र कधीही ताठ नसतो.
आयुष्यभर बापाच्या, पाठीला बाक असतो.
जगण्याच्या गाडीचं, तो नकळत चाक असतो.
सासरी जाताना मुलीच्या, डोळ्यात अश्रूंचा पाट
असतो.
तेव्हा तरी कुठे बापाचा कणा ताठ असतो ?
बाप ताटातलं मीठ असतो.
थंडगार पाण्याचा माठ असतो.
व्यवहार कार्याचा परिपाठ असतो.
सुखी आयुष्याची वाट असतो.
त्याच्या कष्टाला कधी काठ नसतो.
आपला 'बाळ' बाप झाल्यावर.
आनंदासोबत त्याला थोडं दु:ख सुध्दा होतं.
आपल्या पाठीवरचा 'बाक'.
नव्या बापाकडे देऊन नंतर अचानक कधीतरी.
जो जगाच्या 'बापाकडं' निघुन जातो.. ?

**– सातभाई भारती अशोक,**
द्वितीय वर्ष, (बी.कॉम.)

## सुंदर विचार

खूप काही अपेक्षा करावी आणि सत्यता काहीतरी वेगळीच असावी, असे प्रसंग प्रत्येकाच्या आयुष्यात येतात. कोणतीही अपेक्षा न करता मिळणारी गोष्ट जे सुख देऊन जाते. त्याला तोड नसते. कारण मुद्दाम लावलेल्या एअरकंडीशनपेक्षा अचानक अंगावरुन गेलेली गार वाऱ्याची झुळूक जास्त सुख देऊन जाते.

**– वाटपाडे पुजा अरुण,**
द्वितीय वर्ष (बी.कॉम)



Scanned with CamScanner

## बाबा



आई, ताई, दादा यांच्या पुढेही एक अतुट नातं असत.
त्या नात्याचं नाव असतं... बाबा !
हाताचे बोट धरुन चालायला शिकवणारे
कामावरुन येतांना दररोज खाऊ घेऊन येणारे
पाठ दुखत नाही तरी आपल्या मुलाला घोडा बनून खेळवणारे
आजारी पडल्यावर काळजीपोटी उशाशी बसणारे
आपल्याला हसवणारे आणि खेळवणारे
आईने कधी मारले तर तिच्यावर रागावणारे
आपली मुले खूप मोठी व्हावीत म्हणून झटणारे
आपल्या लेकरांसाठी उंच उंच अपेक्षा बाळगणारे
वाईट वागल्यावर खूप ओरडणारे
छोटी चूक झाल्यास ती पोटात घालून घेणारे
चांगले काम केल्यावर तोंड भरुन कौतकू करणारे
परीक्षेत कमी गुण मिळाल्यावर तेवढेच रागावणारे
सर्वांवर प्रेम करणारे व सर्वांना समजून घेणारे
कधी वेळ आलीच तर पाठीशी खंबीरपणे उभे राहणारे
बालपणापासून खाल्ल्या त्यांनी परिस्थितीमुळे खस्ता
कितीही संकटे आली तरी गाठला उज्वल यशाचा रस्ता
आजपर्यंत आपल्या प्रेमळ वागण्याने किती मोठे कर्ज दिले आम्हास मायेचे
कसे ऋण फेडू माझ्या जन्मदात्याचे...!

**– सातभाई भारती अशोक,**
द्वितीय वर्ष, (बी.कॉम.)

## मर्द मराठा



अंधारावर राज्य करणाऱ्या चंद्राच्याही डोळ्यात
खूपतो आम्ही कारण...
उशाला तलवारी घेऊन झोपतो आम्ही,
मुंडके उडवले तरी चालेल पण....
मान कोणापुढे वाकणार नाही.
डोळे काढले तरी चालेल पण....
नजर कोणापुढे झुकणार नाही.
जीभ कापली तरी चालेल पण...
प्राणाची भीक मागणार नाही.
हात कापले तरी चालेल पण...
हात कोणापुढे जोडणार नाही.
पाय तोडले तरी चालेल पण...
आधार कोणाचा घेणार नाही.
गर्व नाही ! माज आहे या मातीचा.
मर्द मराठा म्हणतात या जातीला...
मरण आले तरी चालेल, पण शरण जाणार नाही.
जंगलातील एक नंबर लाकडाला साग म्हणतात.
सापातील विषारी जातीला नाग म्हणतात.
ज्यांनी लावली मुगलांची वाट,
त्यांना जिजाऊंचा वाघ म्हणतात.
जय भवानी ! जय शिवाजी !! हर हर महादेव!!!

**– हिंगे आदिती सतिश,**
द्वितीय वर्ष (बी.कॉम.)



Scanned with CamScanner

## जीवन

जीवन काय आहे ?
एक न उलगडणारे कोडं.
जीवन एक गीत आहे.
जीवन संगीत आहे.
खरंतर जीवन एक प्रीत आहे.
ह्या जीवनावर मनापासून प्रेम करावं,
हिच खरी जगण्याची रित आहे.
खरोखर जीवन काय आहे ?
जीवन कुठेतरी त्रस्त आहे.
कुठे कुठे मदमस्त आहे.
कुठेतरी मात्र अस्वस्थ आहे.
खरंच जीवन काय आहे ?
जय-पराजय, राग-लोभ, मान-अपमान
ह्या सारख्या भावनांचा जीवन म्हणजे खेळ आहे
कोणी म्हणतात जीवन आपलचं भक्षक आहे.
मला वाटत जीवन आपला शिक्षक आहे.

**- हिंगे आदिती सतिश,**
द्वितीय वर्ष (बी.कॉम.)

## चारोळी

परक्यांनाही आपलसं करतील
असे काही गोड शब्द असतात....
शब्दांनाही कोडं पडावं
अशी गोड माणसं असतात....
किती गोड भाग्य असतं
जेव्हा ती आपली असतात...

**- कु. शेळके सोनाली संपत,**
तृतीय वर्ष (बी.ए.)

## विश्वातील सर्वश्रेष्ठ

विश्वातील सर्वात सुंदर निर्मिती - माता
विश्वातील सर्वश्रेष्ठ फुल - कापूस
विश्वातील सर्वश्रेष्ठ सुगंध - पावसाने भिजलेली माती
विश्वातील सर्वश्रेष्ठ गोडवा - वाणीचा
विश्वातील सर्वश्रेष्ठ काळे - कलंक
विश्वातील सर्वात वजनदार - पाप
विश्वातील सर्वात स्वस्त - सल्ला
विश्वातील सर्वात महाग - सहयोग
विश्वातील सर्वात कडू - सत्य

**- तिडके शितल बाळासाहेब,**
द्वितीय वर्ष (बी.कॉम.)

## चारोळी

माणूस जेव्हा जन्माला येतो तेव्हा त्याचे नाव नसते, पण श्वास असतो. आणि ज्यावेळी तो मरतो तेव्हा फक्त नाव असते पण श्वास नसतो.
नाव आणि श्वासातील अंतर म्हणजेच आयुष्य...

---

आपल्या सावलीपासून आपणच शिकावे
कधी लहान तर कधी मोठे होऊन जगावे
शेवटी काय घेऊन जाणार आहोत सोबत
म्हणून प्रत्येक नात्याला हृदयपासून जपावे

**- तिडके शितल बाळासाहेब,**
द्वितीय वर्ष (बी.कॉम.)



Scanned with CamScanner



## शिवाजी महाराजांचा पोवाडा

चौक–१

कुळवाडी–भूषण पवाडा गातो
भोसल्याचा । छत्रपती शिवाजीचा ॥धृ.॥
लंगोट्यास देई जानवी पोशिंदा
कुणब्याचा । काल तो असे यवनांचा ॥
शिवाजीचा पिता शहाजी पुत्र मालोजींचा ।
असे तो डौल जहागिरीचा ॥
पंधराशे एकूणपन्नास साल कळले ।
जुन्नर ते उदयासी आले ॥
शिवनेरी किल्ल्यामध्ये बाळ शिवाजी जन्मले ।
जिजाबाईस रत्न सापडले ॥
हातापायांची नखं बोटं शुभ्र प्याजी रंगीले।
ज्यांनी कमळा लाजविले ॥
वरखाली टिरया पोटऱ्या गाठी गोळे बांधले।
स्फटिकापरी भोसले ॥
सान कटी सिंहापरी छाती मांस दुनावले।
नाव शिवाजी भोसले ॥
राजहौसी उंच मान माघे मांदे दोंदिले ।
जसा का फणीवर डोले ॥
एकसारखे शुभ्र दंत चमकू लागले ।
मोती लडी गुंतविले ॥
रक्तवर्ण नाजूक होटी हासू छपविले ।
म्हणोन बोबडे बोले ॥
सरळ नीट नाक विशाल डोळे शोभले ।
विषादे मृग वनी गेले ॥
नेत्र तीखे बाणी भवया कमठे ताणीले ।
ज्यांनी चंद्रा घटिवले ॥
सुंदर विशाल भाळवटी जावळ लोंबले ।
कुरळे केस मोघीले ॥
आजानबाहू पायांपेक्षा हात लांबवलेले ।
चिन्ह गादिचे दिसले ॥
जडावाची कडी तोडे सर्व अलंकार केले ।
धाकट्या बाळा लेविवले ॥
किनखाली टंकोचे मोती घोसाने जडले ।
कलाबतुचे गोंडे शोभले ॥
लहान कुंची पैरण, बिरडी बंद लावले ।
डाग त्याळीचे पडलेले ॥
हातापयांचे आंगठे, चोखी मुखामधी रोळे ।
पायी घुंगरु खुळखुळे ॥
मारी पाठोपाठ लाथाबुक्या आकाशा शोभले ।
खेळण्यावर डोळे फिरविले ॥
मजवर हा कसा खेळणा नाही आवडले ।
चिन्ह पाळणी दिसले ॥
टाहीपेटे रडू लागला सर्व घाबरले ।
पाळण्या हलवू लागले ॥
धन्य जिजाबाई जिनें जो जो जो जो जो केले ।
गातों गीत तिने केले ॥
जो जो जो जो जो जो गाऊ जी ।
जी जी जी जीजी गाऊं ॥
चला वेरुळास जाऊ,
दौलताबाद पाहू ॥



Scanned with CamScanner

मुळ बाबाजीस ध्याऊं, कीर्ति आनंदाने गाऊ ।
सरदरांत अमराऊ, सोबतीस जाधवराऊ ॥
पाटील होते गावोगाऊ, पुत्रावरी अती जीऊ।
थोर विठोजी नांव घेऊ, सान मोलाजी त्यांचा भाऊ ।
दीपाबाई त्यास देऊ, धंदाजोगा गिती गाऊ ।
मालोजी राजा । तुझा बा आजा ॥
यवनी काजा । पाळिल्या फौजा ॥
लाविल्या ध्वजा । मारिल्या मौजा ॥
वेळेस मुक्क । साधला बुक्का ॥
विचारी पक्का । जाधवा धक्का ॥
शेशाप्पा नायका । ठेविचा पैका ॥
द्रव्याची गर्दी । चांभारगोंदी ॥
देवळे बांधी । तळीं ती खांदी ॥
आगळी बुध्दि । गुणाने निधी ॥
लिहिले विधि । लोकांस बोधी ॥
संधान साधी । जसा पारधी ॥
भविषी भला । कळले त्याला ॥
सांगोनी गेला । गादी बा तुला ॥
उपाय नाहीं जाणोन चाकर
झाला यवनाचा । शिपाई होता बाणीचा ॥
खोट्या दैवा कोण खोडी बेल देवाजीचा ।
पवाडा गातो शिवाजीचा ॥
कुळवाडी-भूषण पवाडा गातो
भोसल्याचा । छत्रपती शिवाजीचा ॥

**- थोरमिसे स्वाती अशोक,**
द्वितीय वर्ष (बी.ए.)

## विनोद

तंबाखूवर कितीही मोठ्या अक्षरात डेंजर लिहा
काहीही उपयोग नाही
कारण भारतात सगळे खतरों के खिलाडी आहेत.
**- आवारे राणी नामदेव,** तृतीय वर्ष (बी.ए.)

## मैत्री

आनंदाच्या हिंदोळ्यावर झुलतांना
हालकसा झोका देते,
ती म्हणजे मैत्री...
दु:खाचा डोंगर चढतांना
आधाराची काठी होते,
ती म्हणजे मैत्री...
यशाच्या धुंदीत उडतांना
जमिनीची जाण देते,
ती म्हणजे मैत्री...
अपयशाने खचतांना
मदतीचा हात देते,ती म्हणजे मैत्री...
चुकलेल्या पाऊलांना
हमरस्त्याची दिशा देते,
ती म्हणजे मैत्री...
अहंकाराने फुलतांना वास्तवाचे
भान देते,ती म्हणजे मैत्री...
वाटेवर चुकीच्या जातांना
हक्काने कान पिळते, ती म्हणजे मैत्री...
निराशेच्या अंधाराला
आशेचा किरण होते,
ती म्हणजे मैत्री...
जगण्याची स्फूर्ती देणारी,
हीच तर खरी जीवलग मैत्री...
कधी भांडणाची साथ
कधी मैत्रीचा हात तर,
कधी प्रेमाची बात, अशी असते
निस्वार्थ मैत्रीची जात...

**- धनाईत अंकिता भिकाजी,**
द्वितीय वर्ष (बी.ए.)



Scanned with CamScanner

## मैत्री

'वेली असतात वृक्षासाठी, वृक्ष असते पाखरांसाठी
मैत्री असते मायेची, सुख-दुःख जगण्यासाठी'

कोणतीही गोष्ट सेहतुक असते. पण मैत्रीचे नाते हे अगदी निर्हेतुक, निरागस जुळून आलेले असते. कोणत्याही प्रकारचा स्वार्थ न बाळगता निःस्वार्थ भावनेने केलेल्या प्रेमाचे नाते म्हणजे 'मैत्री'.

खरा मित्र हा सूर्यासारखा सदैव आपल्या पाठीशी असतो. त्याच्या मैत्रीचा तेजामुळे आपले आयुष्य उजळून निघते. चुका झाल्यात तो झाकून न देता त्यावर प्रकाश टाकून आपल्याला सरळ मार्गावर आणतो व काही चांगली कामगिरी केली तर त्याचे मन आनंदाने फुलून येते. आणि त्याच्या थपथपणाऱ्या हातामुळे आपल्यामध्ये स्फूर्ती, आत्मविश्वास, चैतन्य निर्माण हाते.

मैत्रीचं नाते खूप वेगळे असते.
नुसते सहवासाने खूप काही देते
हक्कानं काही मागून घेते
चुकांबद्दल रडते, पश्चातापानंतर समजते.
कधी-कधी भांडते, तर कधी कधी हसते
इंद्रधनुष्याच्या रंगाचं वेगवेगळ्या भावनेचे
असं हे मैत्रीचं नात असते.
सर्वांनाच समजत नसते.

मैत्रीत आईचे वात्सल्य असते. वडिलांच्या मार्गदर्शनाचा हातही असतो की, त्यात प्रेरणा असते. बहिणीची माया असते. भावाच्या अनुभवाचा मोठेपणा असतो. याशिवाय प्रियकर प्रेयसीची प्रीत असते. माधुर्य असते, शंका-कुशंका, सुख-दुःख, रुसणे, विनवणे .सर्वच असते या मैत्रीत शेवटी.

'मैत्री म्हणजे हसणे, मत्री म्हणजे रुसणे
एकमेकांच्या काळजात घर असणे'

**- विशाल जंगम,**
तृतीय वर्ष (बी.ए.)

## शब्द

बोलताना जरा जपून बोलावं,
कधी कधी शब्दांचाही अर्थ बदलतो.
चालताना जरा जपून चालावे,
कधी कधी मार्ग सुध्दा धोका देतात.
ओळखताना जरा जपून ओळखावे,
कधी कधी ओळखही रंग बदलते.
पाऊल टकताना जरा जपून टाकावे,
सुंदर फुले ही काटे बनतात.
वाचताना जरा जपून वाचावे,
कधी कधी वाक्य ही मनात घर करतात.
विश्वास टाकताना जरा जपून टाकावा,
कधी कधी आपलेच आपल्याला धोका देतात.

**- तिडके शितल बाळासाहेब,**
द्वितीय वर्ष (बी.कॉम.)

## चारोळी

त्या किनाऱ्यावर पोहोचलीस की, मला विसरुन जाणार तू, मी कितीही तुला पुकारले तरी परत इकडे नाही येणार तू, सुखा समाधानाने जगताना मला कायमची विसणार तू, आपल्या नात्यातली ही दरी कशाने मग भरणार तू.. सांग ना...

**- वाटपाडे पुजा अरुण,**
द्वितीय वर्ष (बी.कॉम)



Scanned with CamScanner

## Life A to Z

A : Avoid negative source, people, places, things & habits
B : Belive in yourself
C : Consider things from every angle
D : Don't give up & don't give in
E : Enjoy life today, yesterday in gone tomorrow may never come.
F : Family & friends are hidden treasures enjoy their richer.
G : Give more than planned to
H : Hung an your dreams
I : Ignore those who try to discourage you.
J : Just do it.
K : Keep trying on matter how hard it seems, it will get easier.
L : Love yourself first & must
M : Make it happen
N : Never lie, cheat or steal always strike a fair deal
O : Open your eyes & see things as reduce are
P : Practice makes perfect
Q : Qualities never urn winner never quite
R : Ready study & learn about everything important in life
S : Straight forward
T : Take a control of your own density
U : Understand yourself in order to better understand other.
V : Visualize it
W : Want it more than anything
X : Excle your efforts
Y : You are uniqe of all gods creation nothing can, replace you.
Z : Zero in an your target & go for it.

Vakte Madhuri Sanjay (S.Y.B.Com)

## Life

Life is full of pain, which we cannot explain
LIfe is full of pleasure, which we cannot measure
LIfe is a stage of actors, Time is one of the big fuctors
Life is full of poetry, Having a lot of fun
Life is full of truth & lies, which we change
Life is just like a game, listen to bravo or shame
Life is full of flowers & thorns
Sometimes happiness, sometimes mourn
Vakte Madhuri Sanjay (S.Y.B.Com)



Scanned with CamScanner

# "Wisdom can alot be dought is if only cought"

Science has changed the face of human being. If anyone asks me about by science. I dare say A great miracle given by good in annient days. What did man have ? No match to light the fire, no electricity to cast the darkness, no food to eat, no clothes to wear, and no school to education. Today what does he have not ? It is the gift of only science is the sight of man and it is be world of man.

Many gifts are given to us by science to make our home. Life more comfortable the full of plesure. The evolution of science has completely changed the life of human being in the field of medicine. We find the greater change is the field of travelling. Computer is the greatest gifts of science. So many was of sciecne might be told.

Thought is the useful to human being too much, it is harmful also and the problem of unemployment has glood in the front of us. Of us due to the creation of computer industritisations has become the question of ir polltion, noise pollution is curses of science too. chemical fertility of our soil, the destrutction of Hirashima and nagesaki can't be forgotten the atom bomb is the creation of science also.

Thogh science has two sides just like the coin. We should try to use the right side for the uplift and welfare of mankind. It will be give the new hight, new sight and new dream to us. Everyone is born to bloom and blassom "Birth is start of life, Dead is end of life, Love is part of life, Education is heart of life."

Education is very important in our life. Education is life, but life is not education. Education is one of the thing in our life. Without education life is the like tea without sugar.

Education makes impression to whold people because of eduation most us practice makes man perfect. No education, no life and know education, know life, Education given to turn off our life.

Education knowledge is powerl; gain it.
Music is an art; Learn it.
Sorrow is a part of life; Accept it
Happiness comes from other cheer; Risk it
Friendship is a man made relationship;
Preserve it
Nature is unknow teacher; Admire it
Life is a beautiful gift of god,
Appreciate and enjoy it.

- Salunke Gayatri Bajiroo, S.Y. B.Com.



Scanned with CamScanner

**Daddy....**

You were the man who loved me first
The one who sat me on your knee
You kissed my cuts & gave me hugs
And built that house up in the tree
Even when you scolded me
You let me know your love
You told me all i need to know
About the stars above
Thank you dad for all you did
Ad for loving me
You showed me just how special
A father love can be
Satbhai Bharti Ashok, (S.Y. B.Com)

**....Until We Meet Again**

Those special memories of you
will always bring a smile
if only i could have you back
for just a little while
Than we could sit & talk again
just like we used to do
you always ment so very much
and always will do too
The fact that your no longer here
will always cause me pain
but your forever in my heart
Until we meet again.

Satbhai Bharti Ashok, S.Y. (B.Com.)

**Life is Accountancy**

Life is Accountancy
What comes is may debit
What goes is my credit
My birth is my opening stock
My ideas are my Assets
My view are my liabilities
Happiness is my profit
Sorrow is my loss
Heart is my fixed Asset
Soul is my Goodwill
Duties are my outstanding expenses
Working is my prepaid expenses
Friendship is my prepaid expenses
Friendship is my Hidden Adjustment
character is my capital Bad things
I always Deprecidated Good things
I always appriciated
Knowledge is my Investmenst
Platience is my Interest
My mind is my Balance
Thinking is my Current Account
Behaviour is my Journal Entry
Aim is my Tally Balance Sheet
Death is my clossing Balance Sheet

**Tidake Shital Balasaheb,**(S.Y. B.Com)



Scanned with CamScanner

# * मराठी विभाग *

**प्रा. सोमनाथ दत्तात्रेय फुगट**

(एम.ए.बी.एड.सेट)

मराठी विभाग प्रमुख – अध्यापन अनुभव – ७ वर्षे

– चर्चासत्र सहभाग – राष्ट्रीय – ५,

राज्यस्तरी – ७

– सांस्कृतिक कला मंडळ प्रमुख

– बहि:शाल शिक्षण मंडळ प्रमुख

सा. फुले पुणे विद्यापीठ व बहि:शाल शिक्षण मंडळ या उपक्रमांतर्गत डॉ बाबासाहेब जयकर व्याख्यानमाला व यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला याद्वारा विद्यापीठाने नियुक्त केलेल्या तज्ञ वक्ते (व्याख्याते) विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात.

**प्रा. एस.एन. राठोड**

(एम.ए. नेट)

अध्यापन अनुभव – ५ वर्ष

चर्चासत्र – आंतरराष्ट्रीय – १

राष्ट्रीय – ६, राज्यस्तरीय – ३

शोधनिबंध – ७, प्रकाशित पुस्तके – २

'मराठी' हा विषय महाविद्यालयाच्या स्थापनेपासून विशेषस्तरावर शिकविला जातो. कला शाखेतील ३० विद्यार्थी मराठी हा विषय विशेषस्तरावर घेवून पदवीचे शिक्षण घेत आहेत.

वाणिज्य शाखेत 'प्रथम वर्ष वाणिज्य' या वर्गासाठी 'व्यवहारिक व उपयोजित मराठी' या अनिवार्य विषयाद्वारे विद्यार्थी मराठी भाषेचे अध्ययन करत आहेत.

मराठी विभागांतर्गत 'मराठी वाङ्:मय मंडळ उद्घाटन प्रख्यात साहित्यिकाच्या हस्ते करुन वर्षभर विद्यार्थ्यांच्या साहित्य गुणांची जोपासना करण्यासाठी भित्तीपत्रके, निबंध, वक्तृत्व स्पर्धा, काव्य वाचन स्पर्धा यांचे आयोजन केले जाते.

कविवर्य कुसूमाग्रज यांचा जन्मदिन दि. २७ फेब्रुवारी 'मराठी दिन' म्हणून मराठी विभागाच्या वतीने उत्साहात साजरा केला जातो.

विविध महाविद्यालय, जिल्हा, राज्य स्तरांवरील निबंध व वक्तृत्व स्पर्धांत मराठी विभागातील विद्यार्थी सक्रिय सहभाग नोंदवतात.

----***----



Scanned with CamScanner

# The Department of English

Prof. K. L. Shinde
M.A.B.Ed., Set

Research - 16 research papers are published.

3 Research papers published in International Journals. Participated and presented papers in 13 seminars.

1) Remedial course have been organising for slow learners or poor students in English.

2) Under the Special guidance lecture scheme some lectures were arranged on English Speaking. The Personality Development and Interview skills.

3) Optional English subject has been starting for F.Y.B.A. This subject has started for the purpose to develope English Competence among rural students. The knowledge of English language and communication skill is the need of present hour.

4) The Department had organised the series of 'E - Learning' Lectures under 'The soft skill Development Programme' to enhance English knowledge of Students.

----***----



Scanned with CamScanner

# * अर्थशास्त्र विभाग *

प्रा. डॉ. डी. डी. गव्हाणे
(विभागप्रमुख व सहा. प्राध्यापक)
M.A., NET, SET, Ph.D
आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व राज्यस्तरीय चर्चासत्रात शोधनिबंधाचे वाचन, १६ शोधनिबंध. विविध नियतकालिकांत प्रकाशित ''महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या आर्थिक व सामाजिक परिणामांचा अभ्यास'' (नाशिक जिल्ह्याचा विशेष अभ्यास) पुणे विद्यापीठात पी.एचडी.

प्रा. एम. एम. भोसले
(सहा. प्राध्यापक)
M.A., B.Ed.
राज्यस्तरीय चर्चासत्रात शोधनिबंधाचे वाचन

महाविद्यालयाच्या स्थापनेपासून अर्थशास्त्र हा विषय विशेषस्तरावर शिकविला जातो. कला शाखेतील ३० विद्यार्थी अर्थशास्त्राचा विशेषस्तरावर अभ्यास करीत आहे. वाणिज्य विभागासाठी अर्थशास्त्र हा विषय अनिवार्य असल्याने सर्वच विद्यार्थी अर्थशास्त्राचे अध्ययन करतात.

महाविद्यालयाच्या स्थापनेपासून प्रथमच अर्थशास्त्र विभागाच्या वतीने राज्यस्तरीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आलेले होते. 'ब्रेक्झीटचे भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम' या विषयावरील चर्चासत्र ३ डिसेंबर २०१६ रोजी झाले. यात ३२ संशोधकांनी आपल्या शोधनिबंधाचे वाचन केले, तर ९० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. शोधनिबंधाचे संकलन.करुन एक पुस्तक प्रकाशित करण्यात आले.

अर्थशास्त्र विभागाच्या वतीने 'इंटरनेट बँकिंग व कॅशलेश व्यवहार' या विषयावर ९ डिसेंबर २०१६ रोजी कार्यशाळेचे आयोजन करंण्यात आले. ११ जुलै २०१७ रोजी ''जागतिक लोकसंख्या दिन'' या निमित्ताने लोकसंख्येविषयक माहिती व प्रवृत्ती यांवर मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले. डॉ. पठारे यांनी या संदर्भात मार्गदर्शन केले.

१० फेब्रुवारी २०१८ रोजी " केंद्रिय अर्थसंकल्प : अर्थ व अनव्यार्थ " या विषयावर डॉ. सतिष श्रीवास्तव यांचे व्याख्यान आयोजित केले.

----***----



Scanned with CamScanner

# * भूगोल विभाग *

**प्रा. ए. एल. भगत**
एम.ए./एम.एस्सी, नेट.

- सेवेचा अनुभव ४.९ वर्षे, सहा. प्राध्यापक एम.व्ही.पी. समाज नाशिक.

- ४.३ वर्षे प्रभारी प्राचार्य, वडनेर भैरव महाविद्यालय.

- विविध राज्यस्तरीय, राष्ट्रीय चर्चासत्रात सहभाग. एक राज्यस्तरीय रिसर्च पेपर प्रकाशित.

- जी. आय. एस. व आर. एस. मध्ये २१ दिवसाचा कोर्स वर्क व ८ दिवसाचा ॲडव्हान्स सर्व्हिंग कोर्स वर्क पूर्ण.

- "Climatic variabitity and It's impact in Agriculture in Nasik and Jalgaon District of Maharashtra" या विषयावर पी.एचडी. सुरु आहे.

महाविद्यालयात भूगोल हा विषय एफ. वाय./एस.वाय/टी.वाय बी.ए. या वर्गांना सामान्य स्तरावर शिकविला जातो. एफ.वाय. बी.ए.साठी भुरुपशास्त्राची मुलत्त्वे, एस.वाय.बी.ए. साठी. 'वातावरण व सागरशास्त्र, तर टी.वाय.बी.ए.साठी 'भारताचा प्रादेशिक भूगोल' हे विषय शिकवले जातात. शिकवितांना पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन वापर केला जातो. भूगोल विभागांतर्गत 'भूगोल दिन, पर्यावरण दिन, ओझोन दिन' जागतिक लोकसंख्या दिन या सारखे कार्यक्रम घेतले जातात. भूगोल विषयामध्ये विद्यार्थ्यांची मार्क परंपरा देखील चांगली आहे. भविष्यात हा विषय स्पेशल स्तरावर शिकवण्यासाठी महाविद्यालय प्रयत्नशील असते व विद्यार्थ्यांना सर्वांगिण विकासासाठी नेहमी प्रयत्नशील असते.

----***----



Scanned with CamScanner

# ✻ राज्यशास्त्र विभाग ✻

**प्रा. भिमराज पी. गायकवाड**

सहा. प्राध्यापक

एम.ए., सेट.

- राज्यस्तरीय चर्चासत्रात सहभाग.
- अभ्यासक्रम बदलासंदर्भातील कार्यशाळेतील सहभाग.
- जिल्हास्तरीय चर्चासत्राचे आयोजन.
- महाविद्यालयीन स्तरावर 'मतदार दिन, संविधान दिन, मानवी हक्क दिन' या कार्यक्रमाचे आयोजन.

**प्रा. एम. आर. गायकवाड**

(एम.ए. बी.एड., राज्यशास्त्र व इतिहास)

वडनेर भैरव महाविद्यालयात राज्यशास्त्र विभाग प्रमुख म्हणून कार्यरत. शैक्षणिक वर्ष २०१८–१९ अंतर्गत महाविद्यालयात राज्यशास्त्रांतर्गत अनेक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. यात मतदार दिन, संविधान दिन, मानवी हक्क दिन साजरा केला जातो. वडनेरभैरव गावामध्ये विद्यार्थ्यांची रॅली काढून मतदारांमध्ये जनजागृती घडविण्याचे काम करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. ए. एल. भगत यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यशास्त्र विभागाने या सर्व कार्यक्रमाचे आयोजन केले.

----✻✻✻----



Scanned with CamScanner

# * वाणिज्य विभाग *

## प्रा. एन. डी. वडघुले

एम. कॉम, नेट, सेट

सहाय्यक प्राध्यापक, वाणिज्य विभाग प्रमुख

विद्यार्थी कल्याण अधिकारी (एस.डब्लु.ओ.)

– राष्ट्रीय तसेच राज्यस्तरीय चर्चासत्रात सहभाग व शोधनिबंध सादर.

सहभाग – २ राष्ट्रीय, शोधनिंबध सादर = ३ राज्यस्तरीय

## प्रा. एम. आर. धेबडे

एम.कॉम., बी.एड., सेट

सहाय्यक प्राध्यापक

– राष्ट्रीय तसेच राज्यस्तरीय चर्चासत्रात सहभाग

सहभाग – ४ राज्यस्तरीय, २ राष्ट्रीय,

शोधनिबंध –२ राज्यस्तरीय

– मतदार नोंदणी अधिकारी

## प्रा. डी. एच. भगुरे

एम.कॉम, नेट, सेट, जी.डी.सी.ॲण्ड ए.

सहाय्यक प्राध्यापक

- राष्ट्रीय तसेच राज्यस्तरीय चर्चासत्रात सहभाग
  शोधनिबंध वाचन (सहभाग – १० राज्यस्तरीय, ६ राष्ट्रीय, शोधनिबंध – ९, राज्यस्तरीय, ६ राष्ट्रीय)
- शिवजयंती तसेच विविध उत्सवप्रसंगी विविध गावात सामाजिक विषयांवर व्याख्याने.
- महाविद्यालयात 'वाणिज्य मंडळ' अंतर्गत विविध व्याख्यानांचे आयोजन.
- औद्योगिक सहलींचे आयोजन.
- महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत कार्यक्रंम अधिकारी.

## OTHER

**Industrial Visit :-**

1) Commerce Association

We have an active sell named as commerce association which organizes various usefull programs relating to commercial education. Marketing research & economical development of society.



Scanned with CamScanner

# * मानसशास्त्र विभाग *

**प्रा. सारिका रावसाहेब दौंड**
(एम.ए.बी.एड. सेट)
मानसशास्त्र विभाग प्रमुख
अध्यापन अनुभव - ६ वर्षे
चर्चासत्र सहभाग -
आंतराष्ट्रीय १, राष्ट्रीय -२, राज्यस्तरीय - ३.
गांधी विचारी परिक्षा समन्वयक
सामाजिकशास्त्र मंडळ प्रमुख
समुपदेशक व मार्गदर्शक समिती प्रमुख

मानसशास्त्र विभागामार्फत विद्यार्थी समुपदेशन व मागदर्शन केले जाते. वेळोवेळी अनेक प्रख्यात समुप्रदेशकांमार्फत विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन केले जाते.

'मानसशास्त्र' विषय सामान्यस्तरावर शिकविला जात असून महाविद्यालयीन कला शाखेतील १४० विद्यार्थी हा विषय घेवून पदवी शिक्षण घेत आहे.



Scanned with CamScanner

# * जिमखाना विभाग *

**प्रा. डॉ. सारिका जगताप**
शारीरिक शिक्षण संचालक
बी.कॉम., बी.पी.एड., एम.पी.एडी, सेट, पी.एच.डी.

– चर्चासत्र –
आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व राज्यस्तरीय चर्चासत्रात सहभाग.
शोधनिबंधाचे वाचन – ७ शोधनिबंधक प्रकाशित.

मविप्र मॅरेथॉन स्पर्धेत विद्यार्थ्यांचा सहभाग (मुले/मुली) आंतरवर्गीय
खो–खो (मुली) क्रिकेट व मैदानी स्पर्धेचे आयोजन.

विविध आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत विद्यार्थ्यांचा सहभाग. योगा, मैदानी स्पर्धा, क्रिकेट.

**विशेष प्राविण्य :-**

* मविप्र आयोजित राज्यस्तरीय व आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन २०१९ स्पर्धेत कु. राहुल टेकनर (प्रथम वर्ष – बी.ए.) या विद्यार्थ्याने वरिष्ट गट मुले (१२ कि. मी.) या गटात ५ वा क्रमांक प्राप्त केला.
* आंतर विभागीय कबड्डी स्पर्धेत कु. स्वाती जाधव या विद्यार्थीनीने नाशिक जिल्हा संघात सहभाग घेतल

**स्पर्धा आयोजन :-**

* आंतर महाविद्यालयीन कबड्डी (मुली) स्पर्धा.
* आंतर महाविद्यालयीन क्रिकेट, कबड्डी, गोळा फेक, थाळी फेक, १०० मि. धावणे, बुध्दीबळ,

**योगा स्पर्धेचे आयोजन.**

* आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला.

----***----



Scanned with CamScanner

# ✲ Department of Science ✲

Shri. R. R. Shinde
Junior College Teacher
M.Sc.,B.Ed Mathematics
Head of the Department

Smt. M. B. Deshmukh
Junior College Teacher
M.Sc., B.Ed. Biology
Participated in State Level Seminars-2

Smt. S. G. Gore
Junior College Teacher
M.Sc., B.Ed. Chemistry

Smt. R. N. Patil
Junior College Teacher
M.Sc., B.Ed. Physics

Science and Commerce department of Junior College started at 1 st August 2016 Remedial Teaching Classes have been arranged for poor students.

The first three students 12 th Science 2017 - 2018

1) Khelukar Swaroop Chandrakant
2) Jadhav Siddhesh Ramesh
3) Aher Tejashree Shivaji



Scanned with CamScanner

# * ग्रंथालय विभाग *

**प्रा. संदीप लोखंडे**

ग्रंथपाल

एम.कॉम, एमलीप, इन्फरमेशन ॲण्ड सायन्स, नेट ॲण्ड सेट, पीजीडी लॅन.

**श्री. गंगाधर रमेश आहेर**

ग्रंथालय सहाय्यक

मराठा विद्या प्रसारक समाजाच्या बहुजन हिताय बहुजन सुखाय या ब्रीद वाक्याप्रमाणे ग्रामीण भागात शिक्षणाचे पवित्र कार्य करतांना म.वि.प्र. समाजाचे कला व वाणिज्य महाविद्यालय, वडनेर भैरव स्थापना २००९ साली झाली. महाविद्यालयाच्या स्थापनेपासून महाविद्यालयात ग्रंथालय, महाविद्यालयीन विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांना विविध पुस्तकांद्वारे माहिती व सेवा पुरविण्याचे कार्य करत आहे.

## ग्रंथालय संग्रह :-

महाविद्यालयीन ग्रंथ संग्रहालयाचा ग्रंथ संग्रह हा उत्तमरित्या विविध ज्ञानशाखांनी विकसित केलेला आहे. ग्रंथालयात मोठ्या प्रमाणावर विद्यापीठांच्या अभ्यासक्रमावर आधारित ग्रंथांबरोबरच स्पर्धा परीक्षांसाठी आवश्यक असणारे संर्दभ ग्रंथ तसेच जीवन विषयक विविध शास्त्रीय ग्रंथांचा सहभाग आहे.

## संदर्भ ग्रंथ :-

2385 ~~१,५०,००~~, क्रमीक ग्रंथ – 3५००, नियतकालिके – १०, सीडी व डिव्हीडी – १०५, नकाशे – 06, वर्तमान पत्रे – ४.

## ग्रंथालय सभासद :-

महाविद्यालयातील ग्रंथालयामध्ये विद्यार्थी वर्ग, सभासद संख्या ३५० तसेच महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि स्थानिक व्यवस्थापन समिती. त्याचबरोबर संस्थेचे पदाधिकारी हे ग्रंथालयाचे सभासद आहेत.

## ग्रंथालय सेवा :-

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी ग्रंथालयात स्वतंत्र वाचन कक्ष असुन एकावेळेस ७५ विद्यार्थी वाचन कक्षात वाचन करू शकतात. तसेच पुढील अद्यावत सुविधा पुरविल्या जातात.

१) ग्रंथालयातून ग्रंथ देवघेव सेवा, २) संदर्भ सेवा

३) निवडक माहिती प्रसारण सेवा, ४) झेरॉक्स सेवा

५) इंटरनेट सेवा, ६) वर्तमानपत्र कात्रण सेवा इ. सेवा पुरविल्या जातात.

----***----



Scanned with CamScanner

भैरव २०१८-१९

# मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक

शिवाजीनगर, गंगापूर रोड, नाशिक - ४२२ ००२.

## * संस्था दृष्टीक्षेपात *

| | | |
|---|---|---|
| स्थापना | : | सन १९१४ |
| सार्वजनिक ट्रस्ट | : | रजि. नं. ए - ४३६/१९५४ |
| आजीव सभासद संख्या (जनरल) | : | १०१०९ |
| आजीव सभासद संख्या (सेवक) | : | ४६४ |
| शाखांची संख्या | : | ४८५ |
| विद्यार्थ्यांची संख्या | : | २१३५९८ |
| सेवक संख्या | : | ९२६९ |
| अंदाजपत्रक | : | सुमारे रु. ६४९ कोटी ४० लाख (२०१८-१९) |

## * शाखा विस्तार *

| | | | |
|---|---|---|---|
| पूर्व प्राथमिक शाळा (मराठी माध्यम) | ७५ | प्रिंटींग प्रेस | ०१ |
| पूर्व प्राथमिक शाळा (इंग्रजी माध्यम) | १४ | आय. टी. आय. | ०८ |
| प्राथमिक शाळा (मराठी माध्यम) | ६९ | मेडिकल कॉलेज | ०१ |
| प्राथमिक शाळा (इंग्रजी माध्यम) | १५ | मेडिकल कॉलेज हॉस्पिटल ॲण्ड रिसर्च सेंटर | ०१ |
| आश्रमशाळा (प्राथमिक) | ०३ | विद्यार्थी वसतिगृहे | २४ |
| आश्रमशाळा (माध्यमिक) | ०२ | शेतकी शाळा | ०१ |
| माध्यमिक शाळा (मराठी माध्यम) | १६० | ललित कला महाविद्यालय | ०१ |
| माध्यमिक शाळा (इंग्रजी माध्यम) | ०४ | जनशिक्षण संस्थान | ०१ |
| उच्च माध्यमिक विद्यालये | ६० | पदविका फार्मसी महाविद्यालय (डी.फार्म) | ०१ |
| अध्यापक विद्यालये | ०५ | परिचारिका प्रशिक्षण महाविद्यालय | ०१ |
| शिक्षणशास्त्र महाविद्यालये | ०२ | अभियांत्रिकी महाविद्यालय | ०१ |
| कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालये | २२ | कृषी महाविद्यालय | ०१ |
| फार्मसी कॉलेज | ०१ | भौतिकोपचार महाविद्यालय | ०१ |
| आर्किटेक्चर कॉलेज | ०१ | विधी महाविद्यालय | ०१ |
| बॅचलर ऑफ डिझाईन | ०१ | कॉलेज ऑफ सोशल वर्क | ०१ |
| नर्सिंग कॉलेज | ०१ | पॉलिटेक्निक कॉलेज | ०१ |
| व्यवस्थापक संस्था (आय.एम.आर.टी.) | ०१ | नागरी आरोग्य केंद्र | ०१ |
| मविप्रचे प्रशिक्षण व विकास केंद्र | ०१ | ग्रामीण आरोग्य केंद्र | ०१ |

Scanned with CamScanner

## महाविद्यालयीन आठवणीतील एक सुवर्ण क्षण.....!!



सन २०१७-१८ मध्ये रायगड, प्रतापगड, महाबळेश्वर, दिवे आगर या ठिकाणी गेलेल्या महाविद्यालयीन सहलीमधील एक क्षण.....

Scanned with CamScanner